**नागपूर मुख्य कार्यालय**
**कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८**

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९४ * * नागपूर * | बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## कुपवाडात २ अतिरेकी ठार : १२ तास चकमक

■ **वृत्तसंस्था, कुपवाडा, दि. १४ :**
मंगळवारी सकाळी जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा येथे सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. दहशतवाद्यांनी या भागातून घुसखोरीचा प्रयत्न केला होता, परंतु सुरक्षा दलांनी हा प्रयत्न हाणून पाडला.

यापूर्वी, ८ सप्टेंबर रोजी, काश्मीरमधील कुलगाम येथे झालेल्या चकमकीत सैन्याने दोन दहशतवाद्यांना ठार मारले. गुड्डरच्या जंगलात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये ही चकमक झाली. सैन्याने त्याला ऑपरेशन गुड्डर असे नाव दिले. चकमकीदरम्यान जखमी झालेल्या दोन सैनिकांचाही मृत्यू झाला. ऑपरेशन गुड्डरमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांपैकी एकाची ओळख अमीर अहमद डार अशी झाली, जो शोपियानचा रहिवासी होता.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## शेवटी लालू अडकलेच !

लालू कंपनीवर योग्य आणि मोक्याच्या वेळी कायदेशीर कुऱ्हाड चालली. अमित शहा यांनी काही दिवसांपूर्वी तेजस्वी यादव यांना अडकवण्याचे सुतोवाच केलेच होते, लालूप्रसाद यादव केंद्रीय रेलमंत्री असताना त्यांनी जो एका हॉटेलबाबत खास व्यवहार केला. या व्यवहाराच्या बदल्यात त्यांना स्वस्त भावात जमीन देण्यात आली होती. असा सीबीआयचा दावा आहे त्या संदर्भातच दिल्लीच्या न्यायालयामध्ये हा खटला दाखल करण्यात आला आहे. आरोपी म्हणून या खटल्यामध्ये तेजस्वी यादव या त्यांच्या पुत्राचाही आरोपी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तेजस्वी यादव त्यावेळी १८ वर्षापेक्षा खूपच कमी वयाचा होता. तेजस्वी सध्या बिहारमध्ये तेजाने चमकत आहे त्याच्याबरोबर काँग्रेसही आलेली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीमध्ये ते स्वतःला मुजोर म्हणत आहेत. म्हणजेच कसेही करून एनडीएला बिहारमध्ये आपली सत्ता स्थापन करायची आहे. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद अशा सर्व हत्यारांचा उपयोग केला जाईल. तरीही लालूप्रसाद अगदी धुतल्या तांदळाप्रमाणे स्वच्छ आहेत असे त्यांच्या अगदी जवळच्या मित्रांनाही वाटत नाही. पण आता बिहार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक लढण्यासाठी जदयू आणि भारतीय जनता पक्ष यांच्या आघाडीला शह देण्यासाठी इंडिया आघाडी पुढे आलेली आहे. आपण या आरोपांचा न्यायालयात मुकाबला करू असे लालूजी आणि तेजस्वी यांनी कितीही जोरजोराने ओरडले. तरी बिहारमध्ये त्यांचा प्रभाव पडेल असे सत्ताधाऱ्यांना वाटत नाही. मात्र, बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांचा प्रभाव आजही जागृत आहे. १८ ते २० टक्के त्यांची मते कायमच आहेत. सोबत काँग्रेसचीही आठ ते नऊ टक्के मते पकडली तर या निवडणुकीमध्ये धैर्याने तेजस्वी यादव यांना निवडणुकीच्या तोंडावर जराही काकू न करता हे दोन्ही नेते लढण्यासाठी तयार आहेत, असेच दिसते आहे. आता त्या पलीकडे जाऊन निवडणुकीचे घोडामैदान जवळच आहे. तिथे बिहारची बहार काय आहे, ते नक्कीच दिसेल.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी

# सरकारचे ५०० कोटी

राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय ■ बांबू उद्योग धोरणही जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज तीन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी ५०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या प्रस्तावानुसार, राज्य सरकारने बाबासाहेब आंबेडकरांच्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विकासासाठी व्यापक योजना मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत सोसायटीच्या अधीन असलेल्या मुंबई आणि छत्रपती संभाजीनगरमधील नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांचा जिर्णोद्धार आणि अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे.

या कामांसाठी पुढील पाच वर्षांत ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून बाबासाहेबांनी उभारलेल्या संस्थांचे आधुनिकीकरण, संरचनात्मक सुधारणा आणि विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सुविधा उभारण्याचा मानस राज्य सरकारने व्यक्त केला आहे. शिक्षण क्षेत्रातील हा निर्णय समाजातील वंचित घटकांना अधिक सक्षम शैक्षणिक संधी देणारा ठरणार आहे.



**मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय**

■ **उद्योग विभाग :** महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण २०२५ जाहीर. धोरण कालावधीत ५० हजार कोटींची गुंतवणूक, पाच लाखांवर रोजगार निर्मिती. राज्यात १५ समर्पित बांबू क्लस्टर्स तयार करणार. कार्बन क्रेडिट बाजारपेठेचा लाभ घेण्यात येणार. बांबू लागवड आणि प्रक्रिया उद्योगाला चालना. शेतकऱ्यांना नगदी पिकांसारखा आणखी एक पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पन्न पर्याय.

■ **विधि व न्याय विभाग :** मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबईसह, अपील शाखा आणि नागपूर, औरंगाबाद खंडपीठांकरीता गट अ ते ड संवर्गात २ हजार २२८ पदांची निर्मिती. त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता.

# भूपतीने शस्त्र टाकले !

### ६० नक्षलवाद्यांचे गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. १४ :**
नक्षल संघटनांचा कणा मानला जाणारा मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू याने सोमवारी रात्री उशिरा गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. त्याच्यासोबत जवळपास ६० नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे शस्त्र टाकले असून, हा चळवळीला मोठा धक्का मानला जात आहे.

भूपती हा माओवादी संघटनेतील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा नेता होता. १९७० च्या दशकात पीपल्स वॉर ग्रुपमध्ये प्रवेश करणारा वेणुगोपाल याची कारकिर्द गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील सुरू झाली. भूपती हा बडा माओवादी नेता मल्लोजुला कोटेश्वरराव उर्फ किशनजी याचा छोटा भाऊ आहे. त्याच्या शिरावर ६ कोटींहून अधिकचे बक्षीस होते.

भूपती हा माओवाद्यांच्या संघटनेत बौद्धिक चेहरा म्हणून प्रसिद्ध होता. त्याने आतापर्यंत घडलेल्या अनेक हिंसक घटनांत विशेषतः माओवाद्यांच्या संघटनेची स्थानिक पातळीपासून केंद्रीय समितीपर्यंत आखणी करण्यात, त्यात वेळोवेळी बदल करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

भूपतीने अभय नावाने आतापर्यंत अनेकदा पत्रके जारी केली आहेत. भूपतीने काही दिवसांपूर्वीच युद्धबंदी व शांतता चर्चा करण्यासह शस्त्रे टाकण्यासंबंधी महत्त्वाची विधाने केली होती. त्यावर माओवाद्यांच्या नेतृत्वाने मोठी टीका केली होती. यामुळे माओवाद्यांच्या संघटनेत फूट पडल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे गडचिरोली पोलिसांकडून भूपतीचे आत्मसमर्पण घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू होते.

त्याची पत्नी तारक्काने आजारपणाचे कारण देत यावर्षी १ जानेवारीला आरत्मसमर्पण केले तर किशनजीची पत्नी आणि त्याची वहिनी सुजाता हिनेही आत्मसमर्पण केले . पत्नी आणि कुटुंबातील सदस्यांच्या आत्म समर्पणानंतर भूपतीवर दबाव वाढला होता. अखेर सोमवारी रात्री भूपतीने पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आले.



अर्थशास्त्रात पदवीधर असलेल्या भूपतीचे मूळ तेलंगणातील पेद्दापल्ली येथील आहे. सीपीआय (एमएल) पीपल्स वॉरच्या स्थापनेत त्याची प्रमुख भूमिका होती. आंध्र प्रदेशातील ईस्ट गोदावरी आणि विशाखापट्टणम जिल्ह्यांमध्ये चळवळ रुजवून १९८७ मध्ये त्याने बस्तरच्या जंगलात लिट्टेच्या माजी सैनिकांकडून विशेष लष्करी प्रशिक्षण घेतले. पुढे महाराष्ट्रातील गडचिरोलीत नक्षल चळवळीचा पाया घालण्यात आणि दंडकारण्य क्षेत्राचे नेतृत्व करण्यात त्याचा मोठा वाटा होता. २००४ मध्ये सीपीआय (माओवादी) पक्षाच्या निर्मितीनंतर त्याला पक्षाच्या सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या पॉलीट ब्युरो आणि केंद्रीय लष्करी कमांडचे प्रमुखपद देण्यात आले. तब्बल २८ वर्षांहून अधिक काळ तो या पदावर कार्यरत होता. २०१० मध्ये प्रवक्ता आझाद याच्या मृत्युनंतर त्याने अभय या नावाने संघटनेचा मुख्य प्रवक्ता म्हणून जबाबदारी सांभाळली. अनेक मोठ्या नक्षल हल्ल्याचा तो सूत्रधार राहिला आहे.

## बसचा कोळसा : १५ प्रवासी ठार

■ **वृत्तसंस्था, जैसलमेर, दि. १४ :**
मंगळवारी दुपारी ३:३० वाजता राजस्थानमधील जैसलमेरमधील जैसलमेर-जोधपूर महामार्गावर एका चालत्या एसी स्लीपर बसला आग लागली. आगीने लवकरच भीषण रूप धारण केले. या अपघातात १२ ते १५ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.



या अपघातात तीन मुले आणि चार महिलांसह सोळा जण भाजले. जखमी प्रवाशांना तीन रुग्णवाहिकांनी जैसलमेरमधील जवाहर रुग्णालयात नेले, तेथून त्यांना जोधपूरला रेफर करण्यात आले. बहुतेक प्रवाशांचे शरीर ७० टक्क्यांपर्यंत भाजले होते. बसमध्ये ५७ जण होते. आगीचे कारण शॉर्ट सर्किट असल्याचे मानले जात आहे.

ही बस जैसलमेरहून जोधपूरला जात असताना थैयत गावाजवळ तिला आग लागली. बसमधील आगीत जळालेल्या लोकांना रुग्णवाहिकेने जवाहर रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णवाहिका जवाहर रुग्णालयात पोहोचताच, जळालेल्या प्रवाशांना ताबडतोब स्ट्रेचरवर आत नेण्यात आले. अनेक प्रवाशांचे हात आणि पाय गंभीरपणे भाजले होते. जैसलमेरमधील थैयत गावाजवळ हा अपघात झाला.

## भाजपने जाहीर केले ७१ उमेदवार

बिहार निवडणूक

■ **वृत्तसंस्था, पटना, दि. १४ :**
भाजपने मंगळवारी बिहार निवडणुकीसाठी ७१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पहिल्या यादीत तारापूरचे सम्राट चौधरी आणि लखीसरायचे विजय सिन्हा या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा समावेश आहे.

विधानसभा अध्यक्ष नंद किशोर यादव यांचे तिकीट रद्द करण्यात आले आहे. ते पाटणा शहरातून पाच वेळा विजयी झाले आहेत. कुम्हारार येथून पाच वेळा आमदार राहिलेले अरुण कुमार सिन्हा यांनाही तिकीट नाकारण्यात आले आहे. पहिल्या यादीत नऊ महिला उमेदवार आहेत.


६९ व्या धम्मचक्र अनुपरिवर्तन दिनाच्या सर्व जनतेला मंगल कामना



सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य असलेली व हर घर ,हर संविधान उपक्रमात मोठा वाटा असलेले मूकनायक फाऊंडेशन चिमूर

मा. प्रकाश मेश्राम
संस्थापक अध्यक्ष


## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल

■ **मुंबई, दि. १४ :**
अजित पवार यांनी आज पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांची संघटन महासचिव म्हणून नियुक्ती केली. पक्षातील संवाद आणि तळागाळातील संपर्क वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## मतदार यादी बदलावर ब्रेक

आयोगाने काढला हात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. त्यात निवडणुकीच्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. मात्र सगळ्यांचं लक्ष वेधलं ते मतदार यादी बदलाच्या प्रश्नाने. पक्षांचे प्रतिनिधी बदलांबाबत तक्रारी मांडत असताना आयोगाने स्पष्टपणे सांगितलं, विधानसभा मतदार यादीत नावे घालणे, काढणे किंवा अन्य बदल करणे हा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत नाही.

भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदार यादी हीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाणार आहे. १ जुलै २०२५ ही अधिसूचित तारीख मानूनच प्रभागनिहाय मतदार याद्या तयार होतील. दुरुस्त्या फक्त लेखनिकांकडून झालेल्या चुका किंवा चुकीच्या प्रभागात नाव गेल्यास शक्य होतील, असं राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केलं.

राजकीय पक्षांच्या मागणीवरून प्रमुख प्रचारकांची मर्यादा २० वरून ४० करण्याचा विचार आयोग करणार आहे, उमेदवारांच्या निवडणूक खर्चातही वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. सध्या राज्यातील २९ मनपा, २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती, ३२ जि.प. आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे.

## लालूंसह राबडी आणि तेजस्वीवर आरोप निश्चित

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :**
बिहार निवडणुकीच्या फक्त चार आठवडे आधी दिल्लीच्या न्यायालयाने सोमवारी माजी रेल्वेमंत्री आणि राजदप्रमुख लालूप्रसाद यादव, त्यांची पत्नी राबडीदेवी, मुलगा तेजस्वी यादव यांच्याविरुद्ध आयआरसीटीसी हॉटेल जमीन घोटाळ्यात आरोप निश्चित केले.

२४४ पानांच्या आदेशात विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी लालूप्रसाद यादव यांना गुन्हेगारी कटाचा सूत्रधार असल्याचा संशय व्यक्त केला. यादव कुटुंबातील तीन सदस्यांसह ११ जणांविरुद्ध गुन्हेगारी कट, फसवणूक, पदाचा गैरवापर आणि सरकारी कर्मचाऱ्यांकडून गुन्हेगारी गैरवर्तनाचे आरोप निश्चित करण्यात आले आहेत.

## मविआत मनसेचा तूर्तास प्रवेश नाही : सपकाळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
मनसे महाविकास आघाडीत येणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून रंगली होती. यावर आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पडदा टाकला आहे.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात पत्रकार परिषद घेत सपकाळ म्हणाले, मनसेच्या महाविकास आघाडीत समावेशाबाबत ना कोणताही प्रस्ताव आलेला आहे, ना कोणती चर्चा झाली आहे. माध्यमांमधील चर्चा म्हणजे फक्त अफवा आहे.

सपकाळ म्हणाले की, भाजपच्या हुकूमशाही कारभाराविरोधात लोकशाही आणि संविधान रक्षणासाठी काँग्रेस पक्षाने उचललेले पाऊल हे देशव्यापी आहे. इंडिया आघाडी ही या लढाईची ताकद आहे. कोणताही नवा पक्ष यात सहभागी व्हायचा असल्यास त्याचा निर्णय इंडिया आघाडीतील घटक पक्ष एकत्र घेतील. राज्य पातळीवर कुठलाही निर्णय घेतला जाणार नाही, हे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, निवडणूक प्रक्रियेवरील संशयाचाही त्यांनी मुद्दा उपस्थित केला. मागील काही निवडणुकांमध्ये मतदार याद्यांतील गोंधळ, मतचोरी आणि घोटाळे उघडकीस आल्याचे सांगत सपकाळ म्हणाले, हा मुद्दा सर्वात आधी राहुल गांधी यांनी पुराव्यानिशी ऐरणीवर आणला. हाच प्रश्न मांडण्यासाठी काँग्रेससह विविध पक्षांनी निवडणूक आयोगाची भेट घेतली. या शिष्टमंडळात काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात आणि मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड यांचा समावेश होता.

## विंडिजला २-० ने क्लीन स्वीप

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :**
भारतीय संघाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० असा क्लीन स्वीप केला. मंगळवारी झालेल्या दुसऱ्या कसोटीत संघाने वेस्ट इंडिजचा ७ विकेट्सने पराभव केला. भारताने पहिली कसोटी एक डाव आणि १४० धावांनी जिंकली होती.

दिल्ली कसोटीत भारतासमोर १२१ धावांचे लक्ष्य होते, जे त्यांनी तीन विकेट्सने साध्य केले. केएल राहुलने चौकार मारून विजयावर शिक्कामोर्तब केले आणि ५८ धावांवर नाबाद राहिला. शुभमन गिलने कर्णधार म्हणून मायदेशातील पहिली कसोटी मालिका जिंकली.

वेस्ट इंडिजने दुसऱ्या डावात ३९० धावा केल्या. भारताने पहिल्या डावात ५१८ आणि वेस्ट इंडिजने २४८ धावा केल्या, ज्यामुळे भारताला पहिल्या डावात २७० धावांची आघाडी मिळाली. भारताच्या पहिल्या डावात कर्णधार शुभमन गिलने नाबाद १२९ आणि यशस्वी जैस्वालने १७५ धावा केल्या.

वेस्ट इंडिजवरील विजयानंतर, भारतीय संघ २०२५-२७ च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप हंगामासाठी पॉइंट्स टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. संघाचे स्थान कायम आहे.

यापूर्वी, भारताने इंग्लंडमधील पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली होती, ज्यामध्ये एक सामना अनिर्णित राहिला होता. या मालिकेनंतर, भारतीय संघाचे ५५.५६% गुण आहेत. संघाने सातपैकी चार सामने जिंकले आहेत आणि दोन गमावले आहेत, तर एक सामना अनिर्णित राहिला आहे. भारत १४ नोव्हेंबरपासून घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे.



१९ ऑक्टोबरपासून भारतीय संघ एकदिवसीय आणि टी२० मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. भारतीय संघ १५ ऑक्टोबर रोजी दिल्लीहून दोन तुकड्यांमध्ये ऑस्ट्रेलियाला रवाना होईल. एक तुकडी सकाळी आणि दुसरी संध्याकाळी रवाना होईल.
टीम इंडिया ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळणार आहे.
पहिला एकदिवसीय सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थमध्ये खेळला जाईल.




## महाविकास आघाडी नव्हे महाकन्फ्यूज आघाडी : एकनाथ शिंदे



**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य निवडणूक आयोगाची भेट घेणाऱ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांवर तिखट शब्दांत हल्ला चढवला आहे. ही महाविकास आघाडी नव्हे तर महाकन्फ्यूज आघाडी आहे. डोळ्यापुढे पराभव दिसत असल्यामुळे तक्रारींचा पाढा वाचण्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेतली आहे, असे ते म्हणाले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या तिन्ही घटकपक्षांच्या एका शिष्टमंडळाने आज राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आयोगाला देशातील लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास अधिक बळकट होण्यासाठी आगामी निवडणुकांत पूर्ण पारदर्शकता बाळगण्याची विनंती केली. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या या शिष्टमंडळाला टोला हाणला आहे. एकनाथ शिंदे येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, विरोधी पक्षांचे शिष्टमंडळ आपल्या तक्रारींचा पाढा वाचण्यासाठी निवडणूक आयोगाकडे आले आहे. ही महाविकास आघाडी नाही तर महाकन्फ्यूज आघाडी आहे. त्यांच्यात एवढे कन्फ्यूजन आहे की, कोण काय बोलते हे काहीच समजत नाही. कुणाचा कुणाशी पायपोस नाही. त्यामुळे हे कन्फ्यूज लोक एकत्र आलेत. आज राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी ज्या पद्धतीने काम करत आहे ते पाहून तथा सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेले आर्थिक पॅकेज पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. विरोधकांनी महायुतीचा लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील विजय पाहिला.

### उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र कायम एक नंबर ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न : उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत

# महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारांचे वितरण

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**

महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायमस्वरूपी एक नंबर वर ठेवण्यासाठी जे काही करावे लागेल, ती सर्व ताकद उद्योजकांना देण्याची राज्य शासनाकडून तयारी आहे, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.



2022 - 23 आणि 2023- 24 या वर्षाकरिता "महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार 2025" चे वितरण मराठी भाषा व उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या पुरस्कार वितरण समारंभात उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, उद्योग सचिव डॉ. पी अन्बळगन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंह, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त वैभव वाघमारे तसेच पुरस्कार विजेते निर्यातदार उद्योजक उपस्थित होते.

उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत म्हणाले की, राज्याच्या निर्यातीचे गुणोत्तर दहा पटीने वाढवण्यासाठी 12 नवीन धोरणे आणली जात आहेत. यात एव्हीजीसी, जीसीसी, बांबू, लेदर, एरोस्पेस, इलेक्ट्रॉनिक्स यासारखी धोरणे लवकरच येणार आहेत. या धोरणांमुळे उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दावोस, जर्मनी, जपान यासारख्या परदेश दौऱ्यांतील करारांद्वारे महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक वाढल्याचे सांगत उद्योग मंत्री डॉ.सामंत म्हणाले की, दावोस येथे पहिल्या वर्षी 1.70 लाख कोटी, दुसऱ्या वर्षी 7 लाख कोटी तर तिसऱ्या वर्षी 16 लाख कोटी रुपयांचे विक्रमी सामंजस्य करार झाले. या सामंजस्य करारांच्या 80 टक्के अंमलबजावणीसह महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचा अभिमान त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उद्योग मंत्री डॉ.सामंत यांनी उद्योजकांना आवाहन केले की, पुरस्कार स्वीकारताना आपण महाराष्ट्राची आणि देशाची सेवा करत आहात, त्यामुळे भूमिपुत्रांना रोजगार कसा मिळेल, यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जेम्स अँड ज्वेलरी क्षेत्रातील उद्योजकांनी नवी मुंबईतील आगामी प्रकल्पासाठी पहिले ट्रेनिंग सेंटर रत्नागिरीत सुरू करून स्थानिक तरुणांना किमान 40 हजार रुपये वेतन मिळवून देण्याचे कौतुकास्पद काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योग स्थापनेनंतर स्थानिक रोजगार आणि भूसंपादन या दोन कारणांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योजकांनी स्थानिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि उद्योजक संघटनांनी यात नेतृत्व करावे, अशी अपेक्षा व्यक्त करून मैत्री पोर्टल आणि सिंगल प्रणालीमुळे उद्योजकांची कामे अधिक गतीने व पारदर्शकपणे होत आहेत.

राज्याचा विकासात उद्योजकांचे मोठे योगदान असून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत मागील तीन वर्षात 57 हजार० उद्योजक तयार झाले आहेत. महाराष्ट्रातील उद्योजकांना विस्तारासाठी आता 'रेड कार्पेट' दिल्यामुळे मोठी गुंतवणूक फक्त महाराष्ट्रात होत आहे. त्याचप्रमाणे, मागील दोन वर्षांत 1.5 लाख बेरोजगार युवकांना उद्योजकांनी रोजगार मिळवून दिल्याबद्दल उद्योग मंत्री डॉ.सामंत यांनी आभार व्यक्त केले.

उद्योगांकरिता तयार करण्यात येणाऱ्या धोरणांचा फायदा उद्योजकांपर्यंत कसा पोहोचवायचा, यावर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याची सूचनाही उद्योग मंत्री डॉ.सामंत यांनी विभागाला केली.

यावेळी उद्योग मंत्री यांच्या हस्ते इम्पोर्ट एक्स्पोर्ट कन्व्हेन्शन बुकलेटचे प्रकाशन करण्यात आले. तसेच निर्यात वाढीसाठी उत्कृष्ट कार्य केलेल्या रत्नागिरी, नागपूर, गडचिरोली आणि लातूर जिल्हाधिकाऱ्यांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांनी विभागाच्या कामांची विस्तृत माहिती प्रास्ताविकपर भाषणात मांडली. तसेच उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, उद्योग सचिव डॉ.पी.अन्बळगन यांनीही विचार मांडले.

## पानसरे हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना जामीन



**कोल्हापूर :** चर्चेत असलेल्या कॉ.गोविंद पानसरे हत्या प्रकरणात मोठा न्यायालयीन निर्णय समोर आला आहे. या प्रकरणातील डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांना मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचकडून जामीन मंजूर झाला आहे. यामुळे या हत्याकांडातील सर्व १२ संशयितांना आता जामीन मिळाल्याने हा तपास नव्या टप्प्यात प्रवेश करीत आहे. २०१५ मध्ये घडलेल्या या हत्याकांडात आजपर्यंत एकूण १२ संशयितांना अटक करण्यात आली होती. त्यापैकी नऊ जणांना यापूर्वीच जामीन मंजूर झाला होता, मात्र डॉ. तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर हे तिघे कळंबा कारागृहात होते. त्यांच्या जामीन अर्जावर आज मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचकडे सुनावणी झाली आणि न्यायालयाने तिघांनाही जामीन मंजूर केला. या निर्णयानंतर सनातन संस्थेने प्रतिक्रिया देत निरपराध हिंदुत्वनिष्ठांना साडे नऊ वर्षे कारागृहात ठेवले, त्याची भरपाई कोण करणार?" असा प्रश्न उपस्थित केला आहे. संस्थेच्या प्रतिनिधींनी म्हटले की, पानसरे हत्या प्रकरणात निर्दोष हिंदुत्वनिष्ठांवर अन्याय झाला असून न्यायालयाचा हा निर्णय सत्यासमोर आणणारा आहे. २० फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ.गोविंद पानसरे आणि त्यांची पत्नी उमा पानसरे यांच्यावर त्यांच्या राहत्या घराजवळ गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पानसरे यांचे काही दिवसांनी निधन झाले. या हत्येने महाराष्ट्रासह संपूर्ण देशात खळबळ उडवली होती.

# अभाविप कार्यालयाची तोडफोड

### मनविसे पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल, विश्रामबाग पोलिसांकडून २० ते ३० जणांविरुद्ध फिर्याद नोंद

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे दि. १४ :**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सदाशिव पेठेतील कार्यालयाची तोडफोड करुन कार्यकर्त्याला मारहाण केल्या प्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह 20 ते 30 जणांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला.



याबाबत अभाविपच्या कार्यकर्त्या संजीवनी कसबे (वय 20) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मनविसेचे पदाधिकारी धनंजय दळवी, केतन डोंगरे, आशितोष माने, महेश भोईबार, हेमंत बोळगे यांच्यासह 20 ते 30 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते १३ ऑक्टोबर दुपारी साडेतीनच्या सुमारास सदाशिव पेठेतील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यालयात शिरले. अभाविपच्या कार्यालयातील कार्यकर्ते सार्थक वेळापुरे यांनी शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली.

कार्यालयाची तोडफोड करुन त्यांनी अभाविपच्या कार्यालयातील भिंतीवर पत्रक चिकटवले. कार्यालयाला कुलूप लावून महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तेथून निघून गेले, असे संजीवनी कसबे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त ऋषीकेश रावले, विश्रामबाग पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार, सहायक निरीक्षक राजेश उसगांवकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

## विविध मागण्यांसाठी आज अंगणवाडी सेविकांचे आंदोलन



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**

निवृत्तिवेतन, उपदान (ग्रॅच्युईटी), प्रोत्साहन भत्ता, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरण्याच्या कामाचा मोबदला मिळत नसल्याने राज्यातील अंगणवाडी सेविकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे केलेल्या कामाच्या मोबदल्याबरोबरच निवृत्त होणाऱ्या अंगणवाडी सेविकांना निवृत्तिवेतन व उपदान मिळावे यासाठी १५ ऑक्टोबर रोजी आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येणार आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरमहा निवृत्तिवेतन व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार उपदान (ग्रॅच्यूईटी) देण्याच्या प्रस्तावावर सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे मागील काही वर्षांमध्ये निवृत्त होणाऱ्या अंगणवाडी सेविकांवर उपासमारीची वेळ आली आहे. सरकारच्या या उदासिनतेमुळे अंगणवाडी कर्मचारी हतबल झाल्या आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरमहा दोन हजार रुपये व मतदनीसांना दरमहा एक हजार रुपये प्रोत्साहन भत्ता देण्यासंदर्भात ४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासनाने आदेश दिले आहेत. त्यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पोषण ट्रॅकर ॲपवर आपल्या कामाची नोंद करणे बंधनकारक केले आहे.

राज्यात काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांपैकी ८० टक्क्यापेक्षा जास्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पोषण ट्रॅकर ॲपवर काम करूनसुध्दा प्रोत्साहन भत्त्याची रक्कम देण्यात आलेली नाही. तसेच मातृवंदना योजना कामाची सक्ती असल्याने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामात अडथळा निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे मुख्यसेविका व पर्यवेक्षिका यांच्या सूचनेप्रमाणे अंगणवाडी मदतनीसांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरले असून त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे राज्यभरातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांवर उपासमारीची वेळ आली आहे. यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीसांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. राज्यभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या राज्य सरकारच्या निदर्शनास आणून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे बृजपाल सिंह, कॉ. शुभा शमीम, कॉ. दिलीप उटाणे, भगवानराव देशमुख, कॉ. जीवन सुरुडे, जयश्री पाटील, कमल परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली १५ ऑक्टोबर रोजी आझाद मैदानावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात बसेसची संख्या वाढवावी : प्रताप सरनाईक



**मुंबई :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करावे. जिल्ह्याच्या भौगोलिक विस्ताराचा विचार करून त्या प्रमाणात बसेस देऊन परिवहन सेवा सक्षम करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एस.टी. महामंडळाशी सबंधित विविध विषयांबाबत बैठक झाली. त्यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते. बैठकीस आमदार निलेश राणे, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, वेंगुर्ला आणि कुडाळ आगाराला पाच बसेस देण्यात याव्यात. ओरोस येथील प्रवासी संख्या व शासकीय कार्यालये लक्षात घेता बस स्थानकाचा विस्तार करावा. बस स्थानकाचा पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्वावर विकास करून प्रशस्त बसस्थानकाची निर्मिती करावी. कार्यरत कर्मचारी संख्या आणि बसेसची संख्या लक्षात घेऊन नियोजन करावे. कर्मचाऱ्यांअभावी बसेस थांबून प्रवाशांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. सिंधुदुर्ग जिल्ह्यात विभागीय नियंत्रक रिक्त पदावर अधिकारी देण्यात यावा.

## पोलीस शिपायासाठी निवृत्त उपनिरीक्षकाकडून लाच

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे दि. १४ :**

कोंढवा पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली आहे. पोलिस शिपायासाठी निवृत्त पोलिस उपनिरीक्षक हप्ते गोळा करत असताना दोघांना रंगेहाथ अटक करण्यात आली. या घटनेनंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनय पाटणकर यांची तातडीने नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई सोमनाथ बापू महारनवर (वय ३४, रा. ओम नमो सोसायटी, शेवाळवाडी) आणि निवृत्त पोलिस उपनिरीक्षक युवराज कृष्ण फरांदे (वय ५९, रा. वृंदावन सोसायटी, उरळीकांचन) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, महारनवर याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. एका व्यावसायिकाने याबाबत फिर्याद दिली आहे. त्याच्याविरुद्ध बीजचोरीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी आणि कागदपत्रांमध्ये मदत करण्याच्या बहाण्याने पोलिस शिपाई महारनवर याने व्यावसायिकाकडे दहा हजार रुपयांची लाच मागितली होती.

# जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे बिगुल

### ७३ गटांसाठीचे आरक्षण जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे दि. १४ :**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी ७३ गटांची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर करण्यात आली. या सोडतीनुसार अनुसूचित जातींसाठी सात, अनुसूचित जमातींसाठी पाच आणि नागरिकांचा मागासवर्गीय प्रवगार्साठी १९ असे गट राखीव झाले आहेत. त्यापैकी दहा जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.दरम्यान, आरक्षणाचा फटका काही मोठ्या नेत्यांना बसणार असून त्यांना अन्य पर्याय शोधावा लागणार असल्याचे सोडतीनंतर स्पष्ट झाले.

जिल्हा परिषदेच्या गटांसाठीची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते-देशमुख, कुळ कायदा शाखेचे तहसीलदार जगदीश निंबाळकर, निवडणूक शाखेचे तहसीलदार राहुल सारंग यावेळी उपस्थित होते. हवेली तालुक्यातील गाऊडदरा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

आरक्षणानुसार सर्वसाधारण प्रवगार्साठी ४२ गट राखीव झाले असून त्यापैकी २० गट महिलांसाठी राखीव आहेत. एकूण ७३ गटांपैकी ३७ गट महिलांसाठी राखीव झाले असून त्यामध्ये अनुसूचित जाती सात गट असून त्यापैकी चार गट महिलांसाठी, अनुसूचित जमातींसाठी पाच गट असून त्यापैकी तीन गट महिलांसाठी तर नागरिकांचा मागासवर्ग प्रवगार्साठी १९ गट राखीव झाले असून त्यापैकी दहा गट महिलांसाठी आरक्षित झाले आहेत.

नवीन आरक्षण पद्धतीनुसार अनुसूचित जाती आणि जमाती यांचे आरक्षण हे जिल्ह्यातील गटांमध्ये सर्वाधिक लोकसंख्येच्या गटापासून उतरत्या क्रमाने काढणे अपेक्षित आहे. मात्र, अनुसूचित जाती गटाचे आरक्षण काढताना हवेली तालुक्यातील लोणीकाळभोर गटाऐवजी इंदापूर तालुक्यातील भिगवण गट आरक्षित असल्याचे सांगण्यात आले.

## तनिष्कचे नवे 'मृगांक' फेस्टिव कलेक्शन जे तुम्हाला दैवी जगाची सैर घडवते

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**



काल्पनिक आकृतिबंध, नाट्यमय छायाचित्रे आणि फॅशनला प्राधान्य देणारी डिझाइन भाषा वापरून, तयार करण्यात आलेले 'मृगांक' सणासुदीच्या दागिन्यांमध्ये अचाट कल्पना आणि आश्चर्य भरते नागपूर ऑक्टोबर २०२५: भारतातील सर्वात मोठा ज्वेलरी रिटेल ब्रँड आणि टाटा समूहाचा एक भाग असलेल्या तनिष्कने पौराणिक आणि कल्पनारम्य जगापासून प्रेरित होऊन सणासुदीसाठी 'मृगांक' हे आकर्षक कलेक्शन प्रस्तुत केले आहे, जिथे तरंगते राजवाडे, आकाशीय उद्याने आणि अलौकिक प्राणी सोन्यात साकारले गेले आहेत. कथाकथनाची कला आणि सौंदर्य वाढविण्यासाठी प्रतीकांचा वापर शतकानुशतके भारतात केला जात आहे आणि मृगांकमधील प्रत्येक कलाकृती यापासून प्रेरित आहे आणि सणासुदीच्या भावनेचा सन्मान करते. धाडसी, कल्पनारम्य आणि आश्चर्यकारक अलौकिक - तनिष्कने माजी मिस वर्ल्ड आणि अभिनेत्री मानुषी छिल्लर यांना मृगांकच्या या भावनेला मूर्त रूप देण्यासाठी निवडले आहे.

तनिष्कला ट्रेंडच्या पलीकडे जाऊन असे एक दृश्य जग निर्माण करायचे होते, जिथे प्रत्येक घटक, मग तो गूढ थ्रीडी पक्षी असो किंवा भव्य राजवाडा, आश्चर्याची भावना जागृत करेल. पौराणिक प्राणी आणि काल्पनिक फुलांनी प्रेरित होऊन, मृगांक कल्पनारम्यतेइतके सुंदर आणि स्वप्नांइतके भव्य असावे या भावनेतून डिझाइन केले आहे. स्टोन-ऑन-स्टोन जडाऊ, बाडरूम, चांडक, रस रवा आणि गुंतागुंतीच्या जाळीच्या लेयर्सच्या प्रगत तंत्रांचा वापर करून तयार केलेल्या या कलेक्शनमध्ये रंगीबेरंगी कुंदन, मीनाकारी आणि थ्रीडी आकृतिबंधांचे सुंदर मिश्रण आहे. प्रत्येक दागिना म्हणजे एक प्रवेशद्वार आहे, जे परिधान करणाऱ्याला मृगांकच्या काल्पनिक जगात घेऊन जाते, जिथे मिथक आणि कलात्मकता यांची सांगड घातलेली असते. राजवाड्याची भव्यता प्रतिबिंबित करणारे कॅस्केडिंग हरम असोत, पौराणिक प्राण्यांपासून प्रेरित स्टेटमेंट रिंग असोत किंवा विविध शैलींनी डिझाइन केलेले बहुमुखी पेंडेंट सेट असोत, तनिष्कचे मृगांक कलेक्शन एक वैविध्यपूर्ण परंतु सुसंवादी अनुभव देते, आधुनिक भारतीय महिलेसाठी सणासुदीच्या दागिन्यांची नवी व्याख्या रचते. जिथे कारागिरी आणि कथाकथनाची जादू एकत्रितपणे खरोखर अलौकिक निर्मिती करते. या कलेक्शनबद्दल, टायटन कंपनी लिमिटेडच्या चीफ डिझाईन ऑफिसर रेवती कांत म्हणाल्या, "वर्षातील सर्वात मोठ्या सणांसाठी, 'मृगांक' हा स्वप्नांच्या कल्पनारम्य जगाचा एक भव्य उत्सव म्हणून सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नावाची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १४ :**

शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न होत असताना सायबर गुन्हेगारी रोखण्याचेही त्यांच्यापुढे आव्हान आहे. नाशिकमध्ये डिजिटल अरेस्टच्या दोन घटना उघडकीस आल्या आहेत. डिजिटल अरेस्टच्या नावाखाली नाशिकमध्ये एका ज्येष्ठ नागरिकाची ७२ लाख रुपयांना तर, दुसऱ्या घटनेत सहा कोटी रुपयांना लूट करण्यात आली. आतापर्यंत अशा घटनांमध्ये सीबीआय, सीआयडी यांच्या नावाने धाक दाखविला जात होता. परंतु, नाशिकमधील अशा एका प्रकरणात भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या न्यायालयात हजर करण्याची धमकी देत फसवणूक करण्यात आली. डिजिटल अरेस्टचा धाक प्रामुख्याने सेवानिवृत्तांना दाखविला जातो. नाशिक येथील उच्चभ्रु वसाहत असलेल्या गंगापूररोड भागात एक ७२ वर्षांचे सेवानिवृत्त अधिकारी राहतात. त्यांचा मुलगा नोकरी निमित्ताने परदेशात आहे. संबंधित सेवानिवृत्त व्यक्ती आणि त्यांची पत्नी दोघेही कायम आजारी असतात.

# वैभव खेडेकर अखेर भाजपात दाखल

### मनसे सोडल्यानंतर महिनाभरानंतर पक्षप्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**



खेडचे माजी नगराध्यक्ष आणि मनसेचे निलंबित नेते वैभव खेडेकर यांनी अखेर आज भाजपचा झेंडा हाती घेतला. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या राजकीय दिशेबाबत सुरू असलेले सस्पेन्स अखेर संपुष्टात आला आहे. मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि संतोष नलावडे यांच्या उपस्थितीत खेडेकरांचा अधिकृत पक्षप्रवेश पार पडला.

वैभव खेडेकर हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जुने आणि कोकणातील प्रभावी नेते म्हणून ओळखले जात होते. राज ठाकरे यांचे निष्ठावान समर्थक म्हणून त्यांची प्रतिमा होती. मनसेच्या संघटनेच्या बांधणीपासून ते स्थानिक प्रश्नांवर लढा देण्यापर्यंत त्यांनी सक्रिय भूमिका बजावली होती. मात्र, अलीकडच्या काळात त्यांच्या भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाशी वाढलेल्या संपर्कामुळे मनसेच्या नेतृत्वाचा रोष ओढवला.

भाजपमध्ये प्रवेशाची चर्चा सुरू होताच मनसेने त्यांच्यावर तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करत पक्षातून निलंबित केले. त्या निर्णयानंतर खेडेकरांनी उघडपणे भाजपकडे झुकते माप दिले. पण त्यांच्या प्रवेशाचा निर्णय मात्र वारंवार पुढे ढकलला जात होता. त्यामुळे भाजपने खेडेकरांना झुलवतंय का? असा प्रश्न राजकीय वतुर्ळात चर्चेत आला होता. याआधी वैभव खेडेकर यांचा भाजप प्रवेशाचा मुहूर्त तब्बल तीन वेळा पुढे ढकलला गेला होता. प्रत्येक वेळी काही ना काही कारणांमुळे समारंभ स्थगित होत होता, त्यामुळे त्यांच्या राजकीय भवितव्यासंदर्भात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. पक्षप्रवेश पुढे ढकलल्यानंतर वैभव खेडेकरांनी गेल्या काही दिवसांत मुंबईत भाजप नेत्यांची अनेकदा भेट घेतली. रवींद्र चव्हाण आणि प्रवीण दरेकर यांच्याशी झालेल्या चर्चांनंतर अखेर आज त्यांचा पक्षप्रवेश निश्चित झाल्याने त्या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

### आरबीआयची पीएम-ई-ड्राईव्ह प्रस्तावाला मंजुरी

# पुण्याला एक हजार ई बस मिळणार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे दि. १४ :**

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री ई-ड्राइव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) ताफ्यात लवकरच एक हजार इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहे. राज्य सरकारच्या निदेर्शानुसार या बस खरेदी करण्याचा प्रस्ताव रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे सादर करण्यात आला आहे.ह्यअवजड उद्योग खात्याचे मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, अशी माहिती मोहोळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.




मोहोळ म्हणाले, पुणे शहरातील लोकसंख्यावाढ आणि शहरीकरणामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर ताण वाढला आहे. तसेच, वाहतूक कोंडी आणि वाढते प्रदूषण यामुळे नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. सध्या पीएमपीच्या ताफ्यात सुमारे दोन हजार बस आहेत. मात्र, शहराच्या भविष्यातील गरजेनुसार या बस कमी पडत असून, मेट्रोला पूरक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जवळपास चार हजार बसची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार कुमारस्वामी यांनी प्रस्तावाला सकारात्मकता दर्शवली असून मंत्रालयातील अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले. राज्य पातळीवर बस खरेदी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन रिझर्व्ह बँकेकडे आवश्यक प्रस्ताव पाठवण्यात आला. बँकेने ई-बस खरेदीसाठी आर्थिक सहाय्य आणि हमी दिल्याने केंद्राकडे अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, असे मोहोळ यांनी नमूद केले.

# रामटेक गडमंदिरात काकडा आरतीला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १४ :**



भगवान श्रीरामचंद्राचे प्रसिद्ध गडमंदिर येथे दि.७ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता पारंपरिक पद्धतीने काकडा आरतीला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती. संपूर्ण कार्तिक महिन्यात दररोज पहाटे ५ वाजता आरती होणार असून त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी समारोप केला जाईल.

भोसले देवस्थान गढमंदिरचे रिसिव्हर तथा उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक चंद्रशेखर बावनकर हे आरतीच्या आयोजनाची व्यवस्था पाहत आहेत. मंदिरात पहाटे साडेचार वाजता भजनानंतर नेमके पाच वाजता आरती केली जाते. श्रीराम मंदिरचे मुख्य पुजारी मोहन पांडे व मंगेश पांडे यांच्या हस्ते व लक्ष्मण मंदिरचे पुजारी धनंजय पांडे, संजय पांडे, अविनाश पांडे आणि सुनील पांडे यांच्या सहभाग राहतो. काकडा आरतीत लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी होत आहेत. दररोज पहाटे विठ्ठल मंदिरातून काकड आरती भक्त परिवारची पहाटे चार वाजता दिंडी निघते व भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था केली जाते. ऐतिहासिक दृष्टीने हे मंदिर विशेष मानले जाते.

चौथ्या शतकात वाकाटक राणी प्रभावती यांनी रामपादुका पूजल्या, तर १३ व्या शतकात यादव राजांनी मंदिर बांधले.

इ.स. १७५३ मध्ये प्रथम रघुजी भोसले यांनी राम-सीतेच्या मूर्तीची स्थापना करून मंदिराची स्थायी व्यवस्था केली. मनसरचे ७२ वर्षीय धनराज काठोके सांगतात की, ते दरवर्षी कार्तिक महिनाभर पहाटे तीन वाजता उठून आरतीसाठी येतात.

# महाप्रज्ञा बुद्ध विहार येथे वर्षावास समापन कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १४ :**

वाडी जवळील न्यू शांती नगर दाभा येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात रविवार ला वर्षावास समापन कार्यक्रमानिमित्त विविध धम्ममय व सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. आषाढ ते अश्विन पोर्णिमे दरम्यान या विहारात भदंत संघकीर्ती महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने उपासक-उपासिक यांनी बुध्द वंदना, धम्मदेसना,ध्यान साधना करून वर्षावास पूर्ण केला.या वर्षावास समापन प्रसंगी विविध धम्ममय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .सकाळी भदंत धम्मशील महाथेरो (सारनाथ) यांचे हस्ते ध्वजारोहण करून महापरित्राण पाठ संपन्न झाले.

**महापरित्राण पाठ, समाजप्रबोधन, भोजनदान, भीमगीत**



तद्नंतर भिक्खू संघाला भोजनदान तर दुपारी हजारो उपासक उपासिकांना भोजन दान करण्यात आले. यावेळी भिक्खू संघास चिवरदान, संघदान नंतर भिक्खु संघाने उपस्थितांना धम्मदेसना व बुद्ध धमाचे महत्व, वर्षावास चे महत्व, समाजाची जबाबदारी इं. वर धम्मदेसना दिली. दुपारी विशेष अतिथी माजी मंत्री रमेशचंद्र बंग, गर्जना सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेश ठाकूर, माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, युवा सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य हर्षल काकडे , भाजपाचे माजी उपनगराध्यक्ष नरेश चरडे, श्याम मंडपे, आनंदबाबू कदम, माजी सभापती सरिता यादव, राकेश मिश्रा, माजी नगरसेवक दिनेश कोचे, परमानंद राऊत, योगेश चरडे, राजेश जंगले, आशिष नंदागवळी यांचे मार्गदर्शन व विशेष पुरस्कार वितरित करण्यात आले.दुपारी अमरावती येथील सुप्रसिद्ध गायक संविधान मनोहरे व संचाने बहारदार बुद्ध व भीम गीते प्रस्तुत करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या वर्षावास समारोह दरम्यान रक्तदान,आरोग्य तपासणी, होमियोपॅथी इ.शिबीर सम्पन्न झाले. शिबिराचा उपस्थित हजारो अनुयायांनी लाभ घेतला. समता सैनिक दलाने दिवसभर सम्पूर्ण सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाला विदर्भा सह नागपूर शहरातील विविध भागांसह वाडी, डिफेन्स, लाव्हा, दाभा, दौलामेटी, ८ मैल, वडधामना येथील विविध परिसरातील उपासक-उपासिकांची विहारात मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# हर्षीता ढवळे राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी पात्र



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १४ :**

नागपूर विभागीय शालेय कॅरम स्पर्धा नुकतीच गडचिरोली येथे पार पडली. या स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात जवाहरलाल नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वाडी येथील विद्यार्थिनी हर्षीता शरद ढवळे हिने उत्कृष्ट कामगिरी करत कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. हर्षीताच्या या यशाबद्दल व्ही.एस.पी.एम. ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन संस्थेचे कार्यवाह युवराजजी चालखोर, विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन डेहनकर, उच्च प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विनोद देऊळकर, क्रीडा शिक्षक पंकज मानेकर, तसेच प्रणय भुयार, निर्मला टेकाडे, पंकज पाटिल, दिनेश निगुट, ज्योती मानकर, अमित गायधने, वर्षा घारपूरे, उषा पांगुळ, शुभांगी काळे, प्रीती रामटेके, वृषाली कोकाटे, शुभम शहारे, जयश्री चौधरी, पूजा ठाकरे, ज्योत्स्ना गमे, अश्विन बाभूळकर, विनोद भोंगाडे आणि केसरी राऊत यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हर्षीताने केलेल्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाचे नाव उज्वल झाले असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तीला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# विठ्ठल नामाच्या गजरात निघते काकडा दिंडी



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १४ :**

सोनेगाव ( निपाणी ) येथील श्री हनुमान मंदिरात कार्तिक महिन्याच्या दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा विठ्ठल नामाच्या गजरात दररोज पहाटे काकडा दिंडी निघत आहे. घरासमोरुन काकडा दिंडी येत असल्यामुळे गावातील महीला पहाटे सडा सारवण करून रांगोळी काढून दिंडीतील वारकरीचे पाय धून स्वागत करतात. दिंडीचे आयोजक श्री हनुमान मंदिर पंचकमेटी सोनेगाव निपाणी असुन शेवटी टिपूर पौर्णिमेला टिपूर जाळून लगेच दुसऱ्यादिवशी गोपाळ काल्याचे कार्यक्रम करून वारकऱ्यांचे माणसन्मान केले जाते गावकरी कार्तिक महिना शांततेत पार पडतात हरिनाम पिढीन पिढी चालवतात त्यांचे आभार व्यक्त करताना पोलिस पाटील विजू कामडे म्हणाले श्री संत तुकाराम महाराज म्हणतातयसुखालागी आला या हो आनंदाच्या पूरय त्याच प्रमाणे हरी नामाने गावात सुख समृद्धी आनंदाच्या पूर येतो सर्व गावकरी व आयोजकाचे पोलिस पाटिल यांनी आभार मानले.

# पेंच व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारीला सुरुवात

## पर्यटकात आनंदाचे वातावरण, जर्मनीच्या महिला पर्यटकानी वेधले लक्ष



■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १४ :**

वनविभागाने १ जुलैपासून पर्यटकांसाठी जंगल सफारीवर बंदी घातल्याने पर्यटनप्रेमींमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. पावसाळ्यात जंगलातील रस्त्यांची दुरवस्था होत असल्याने पर्यटकांची वाहने अडकण्याचा धोका असतो तर हा कालावधी वन्यप्राण्यांच्या प्रजननाचा असल्याने त्यांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र दि.१२ ऑक्टोबर ला पेंच व्याघ्र प्रकल्पातील चोरबाहुली गेट पर्यटकांसाठी खुला करण्यात आला. यामुळे पर्यटनप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. चोरबाहुली वनपरिक्षेत्राने रोज होणाऱ्या वाघाच्या दर्शनाने व भीमा आणि सुब्रमण्यम नावाच्या हत्तीने पर्यटकांच्या मनात विशेष जागा मिळवली आहे. त्यामुळेच याठिकाणी पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते. विशेष म्हणजे आज सुरुवातीच्याच दिवशीच जर्मनीवरून आलेल्या विदेशी महिला पर्यटकाने सर्वांचे लक्ष वेधले.तर लहान मुलीच्या हाताने फीत कापून विधिवत जंगल सफारीला सुरुवात करण्यात आली. तसेच नव्याने भरती झालेल्या १४ गाईड यांना गणवेशासह गाईड किट वितरित करण्यात आली. मानसिंगदेव अभयारण्यात असलेल्या चोरबाहुली पर्यटन केंद्राला मोठ्या संख्येने भेट देण्याचे आव्हान यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे यांनी केले. यावेळी चोरबाहुलीचे वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे, क्षेत्रसहाय्यक सचिन ताकसांडे, क्षेत्रसहाय्यक गणेश खंडाईत, बोरडा येथील सरपंच तुळशीदास राऊत, उपसरपंच पंकज चौधरी, वनरक्षक, गाईड, जीप्सी चालक व पर्यटक उपस्थित होते.

# भाजपा तर्फे सक्करदरा पो.स्टेशन पोलीस निरीक्षकांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १४ :**

भारतीय जनता पार्टी बहादुरा च्या वतीने सक्करदरा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक यांना निवेदन बालू घोडमारे यांच्या नेतृत्वात देण्यात आले.बहादुरा परिसरात रोज वाढणारी गुन्हेगारी, जुगार, चोरी, मुलीची छेड व इतर विषय बाबतीत निवेदन देण्यात आले.

बहादुरा नगरपंचायत झाल्यापासून बहादूऱ्या चे शहरीकरण फार झपाट्याने वाढत असून नागरिक मोठ्या प्रमाणात राहायला येत आहेत. परंतु नागरिक कामावरून येतानी त्यांना वाढत्या गुन्हेगारी लोकांच्या त्रासाला समोरे जावे लागतो. बहादुरा नगराबाहेरील काही नागरिक अव्यध्य कामे करतात,त्यामुळे वस्तीतील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या सर्व बाबी पोलीस निरीक्षक यांना अवगत करून देण्यात आले. त्यांनी यावर काही उपाययोजना करण्यास सांगितले व बहादुरा फाट्यावर पोलीस चौकी तयार करून देण्याचे आश्वासन दिले. निवेदन देतेवेळी तालुका अध्यक्ष बालू घोडमारे, माजी जि. प. सदस्य सुभाष गुजरकर, भाजपा अध्यक्ष बहादुरा नरेंद्र नांदुरकर, वैद्यकीय आघाडी अध्यक्ष डॉ. अवध द्विवेदी, डॉ. देवेंद्र बेलखेडे, राहुल गायधने, समीर गायकवाड,राम कावडकर दिवाकर सेलोकर अश्वजीत नाईक,, बाबा बोकडे, सिद्धार्थ नगराळे, तुलाराम लांजेवार, प्रवीण श्रीरामे, व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## दिवाळी व छठ सणाच्या काळात नागपूर स्टेशनवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती मर्यादा

**नागपूर, दि. १४ :** दिवाळी व छठ सणाच्या काळात नागपूर रेल्वे स्टेशनवर जास्त गर्दीचे नियंत्रण आणि प्रवाशांच्या सुरळीत हालचालीसाठी मध्य रेल्वे, नागपूर मंडळ ने प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती मर्यादा घालण्याचा निर्णय घेतला आहे. ही मर्यादा १७ ऑक्टोबर २०२५ ते २७ अरॉक्टोबर २०२५ पर्यंत लागू राहणार आहे. या काळात फक्त खरे प्रवासी (लेपर षळवश रींशपसशीं) स्टेशन परिसरात प्रवेश करू शकतील, ज्यामुळे अत्याधिक गर्दी टाळता येईल आणि सर्वांसाठी सुरक्षा व सुविधा सुनिश्चित करता येईल. तथापि, वृद्ध / वरिष्ठ नागरिक, आजारी, निरक्षर किंवा स्वतःची काळजी घेऊ शकत नसलेल्या महिला प्रवाशांसोबत येणाऱ्या व्यक्तींना प्लॅटफॉर्म तिकीटाची सुविधा दिली जाईल. या मर्यादेबाबतची माहिती हिंदी व मराठी या द्विभाषिक नोटीस बोर्डद्वारे स्टेशनच्या प्रमुख ठिकाणी प्रदर्शित केली जाईल.

# नेताजी मार्केट येथील हार फुल दुकान कळमना मार्केट येथे स्थानांतरित करण्याची मागणी

नागपूर : हार फुल दुकानदार असोसिएशन जिल्हा नागपूरच्या वतीने पत्र परिषद घेण्यात आली. नागपूर मनपा अंतर्गत असलेले फुल बाजार मार्केट सिताबर्डी नागपूर येथील मार्केट कृषी उत्पन्न बाजार कळमना समितीत समाविष्ट करून घ्यावे. या मागणीसाठी फुल मार्केट हे मध्यभागी सीताबर्डीत असून वाहतुकीला व पार्किंगचा त्रास सतत वाढत आहे.

विदर्भातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. परंतु मार्केट ची व्यवस्था बरोबर नसल्यामुळे शेतकऱ्यांची लुटमार होत आहे. अनधिकृत रित्या पार्किंग असल्यामुळे गाडी ठेवण्या साठी मनमानी ५० ते १०० रुपये वसुली करतात. अशी सुद्धा पत्रकार परिषदेमध्ये यांनी सांगितले. सीताबर्डी फुल मार्केट मध्ये ओटा ची व्यवस्था केली असून सुद्धा काही लोकांनी रस्तावरच अतिक्रमण केले आहे.त्यासाठी जाणाऱ्या येणाऱ्या साठी खूप त्रास होतो म्हणून हा मार्केट कळमना येथे शिफ्ट व्हावा. अशी आमची हार फुल दुकानदारांची मागणी आहे. असे पत्रकार परिषदेमध्ये राजेश लांजेवार यांनी सांगितले. यावेळी सचिव राजेश लांजेवार, अध्यक्ष अरुण तितरमारे यांनी माहिती दिली आहे. यावेळी परिषदेत उपस्थितीत अरुण तितरमारे, राजेश लांजेवार, गणेश बोरकर, शिवराज बावनकर, नितीन गिरडकर, संजय जीभकाटे, विनोद बुटे, अक्षय साठवणे, आणि शेखर रणनवरे यांची उपस्थिती होती.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** नागपुर

L&T Finance

**गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव**

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे"** आणि **"जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक एक/अनेक | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | सुरक्षित कर्ज | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.मे. एम आर ट्रेडर्स (तिचे मालक श्री. राशिद शेख यांच्यामार्फत) 2.श्री. राशिद सिकंदर मोहम्मद शेख 3.श्रीम. रिझवाना राशिद मोहम्मद शेख | अशा आरसीसी रचनेचे सर्व भाग आणि खंड ज्याचा दुकान ब्लॉक क्र. 108 आहे, अधिमापन 13.50 चौ.मी. (145.31 चौ.फू), तळमजला, इमारतीचे नाव एनआयटी कमर्शिअल कॉम्प्लेक्स, 14 फूट उंची आणि समोर खाली येणारे शटर, एनआयटी नागपुरच्या मंजुरीप्राप्त आराखड्यामध्ये, इया स्ट्रीट स्कीम, खासरा क्र. 109, 94, 97 असलेल्या संपूर्ण जमिनीचा एक भाग, मौजे चिखली (देवस्थान), शीट क्र. 55, सीएस क्र. 119, एनएमसी क्र. 1322/ए/108 शी संलग्न, विभाग पूर्व, सोबत सदर इमारतीच्या सामाईक सेवांवरील, सोयी-सुविधांवरील हक्क, एपीएमसी कलमना मार्केट समोर स्थित, वॉर्ड क्र. 22, नागपूर, एनएमसीच्या आणि एनआयटीच्या हद्दीमध्ये आणि सदर भूखंड खालीलप्रमाणे सीमाबद्ध : सीमारेषा : पूर्व – पॅसेज; पश्चिम – दुकान ब्लॉक क्र. 118; उत्तर – दुकान ब्लॉक क्र. 109; दक्षिण – दुकान ब्लॉक क्र. 107 | NGPHL18000125/ NGPHL20000051 | 22 जुलै 2025 | रु. 63,627.90/- | 11/11/2024 रोजी दिनांकित मागणी सूचनेनुसार दिनांक 10/11/2024 रोजीनुसार रु. 20,63,061.99 /- | रु. 6,36,279/- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 अ.च्र् ते 5.30 ग्र.च्र् या वेळेत पूर्व भेटीसह. | 20.11.2025 दुपारी 12:30 ते दुपारी 2.00 पर्यंत |

**सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलाबत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 19/11/2025 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई - लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 20/11/2025 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 21/11/2025 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, इच्छुक बोलीदारांनी प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा : **नाव - श्री. शेखर काळे, आणि संतोष तिवारी, एल&टी फायनान्स लि. संपर्क क्र. 022-68076666.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली / प्रस्ताव स्वीकारू / नाकारू / बदलू / रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**दिनांक:** 15.10.2025
**ठिकाण:** नागपुर

# महायुती व महाविकास आघाडीतच होणार

## कुणाला मिळणार तिकीट, नगराध्यक्ष होणार कोण?

■ महासागर प्रतिनिधी
**मौदा , दि. १२ :**

मौदा नगरपंचायत निवडणूक २०२५ निवडणुकीसाठी आता थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडले जाणार असून मौदा नगर पंचायतचे नगराध्यक्षपद यंदा सर्वसाधारण प्रवर्गासाठी निश्चित झाले आहे. ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या आरक्षण सोडतीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मौदा शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ही निवडणूक महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे माजी आमदार टेकचंद सावरकर, कॉंग्रेस नेते सुनील केदार व सुरेश भोयर यांच्यासाठी ही प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीला आता काही कालावधी बाकी असला तरीही महायुती आणि महाविकास आघाडी व इतर पक्षांतील कार्यकर्त्यांनी चांगली कंबर कसली आहे. मात्र, या निवडणुकीत उमेदवारांची खरी कसोटी लागणार आहे. हा गड कोण सर करणार याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मौदा नगर पंचायत नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुलं झाल्याने अनेकांना चांगलीच संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विविध सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तींनी या पदासाठी रस दाखविला आहे. माजी नगरसेवक तसेच नवे चेहरेही इच्छुकांच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. दरम्यान, मौदा येथे नगरपंचायतीच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामांचा आणि नागरिकांच्या अपेक्षांचा मुद्दा या निवडणुकीत महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. जनतेकडून पारदर्शक प्रशासन आणि मूलभूत सुविधा याबाबतीत अपेक्षा वाढल्या आहेत. राजकीय चर्चामधून पुढील काही दिवसांत संभाव्य उमेदवारांची नावे अधिक स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर भाजपा कडून राजू सोमनाथे, मोरेश्वर सोरते, यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून कॉंग्रेस कडून राजेश निनावे. शुभम तिघरे, किशोर सांडेल, यांचे नावे आघाडीवर असले तरी खरी लढत पहायची झाल्यास माजी नगराध्यक्ष उमेश गभने हे कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढतात याकडे सुद्धा शहर वासियांचे लक्ष लागले आहे. उमेश गभणे यांनी जर शिवसेना शिंदे गट यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवली तर यात भाजपा आणि कॉंग्रेसला मोठी अडचण निर्माण होणार आहे व दोन्ही पक्षांची मोठी डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा सध्या मौदा शहरात सुरू आहे. या निवडणुकीत मौदा नगर पंचायत साठी महायुती व महाविकास आघाडी मधील खरी लढाई पहायला मिळणार आहे, तर शहरात इतर पक्षातील इच्छुकांनी आतापासून निवडणुकीच्या मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. यात सध्या माजी नगराध्यक्ष भारती सोमनाथे यांचे पती राजू सोमनाथे यांचे नाव चर्चेत आहे.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
सिग्नलिंगचे काम

निविदा सूचना क्रमांक **SUR-N-T-2025-26-19** तारीख: १३.१०.२०२५ भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या / कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे: कामाचे नाव त्याच्या परिसरासह: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात विविध वस्तू शेड आणि चेंजिंग रूमच्या विकासासाठी एफओआयएस नेटवर्कसह दूरसंचार सुविधेची तरतूद / स्थलांतर. कामाची अंदाजे किंमत: रु. १,२२,४५,६६८.६६. निविदा फॉर्मची किंमत: शून्य. बयाणा रक्कम जमा करायची आहे: रु. २,११,२००.००/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: ८ महिने. **www.ireps.gov.in** वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ दि. ०४.११.२०२५ रोजी १५:३० वाजल्यानंतर. तपशील आयआरईपीएस वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा/शुद्धी असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/ पोस्टल/ ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग ३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. बयाणा रक्कम (ईएमडी) फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारली जाईल. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

डीआरएम (एस अँड टी शाखा)
मध्य रेल्वे, सोलापूर

APEX-76

टिकट के लिए यूटीएस ऐप डाउनलोड करें

# वाचन प्रेरणा दिन!

वाचन प्रेरणा । दिनाच्या शुभेच्छा ।
मनस्वी सदिच्छा । वाचकांना ॥
वाचन संस्कृती । वृद्धिंगत करू ।
वाचन ते सुरू । नियमित ॥

भारतरत्न डॉ.अबुल पाकीर जैनुलबदिन अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवशी म्हणजे १५ ऑक्टोबरला ' वाचन प्रेरणा दिन ' म्हणून साजरा केला जातो.डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे झाला. ते भारताचे अकरावे राष्ट्रपती,प्रख्यात वैज्ञानिक आणि 'मिसाइल मॅन' म्हणून ओळखले जातात. डॉ.अब्दुल कलाम यांना ९४ व्या जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन ॥

-------------

बालपणापासूनचे त्यांचे संघर्षमय जीवन,त्यांचे अनमोल विचार आणि त्यांचे सत्कर्म हे भारतीयांसाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी प्रेरणास्त्रोत आहे.

वाचकांचे असे । कलाम प्रेरक ।
घडती वाचक । जीवनात ॥

' वाचनाचा नाद म्हणजे ज्ञानाचा झरा ' असे ते समजत असत.वाचन हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला होता.त्यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले,वाचलेल्या पुस्तकातील ज्ञानाचे चिंतन आणि मनन केले त्यातूनच त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडत गेले.डॉ.अब्दुल कलाम यांचे 'अग्निपंख' (Wings of Fire) हे आत्मचरित्र संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे,प्रज्वलित मने,भारत २०२० : नव्या सहस्त्रकाचा भविष्यवेध आणि 'अदम्य जिद्द',

स्क्वेअरिंग द सर्कल सेवन स्टेप्स टू इंडियन रेनेसांस (भारतीय प्रबोधनपर्व ३ वैभवशाली भारताची आगामी दिशा.)अशी अनेक पुस्तके डॉ.कलाम यांच्या सिद्धहस्त लेखनीतून निर्माण झालेली आहेत.जी युवकांनाच नव्हे तर सर्वांना प्रेरणादायी ठरलेली आहेत.

डॉ.अब्दुल कलाम यांनी केलेल्या भाषणामध्ये नेहमीच युवापिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी सतत प्रयत्न केले.त्यांना प्रोत्साहन दिले.पुस्तक प्रेमी असलेले डॉ. कलाम यांना पुस्तक हे ज्ञानाचा सागर वाटत असे म्हणूनच ते पुस्तकांना 'उत्तम गुरू' मानत असत.


कलामांचे खरे । ग्रंथ हेच गुरू ।
वाचन ते सुरू । रात्रंदिन ॥

त्यांच्या या पुस्तक वाचून महान बनण्याच्या प्रेरणेतूनच महाराष्ट्रात त्यांचा जन्मदिवस हा ' वाचन प्रेरणा दिन ' म्हणून साजरा करतात. 'वाचनाचे महत्त्व प्रत्येकाला समजले पाहिजे,यासाठी या वाचन प्रेरणा दिनाचे मोल अनमोल आहे. वाचन प्रेरणा दिनाचा 'समाजात,विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा उद्देश आहे. वाचकाला ज्ञानाने समृद्ध करणारे वाचन प्रत्येकाने केले पाहिजे.

नवविचार, नवसंकल्पना आणि संस्कृतींची ओळख वाचनामुळे वाचकाला होते. कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलताही वाढते. विचारशक्ती आणि एकाग्रता सुधारण्यास मदत करणाऱ्या वाचनावर प्रत्येकाने प्रेम केले पाहिजे.वाचनामुळे मानसिक व्यायाम मिळतो ज्यामुळे वाचकाचे मन अधिक तीक्ष्ण होते; कारण वाचकाला वाचनामुळे ज्ञानाचा सागर मिळतो.

रिते न होणारे । शब्दांचे भंडार ।
ज्ञानाचा सागर । पुस्तकच ॥

पुस्तक वाचनामुळे विविध लेखकांच्या दृष्टिकोनातून जग पाहण्याची संधी वाचकाला मिळते. यामुळे जीवनातील समस्यांकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी विकसित होते. वाचन आपले शब्दभांडार वाढवते आणि भाषेवर प्रभुत्व मिळविण्यास मदत करते. चांगले वाचन,चांगले लेखन आणि चांगले बोलणे याला आधार देते.तणाव कमी करण्यासाठी वाचन हा एक प्रभावी उपाय आहे.



प्रा. अरुण बाबाराव बुंदेले
अमरावती. ८०८७७४८६०९
डॉ. हरिवंशराय बच्चन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त साहित्यिक

तनाव मुक्तीच्या। आनंदात असे ।
लाभ मिळतसे । वाचकाला ॥

शांत ठिकाणी बसून वाचनात रमल्याने मनःशांती मिळते. आजचे तंत्रज्ञानाचे युग म्हणजे भ्रमणध्वनी व इंटरनेटचे आहे.आजचा युवक हा मोबाईलच्या इतका आहारी गेलेला आहे की त्याला मोबाईल समोर काहीच सुचत नाही. युवक चार चौघात जरी बसलेला असला तरी प्रत्येक युवक हा आपल्या मोबाईलमध्ये मग्न असतो.त्यांच्यातील संवाद सुद्धा संपुष्टात येत आहे. अशा युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आवश्यक आहे.

मोबाईल जग । बाजूला सारून ।
करावे वाचन । युवकांनी ॥

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम राबवून अशा युवकांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.अशा युवकांनी त्यांना आवडणाऱ्या पुस्तकांचे वाचन करून वाचन प्रेरणा दिनाची सुरुवात करावी. पंधरा ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विविध उपक्रम आयोजित केले पाहिजे.या उपक्रमांमध्ये ग्रंथ प्रदर्शन,कथाकथन,पुस्तक चर्चा, निबंध स्पर्धा आणि लेखकांच्या मुलाखती घेतल्या पाहिजे. या दिवशी डॉ.अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांचे - विचारांचे वाचन केल्यानंतर चिंतन - मनन करून त्यांच्या कार्याला नमन केले पाहिजे - वंदन केले पाहिजे, सलाम केला पाहिजे. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त थोर पुरुषांच्या जीवनगाथा, संतांचे बोधपर अभंग, थोरांची आत्मचरित्रे, कथा, कविता आणि इतर विविध जीवनाला कलाटणी देणारे माहितीपर पुस्तके वाचायला हवीतच. यासाठी स्वतःच्या दैनंदिनीमध्ये सर्वांनी दररोज वाचनासाठी वेळ राखून ठेवणे आवश्यक आहे.वाचनामुळे वाचकांचे जीवन ज्ञानमय व अर्थपूर्ण होते.

वाचक जीवन । होई ज्ञानमय ।
कशाचे ना भय । जीवनात ॥

वाचक वाचनामुळे उत्तम प्रकारे जीवन जगू शकतो. वाचकांचे जीवन वाचनामुळेच आनंदी, सुखमय व भयमुक्त होते.या वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा संकल्प प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

ग्रंथांना गुरू मानून विविध ग्रंथातील ज्ञान ग्रहण करून स्वतः सोबतच इतरांचेही जीवन समृद्ध करणाऱ्या डॉ.अबुल पाकीर जैनुलबदिन अब्दुल कलाम यांना त्यांच्या ९४ व्या जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन ॥

कलाम कर्मांना । करितो नमन ।
करांनी वंदन । जन्म दिनी ॥

# दृष्टिहीनांच्या आत्मविश्वासाचा प्रकाशमार्ग

## पांढरी काठी



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)




जगात डोळे हे ज्ञानाचे, अनुभूतीचे आणि ओळखीसाठीचे सर्वात सामर्थ्यवान माध्यम मानले जाते. परंतु या डोळ्यांशिवायही अनेक व्यक्ती जग पाहतात ते मनाच्या डोळ्यांनी, संवेदनांच्या माध्यमातून, अनुभवाच्या प्रकाशातून. या अशा दृष्टिहीन व्यक्तींच्या स्वावलंबनाचे, सन्मानाचे आणि सामाजिक समानतेच्या अधिकाराचे प्रतीक म्हणजे पांढरी काठी होय. म्हणूनच दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस ‘‘जागतिक पांढरी काठी दिन’’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ दृष्टिहीनांच्या सन्मानाचा नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या स्वातंत्र्यपूर्ण जीवनाचा आदर करावा, याची आठवण करून देणारा आहे.

पांढऱ्या काठीचा इतिहास विसाव्या शतकाच्या आरंभीचा आहे. १९२१ मध्ये, इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहरातील छायाचित्रकार जेम्स बिग्स यांनी अपघातामुळे दृष्टी गमावली आणि रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्यासाठी आपल्या चालण्याच्या काठीला पांढरे रंग लावले, ज्यामुळे ती वाहनचालकांना दिसू शकली.

१९३१ मध्ये, फ्रान्समधील गिल्ली द 'हबेमॉंट यांनी पांढऱ्या काठीचा वापर दृष्टिहीनांसाठी सुरू केला. १९३१ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या एका समारंभात त्यांनी दोन पांढऱ्या काठी दृष्टिहीनांना दिल्या, ज्यात एक अंध सैनिक आणि एक अंध नागरीक होते. यानंतर ५,००० पांढऱ्या काठी फ्रान्समधील अंध सैनिक आणि नागरिकांना वितरित करण्यात आल्या.

या घटनांमुळे पांढरी काठी दृष्टिहीनांसाठी एक महत्त्वपूर्ण चिन्ह बनली, ज्यामुळे त्यांची सुरक्षितता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यात मदत झाली. या काठीचा रंग पांढरा ठरविण्यामागे एक समाजशास्त्रीय विचार होता तो म्हणजे पांढरा रंग म्हणजे प्रकाश, शांती, सन्मान आणि दृष्टीचे प्रतीक होय. हा रंग इतर वाहनचालकांना किंवा नागरिकांना दृष्टिहीन व्यक्ती असल्याची ओळख देतो. १९६४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी अधिकृतरीत्या १५ ऑक्टोबर हा ‘White Cane Safety Day’ म्हणून जाहीर केला. पुढे तो दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर World White Cane Day म्हणून साजरा होऊ लागला.

आज या दिवशी जगभरातील संस्था, सरकारे आणि स्वयंसेवी संघटना दृष्टिहीनांच्या स्वावलंबनासाठी कार्य करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करतात.

पांढरी काठी ही केवळ चालण्याचे साधन नाही, ती स्वाभिमानाचे प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला आपल्या आजूबाजूच्या वातावरणाची जाणीव करून देणारी ही काठी त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. काठीच्या साहाय्याने ते रस्त्यांवर सुरक्षितपणे चालू शकतात, अडथळे ओळखू शकतात, दिशांचा अंदाज घेऊ शकतात.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर पांढरी काठी ही ‘‘स्वावलंबनाचे’’ आणि ‘‘समानतेचे’’ प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला मदतीवर अवलंबून राहावे लागत नाही, तर तो स्वतःच्या सामर्थ्याने समाजात मुक्तपणे वावरतो. हीच खरी दृष्टी आहे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची, स्वातंत्र्याची आणि मानवी प्रतिष्ठेची.

जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार, जगभरात सुमारे २८५ दशलक्ष लोक काही ना काही प्रकारच्या दृक्दोषाने ग्रस्त आहेत, त्यापैकी अनेक लोक पूर्णतः दृष्टिहीन आहेत.

भारतातही दृक्दोषाचे प्रमाण चिंताजनक असून, अनेक लाख लोक विविध प्रकारच्या दृष्टिदोषाने प्रभावित आहेत. या परिस्थितीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्था नेत्रदान, मोफत शस्त्रक्रिया, शिक्षण व रोजगार यासारख्या उपक्रमांद्वारे उपाययोजना करत आहेत.

ग्रामीण भारतात अंधत्वाचे प्रमाण अधिक आहे, कारण आरोग्य सुविधा, जागरूकता आणि नेत्रोपचार या क्षेत्रांमध्ये अजूनही मोठी दरी आहे. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत भारत सरकारने अनेक प्रयत्न सुरू केले आहेत. नेत्रदानाचे अभियान, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, दृष्टिहीनांसाठी शिक्षण व रोजगारसंधी यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे. परंतु समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे, आणि या क्षेत्रात दृष्टिहीनांसाठी संधीचे नवे दरवाजे उघडले आहेत. ब्रेल लिपी, स्क्रीन रीडर सॉफ्टवेअर, टॉकिंग बुक्स, ऑडिओ-लायब्ररीज, अॅप-बेस्ड नेव्हिगेशन सिस्टम्स यामुळे दृष्टिहीन व्यक्ती आता शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, संगणकशास्त्र, संगीत, कला, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत पुढे जात आहेत.

भारतातील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर द एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ व्हिज्युअल डिसॅबिलिटीज , देहरादून हे संस्थान दृष्टिहीनांसाठी प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन पुरविते. महाराष्ट्रात हेलन केलर इन्स्टिट्यूट फॉर ब्लाइंड, नाशिक ब्लाइंड स्कूल, पुण्यातील नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड अशा संस्था दृष्टिहीनांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक समावेशनासाठी कार्यरत आहेत.

पांढरी काठी ही अनेक देशांत कायद्याने मान्यता प्राप्त आहे. भारतात Rights of Persons with Disabilities Act, 2016 अंतर्गत दृष्टिहीन व्यक्तींना शिक्षण, रोजगार, वाहतूक, सार्वजनिक सुविधा आणि मतदानाचा समान अधिकार दिला आहे. सार्वजनिक ठिकाणी ब्रेल संकेत, साउंड सिग्नल्स, स्पर्शवाचक नकाशे, आणि सुरक्षित पादचारी मार्ग या सुविधा पुरविणे ही सरकारची जबाबदारी ठरविण्यात आली आहे.

पांढरी काठी वापरणाऱ्या व्यक्तींचा सन्मान राखणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक कर्तव्य आहे. पादचारी किंवा वाहनचालकांनी रस्त्यावर पांढरी काठी पाहिली, तर त्यांनी थांबून त्या व्यक्तीला सुरक्षित मार्ग द्यावा, हा ‘White Cane Safety’ चा मूलभूत नियम आहे.

समाजातील अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हे दृष्टिहीनांच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठे अडथळे आहेत. अंधत्व म्हणजे अपंगत्व नव्हे, हे जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. दृष्टिहीन व्यक्ती आपल्या संवेदना, बुध्दी आणि प्रतिभेच्या जोरावर समाजाचे महत्त्वाचे घटक ठरू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे.

जगप्रसिद्ध पियानिस्ट रे चार्ल्स, गायिका स्टीव्ही वंडर, भारतातील डॉ. बेनजामिन दोरिसवामी किंवा दीपक महालांकर यांसारख्या व्यक्तींनी अंधत्वावर मात करून जीवनाचे नवे आदर्श निर्माण केले. हे सर्व दाखवून देतात की काठीचा रंग पांढरा असला तरी त्या मागचा आत्मविश्वास मात्र तेजस्वी आहे.

जागतिक पांढरी काठी दिन (World White Cane Day) हा केवळ स्मरणदिन नाही; तो एक जागरूकता चळवळ आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करतात. जसे की दृष्टिहीनांसाठी वॉकाथॉन, पांढऱ्या काठीच्या रॅली, सार्वजनिक परिसंवाद, कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम. याचा हेतू समाजाला सांगणे हा आहे की दृष्टिहीन व्यक्ती दया किंवा सहानुभूतीच्या नाही, तर सन्मानाच्या पात्र आहेत.

शेवटी, पांढरी काठी ही अंधत्वाचे प्रतीक नाही, तर मानवी दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. ती अंधारातही आशेचा दिवा प्रज्वलित करते, निर्बंधांना आव्हान देते आणि प्रत्येक दृष्टिहीन व्यक्तीला स्वतःच्या सामर्थ्यावर चालण्याची प्रेरणा देते.जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक मनात जर आपण पांढऱ्या काठीला सन्मानाने वाव दिला, तर ते समाज म्हणून आपल्या प्रगल्भतेचे द्योतक ठरेल. जागतिक पांढरी काठी दिन हा आपल्याला शिकवतो की दृष्टी फक्त डोळ्यांत नसते; ती मनात, आत्म्यात आणि माणुसकीत असते. म्हणूनच या १५ ऑक्टोबरला, पांढऱ्या काठीचा सन्मान करा, दृष्टिहीनांच्या हक्कांचा आदर करा आणि समाजात ‘‘दृष्टी’’ म्हणजेच ‘‘संवेदना’’ हा खरा प्रकाश आहे, ही जाणीव पसरवा.

# रेखा : सौंदर्यावर शैक्षणिक अभ्यासक्रम



सुंदर अभिनेत्री रेखा तीन दिवसांपूर्वी ७१ वर्षांच्या झाल्या. गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ त्यांनी आपल्या दमदार अभिनयाने, ट्रेंडसेटर शैलीने आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाने इंडस्ट्रीमध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. उमराव जान, खून भारी मांग, सिलसिला, खूबसूरत आणि इतर अनेक चित्रपटांमधील त्यांच्या अभिनयाने लाखो लोकांच्या मनाला स्पर्श केला आहे. तथापि, हा उच्च दर्जा मिळवणे सोपे नव्हते.

रेखांना कधीकधी त्यांच्या वाढत्या वजनाबद्दल टोमणे मारले जायचे आणि शशी कपूरनेही त्यांनी काळी आणि जाड म्हटले. पण आज रेखाच्या सौंदर्यावर शैक्षणिक अभ्यासक्रम चालवले जात आहेत.

रेखांचे खरे नाव भानुरेखा गणेशन आहे. त्यांचे वडील दक्षिण भारतीय अभिनेता जेमिनी गणेशन होते आणि त्यांची आई अभिनेत्री पुष्पवल्ली होती. रेखांचा जन्म अशा आईवडिलांच्या पोटी झाला ज्यांचे अद्याप लग्न झालेले नव्हते.

जेमिनी गणेशन आधीच विवाहित होते आणि त्यांना अनेक मुले होती. पुष्पवल्ली यांना मागील लग्नापासून दोन मुले होती. घटस्फोटाला मान्यता नसल्याने ते दोघे लग्न करू शकले नाहीत. म्हणूनच जेमिनी गणेशन यांनी रेखाला दत्तक घेतले नाही किंवा त्यांना नाव दिले नाही. रेखांच्या धाकट्या बहिणीच्या जन्मानंतर, जेमिनी गणेशन यांनी तिसरे लग्न केले आणि कुटुंबाशी जवळजवळ संबंध तोडले. त्यांच्या आईने छोट्या-मोठ्या भूमिका करत मुलांचे संगोपन केले.

कौटुंबिक संघर्षांमुळे रेखांना तिच्या सुरुवातीच्या शिक्षणात अनेक अडचणी आल्या. जास्त वजनामुळे त्यांची अनेकदा थट्टा केली जात असे, ज्यामुळे त्यांना नृत्य आणि खेळांमध्ये रस असूनही त्या त्यात रस घेण्यास कचरत असे.

चित्रपटांबद्दल बोलायचे झाले तर, रेखांनी वयाच्या तिसऱ्या वर्षी अभिनयाला सुरुवात केली. त्यांना कधीही अभिनेत्री व्हायचे नव्हते, परंतु कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची होती आणि आईच्या आग्रहावरून त्यांनी चित्रपटांमध्ये काम करायला सुरुवात केली.

वयाच्या चौथ्या वर्षी त्यांनी 'इंटी गुट्टू' (१९५८) या तेलुगू चित्रपटातून बाल कलाकार म्हणून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी १९६८ च्या तेलुगू चित्रपट 'रंगुला रत्नम' मध्ये काम केले.

रेखांच्या बॉलिवूडमधील प्रवेशाबद्दल बोलताना, निमार्ता कुलजीत पाल त्यांच्या चित्रपटासाठी एका प्रमुख अभिनेत्रीच्या शोधात होते. कोणीतरी त्यांना रेखा नावाच्या एका दक्षिण भारतीय अभिनेत्रीबद्दल सांगितले जी थोडी हिंदी बोलते. त्यानंतर कुलजीत पाल रेखांना भेटले आणि विचारले की त्यांना चित्रपटात काम करायचे आहे का आणि हिंदी बोलू शकते का. रेखांनी दोन्ही प्रश्नांना नाही म्हटले.

तथापि, असे असूनही, कुलजीत पाल यांनी दुसऱ्या दिवशी ऑडिशनसाठी येण्याचा आग्रह धरला. रेखा यांनी स्क्रीन टेस्टमध्ये काही हिंदी वाक्ये लक्षात ठेवली, ज्यामुळे पाल प्रभावित झाले आणि त्यांनी त्यांना पाच वर्षांच्या करारासाठी साइन केले, ज्यामध्ये चार चित्रपटांचा समावेश होता. अशाप्रकारे, रेखा यांची त्यांच्या पहिल्या चित्रपट 'अंजाना सफर' साठी निवड झाली.

अशाप्रकारे, रेखा वयाच्या अवघ्या १३-१४ व्या वर्षी स्वप्नांच्या नगरी मुंबईत पोहोचल्या आणि त्यांच्या पहिल्या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू केले. तथापि, त्यांचा बॉलिवूडमधील प्रवास सोपा नव्हता. त्यांच्या रंगछट, वजन आणि मोडक्या हिंदीमुळे त्यांना अनेकदा टोमणे मारले जायचे. काहींनी त्यांना मद्रासन (दक्षिण भारतीय मुलगी) असेही म्हटले.

रेखांचा पहिला हिंदी चित्रपट अंजना सफर होता, परंतु सेन्सॉरशिपच्या अडचणींमुळे तो दहा वर्षांनी 'दो शिकार' म्हणून प्रदर्शित झाला. म्हणूनच, त्यांचा पहिला हिंदी चित्रपट 'सावन भादों' (१९७०) होता. रेखा यांच्यावर चरित्र लिहिणारे यासिर उस्मान त्यांच्या पुस्तकात लिहितात की, सावन भादो चित्रपटाच्या प्रीमियर दरम्यान शशी कपूर म्हणाले होते, ‘‘ही काळी, जाड आणि विचित्र दिसणारी अभिनेत्री कशी यशस्वी होईल? तथापि, हा चित्रपट हिट ठरला आणि रेखांना रातोरात ओळख मिळवून दिली.

रेखांनी त्यानंतर रामपूर का लक्ष्मण, कहानी किस्मत की, आणि प्राण जाये पर वचन ना जाये सारख्या चित्रपटांमध्ये काम केले. हे चित्रपट हिट ठरले, पण त्यांच्या अभिनयाचे फारसे कौतुक झाले नाही.

१९७६ मध्ये 'दो अंजाने' आणि १९७८ मध्ये 'घर' आणि 'मुकद्दर का सिकंदर' सारख्या चित्रपटांमध्ये समीक्षकांनीही त्यांच्या अभिनयाचे कौतुक केले. त्यांना खूबसूरत साठी पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. त्यांनी सिलसिला, उमराव जान, आणि इजाजतयांसारख्या चित्रपटांमध्ये देखील काम केले. उमराव जानसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

रेखा अशा अभिनेत्रींपैकी एक मानल्या जातात ज्यांचे वैयक्तिक आयुष्य चित्रपट कारकिर्दीइतकेच चर्चेचा विषय होते. १९७१ मध्ये रेखांना जितेंद्र यांच्यासोबत 'एक बेचारा' या चित्रपटात साइन करण्यात आले होते. त्यावेळी जितेंद्र अविवाहित होते आणि त्यांच्या लोकप्रियतेच्या शिखरावर होते. त्यांच्या प्रेमसंबंधाच्या अफवा समोर आल्या. शिमलामध्ये शूटिंग दरम्यान ते जवळ आले आणि मुंबईत परतल्यानंतर त्यांचे नाते अधिक घट्ट झाले.

'एक बेचारा' या चित्रपटाच्या यशानंतर दोघांनीही 'अनोखी अदा' हा चित्रपट साइन केला, पण रेखांना जेव्हा कळले की जितेंद्र यांची आधीच एक प्रेयसी शोभा आहे. रेखा आणि जितेंद्र यांनी 'एक बेचारा', 'मांग भरो सजना' आणि 'जुदाई' यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे.

रेखांसाठी हा धक्का होता. हार्ट ब्रेकनंतर, त्यांना जाणवले की हे नाते जितेंद्रसाठी फक्त एक मनोरंजन आहे. चित्रीकरणादरम्यान, त्यांचे भांडण इतके वाढले की ते सेटवर सार्वजनिक झाले. एके दिवशी, जितेंद्र यांची टिप्पणी ऐकल्यानंतर, रेखा रडल्या आणि त्यांनी बोलणे बंद केले. चित्रपट पूर्ण झाला आणि नाते संपले.

जितेंद्रनंतर रेखांच्या आयुष्यात विनोद मेहरा आले. दोघेही अनेकदा हातात हात घालून, लांब ड्राइव्हवर आणि ताज हॉटेलमध्ये रात्री उशिरा जेवण करताना एकत्र दिसायचे. रेखा त्यांना प्रेमाने विन-विन म्हणत असे. रेखांसाठी, विनोद मेहरा हा असा माणूस होता जो त्यांच्यावर निःस्वार्थ प्रेम करत असे. त्यांच्या वाद आणि नकारात्मक मीडिया प्रतिमेला न जुमानता ते त्यांना पाठिंबा देत असे.

------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# भेसळयुक्त मिठाई - लोकांच्या जीवाशी खेळ!

## वाचक लिहितात



सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

नोएडातील सेक्टर ११५ मधील एका मिठाई बनवणाऱ्या युनिटवर दिल्लीच्या अन्न सुरक्षा विभागाने हल्लीच छापा टाकून ११०० किलो भेसळयुक्त मिठाई जप्त करून ती जागेवरच नष्ट केली. याच विभागाने जीबी नगर परिसरात आणखी एका ठिकाणी छापा टाकून १८० किलो भेसळयुक्त मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थ जप्त केले. जयपूरच्या अन्न सुरक्षा विभागानेही अशाच एका कारवाईत ३५० किलो भेसळयुक्त मिठाई. ६५० किलो बनावट मिल्क केक आणि ५०० लिटर नकली दूध जप्त करून ते नष्ट केले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील अन्न आणि औषध प्रशासनाने सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा मोहिमेच्या अंतर्गत ३६ लाख रुपयांचा तब्बल ३० हजार किलो निकृष्ट आणि भेसळयुक्त अन्नसाठा जप्त केला. दूध, मिठाई, तूप, पनीर, फरसाण यांसारख्या पदार्थांचे नमुने तपासले असता अनेक ठिकाणी भेसळ आढळली. दिवाळी जवळ आली कि मिठाईत भेसळ करून ती चढ्या दारात विकणाऱ्यांचे सर्वत्र पेव फुटते. या काळात सर्वत्र गोडधोडाचे वातावरण असल्याने घसा खवखवणे, खोकला सुरु होणे यांसारखे त्रास जाणवू लागले तरी ते मिठाईमुळे होत आहेत कि घरात बनवलेल्या तेलकट फराळामुळे ते कळत नाही. या दिवसांत प्रशासनाचा अन्न आणि औषध विभाग अलर्ट मोडवर असतो. कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या लोभाने ही भेसळयुक्त मिठाई बनवली जाते.

भेसळयुक्त पेढे किंवा मिठाई खाल्यास घशात खवखव होते, खोकला येतो आणि पोटात दुखते. चक्कर येणे, पोटात मळमळणे , उलटी, जुलाब सुरु होणे यांसारखे परिणाम जाणवू लागतात. काविळसारख्या आजाराची लागण होऊ शकते. किडनी आणि यकृतावरही भेसळयुक्त मिठाईचा गंभीर परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही, तर विषबाधा अधिक झाल्यास खाणाऱ्याचा मृत्यूही ओढावू शकतो. भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास क्षयरोग होऊ शकतो. कृत्रिम दुधात युरियाची भेसळ असल्यास युरियातील नायट्रोजनमुळे मूत्रपिंड, यकृत आणि हृदय निकामी होऊ शकते. मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे दूध केमिकलयुक्त असल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत निष्पन्न झाल्यास भारतीय दंड विधान ३२८ कलमान्वये अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येतो.

मिठाईसाठी वापरण्यात आलेल्या दुधात पाणी आणि दुधाची पावडर मिश्र केल्याचे आढळल्यास २६२ कलमान्वये गुन्हेगारास आर्थिक दंड ठोठावण्यात येतो. असे असूनही प्रतिवर्षी मिठाईत केल्या जाणाऱ्या भेसळीचे प्रमाण कमी न होता दरवर्षी त्यांमध्ये वाढच होत आहे. गणेशोत्सव आणि दिवाळीच्या काळात अनेक ठिकाणी भेसळयुक्त मिठाई सर्रासपणे विकली जाते. आर्थिक लाभासाठी पामतेलाचा वापर करून खवा बनवणे. कृत्रिम आणि केमिकलयुक्त दूध तयार करून त्यापासून मिठाई बनवणे यासारखे प्रकार सणासुदीच्या काळात प्रकर्षाने घडतात. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा महाभागांना खरेतर कठोर शिक्षा होणे अपेक्षित आहे; मात्र अनेकदा ही मंडळी कायद्यातील पळवाटांचा लाभ घेऊन निर्दोष सुटतात किंवा जामिनावर बाहेर पडतात. यांमध्ये कायद्याचे भय न राहिल्याने दरवर्षी भेसळयुक्त मिठाई बनवून विकणाऱ्यांमध्ये वाढच होताना दिसत आहे. यांच्यावर कायमस्वरूपी वचक बसण्यासाठी कठोर कायद्यासह जनमानसांत जागृती होणे नितांत गरजेचे आहे. लोकांच्या जीवाचे सोयरसुतक नसणाऱ्यांना खरेतर आता जनतेनेच धडा शिकवायला हवा !

# मटण खरेदी करताना या गोष्टी नक्की लक्षात ठेवा



नॉनवेज मध्ये जसे काहीजण चिकनप्रेमी असतात तसेच मटण प्रेमी देखील असतात. पण मटणप्रेमींनी काही गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते अन्यथा नुकसान सहन करावे लागू शकते. कधीकधी, घाई किंवा ज्ञानाच्या अभावामुळे, लोक असे मटण खरेदी करतात जे चांगले दिसते परंतु आतून कुजलेले असते. यामुळे केवळ डिशची चवच खराब होत नाही तर पोटाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. जर तुम्हाला तुमचे मटणाचे पदार्थ नेहमीच ताजे हवे असतील तर मटण खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवणे महत्वाचे आहे.

बऱ्याचदा, शिळे मटण रंगवले जाते किंवा त्यावर रसायनांची प्रक्रिया केली जाते जेणेकरून ते नवीन दिसतील. ज्यामुळे ते ओळखणे कठीण होते. म्हणून, तुम्हाला मटणाची गुणवत्ता, सुगंध आणि रंगावरून त्याचा ताजेपणा ठरवायला शिकले पाहिजे. लक्षात ठेवा, ताजे मटण केवळ चवीलाच चांगले नसते तर आरोग्यासाठी देखील सर्वोत्तम असते.

**मटणाचा रंग पाहा :** चांगले मटण नेहमीच हलके लाल किंवा गुलाबी असते. जर त्याचा रंग खूप गडद लाल किंवा तपकिरी दिसत असेल तर याचा अर्थ असा की ते शिळे आहे किंवा बऱ्याच वेळापासून उघड्यावर साठवले गेले आहे. ताजे मटण नेहमीच थोडे चमकदार दिसते, तर शिळे मटण सामान्यतः निस्तेज असते.

**मटण त्याच्या सुगंधावरून ओळखा :** ताज्या मटणाचा सुगंध सौम्य आणि ताजा असतो. जर मटणाचा वास उग्र किंवा आंबट असेल तर ते खराब झाले असल्याचे संकेत असतात. खराब झालेल्या मटणाला तीव्र आणि अनैसर्गिक वास येतो. म्हणून, खरेदी करण्यापूर्वी त्याचा वास एखदा पाहा.

मटणावर हलक्या हाताने दाब दिल्यावर जर ते लगेच दाबले जात असेल तसेच हाताला मऊ लागत असेल तर ते ताजे आहे. परंतु, जर दाब दिल्यावर त्यावर बोटाचा ठसा उमटला आणि पाण्यासारखा द्रव बाहेर पडला तर ते खराब झाले असे समजावे.

**चरबीचा थर तपासा :** चांगल्या मटणातील चरबी पांढरी आणि गुळगुळीत असते. जर चरबी पिवळी किंवा कडक दिसत असेल तर ते मटण शीळे असते. ताज्या मटणातील चरबी सहजपणे कापली जाते आणि थोडी मऊ असते. जर तुम्हाला मटणावर अनैसर्गिक चमक किंवा तेलकटपणा दिसला तर ते पूर्णपणे टाळा.

**विश्वासार्ह स्त्रोताकडून खरेदी करा**

नेहमी स्वच्छ ठिकाणाहून आणि स्वच्छ असलेले मटण खरेदी करा. दुकान माश्या किंवा वासांपासून मुक्त असावे. ताजे मटण नेहमी रेफ्रिजरेटरमध्ये किंवा थंड ठिकाणी ठेवावे. पॅक केलेले किंवा गोठलेले मटण खरेदी करताना तारीख आणि पॅकेजिंग तपासा. सुपरमार्केटमधून पॅक केलेले मटण खरेदी करत असाल, तर उत्पादन आणि एक्सपायरी डेट तपासा. पॅकेजमध्ये बर्फाचे स्फटिक किंवा गळती नाही याची खात्री करा, जेवढे मटण हवे आहे तेवढेच खरेदी करा.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### जाग तरुणा जाग ..!

समाज आहे विस्कळीत
गुन्हेगार आहेत संघटीत
म्हणून महिलांचे अपहरण
बलात्कार वाढले अगणित!

तरुणांचे कृतीदल व्हावे
गावोगावी संघटीत
नाथाळांचे माथी हाणू काठी
संदेश आणावा कृतीत ..!

नका पाहू जात पंथ
हिंदू सारे एक आहे
दुहीचा गैरफायदा घेऊनच
आजवर अत्याचार झाले आहे!

# अदाणी आणि गूगल यांची भागीदारी, विशाखापट्टणममध्ये भारतातील सर्वात मोठे डेटा सेंटर कॅम्पस उभारणार

**विशाखापट्टणम, १४ ऑक्टोबर :** अदाणी एंटरप्रायझेस आणि त्यांची संयुक्त उपक्रम कंपनी अदाणी कॉनेक्स यांनी गूगलसोबत भागीदारी करत भारतातील सर्वात मोठे एआय डेटा सेंटर कॅम्पस आणि अत्याधुनिक हरित ऊर्जा पायाभूत सुविधा उभारण्याची ऐतिहासिक घोषणा केली आहे. हे प्रकल्प आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे विकसित केले जाणार आहे.

या धोरणात्मक सहकार्यांतर्गत, गूगल एआय हब विशाखापट्टणम हे सुमारे १५ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे गुंतवणूक प्रकल्प असून, २०२६ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने विकसित होणार आहे. या प्रकल्पात गिगावॉट-स्तराचे डेटा सेंटर ऑपरेशन्स, प्रगत समुद्राखालील केबल नेटवर्क, आणि स्वच्छ ऊर्जेवर आधारित प्रणाली यांचा समावेश असेल, जे भारतातील अत्यंत मागणी असलेल्या एआय कामकाजासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरवतील.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अदाणीकॉनेक्स आणि एअरटेल यांसह अनेक प्रमुख भागीदार सहभागी राहतील, ज्यामुळे भारताच्या वाढत्या एआय पर्यावरणाला जागतिक दर्जाचे डिजिटल अधिष्ठान प्राप्त होईल.

या प्रकल्पाचा मुख्य गाभा म्हणजे विशाखापट्टणममध्ये बांधण्यात येणारे अत्याधुनिक एआय डेटा सेंटर, जे देशाची संगणन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढवून भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्तेतील क्षमतांमध्ये नवे पर्व उघडेल.

दोन्ही कंपन्यांच्या शाश्वत विकासासाठीच्या बांधिलकीला अधोरेखित करत, या प्रकल्पात नवीन वीज प्रसारण लाईन, स्वच्छ ऊर्जा निर्मिती, आणि नवकल्पक ऊर्जा साठवण



प्रणालींमध्ये संयुक्त गुंतवणूक केली जाईल. या उपाययोजनांमुळे डेटा सेंटरच्या कामकाजाला पर्यावरणपूरक ऊर्जा मिळेल आणि भारताच्या वीज जाळ्याची क्षमता व लवचिकता आणखी वाढेल.

अदाणी समूहाचे अध्यक्ष श्री गौतम अदाणी म्हणाले, गूगलसोबत या ऐतिहासिक प्रकल्पासाठी भागीदारी करणे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. हे केवळ पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक नाही, तर एका उदयास येणाऱ्या राष्ट्राच्या आत्म्यातील गुंतवणूक आहे. ही भागीदारी राष्ट्रनिर्मितीच्या आमच्या सामायिक दृष्टीकोनाचे प्रतीक असून प्रत्येक भारतीयाला २१व्या शतकातील तंत्रज्ञान साधनांनी सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. विशाखापट्टणम आता जागतिक तंत्रज्ञान केंद्र म्हणून उदयास येणार आहे, आणि या प्रवासाचे शिल्पकार होण्याचा आम्हाला सन्मान आहे.

गूगल क्लाउडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री थॉमस कुरियन म्हणाले, भारताच्या एआय युगातील प्रचंड क्षमतेला उजाळा देण्यासाठी आम्ही गूगल एआय हबमध्ये गुंतवणूक करत आहोत. हे केंद्र व्यवसाय, संशोधक आणि नवकल्पकांना एआयच्या सहाय्याने वाढ आणि विस्तार साधण्यासाठी आवश्यक पाया प्रदान करेल. अदाणीसोबत काम करताना, आम्ही आमची अत्याधुनिक साधने आणि संसाधने समुदाय आणि ग्राहकांपर्यंत अधिक जवळ नेऊ, जेणेकरून ते जागतिक स्तरावर नवकल्पना, सुरक्षा आणि कार्यक्षमतेसह प्रगती करू शकतील.

या एआय हब आणि कनेक्टिव्हिटी गेटवेच्या विकासामुळे विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश आणि अखेर भारत भरातील आर्थिक वाढीस चालना मिळेल. या प्रकल्पामुळे डिजिटल समावेशकता वाढेल, तसेच तंत्रज्ञान, बांधकाम आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांमध्ये हजारो नवीन रोजगारनिर्मिती होईल.

## शॉपर्स स्टॉप साजरा करत आहे गिफ्टिंगचा हा सीझन



**नागपूर, १४ ऑक्टोबर :** शॉपर्स स्टॉप या भारतातील आघाडीच्या फॅशन आणि ब्युटी डेस्टिनेशनने दिवाळीसाठी नवी फिल्म गिफ्ट ऑफ लव्ह लाँच केली असून त्यात प्रसिद्ध ओटीटी अभिनेत्री तान्या मानिकताला झळकणार आहे. या कॅम्पेनच्या माध्यमातून भेट देण्याघेण्याचा आनंद साजरा केला जाणार आहे व विचारपूर्वक निवडलेले गिफ्ट्स कशाप्रकारे प्रेम व्यक्त करतात हे यात पाहायला मिळणार आहे.

या फिल्ममधे तान्याचा शॉपर्स स्टॉप स्टोअरमधला खेळकर, सहज वावर आणि सोबत विविध प्रकारचे कपडे, हँडबॅगपासून परफ्युम्स ते एथनिक वेयर्सपर्यंत ती स्पर्श करते, ते प्रत्येक उत्पादन तिच्या जवळच्यांसाठी प्रेमाचं प्रतीक बनतं. तिची उत्साही उर्जा स्टाइल आणि भावना यांचा मेळ घालणाऱ्या याच्या गोष्टीला साजेशी आणि मनाचा कौल घेऊन निवडलेले गिफ्ट्स सर्वोत्तम असतात याची आठवण करून देणारे आहे.

फिल्म स्टोअरमधून घरी सुरू असलेल्या सेलिब्रेशनकडे जाते, तसे तिने निवडलेले प्रत्येक गिफ्ट योग्य आणि कुटुंबातल्या प्रत्येकाला मनापासून आनंद देणारे ठरते. गिफ्ट्सच्या त्या देण्याघेण्यातून ब्रँडने सोपे सत्य अधोरेखित केले आहे आणि ते म्हणजे, गिफ्ट ही केवळ तुम्ही खरेदी केलेली वस्तू नसते, तर त्यापलीकडे असलेली भावना असते.

गिफ्टचे खरे मूल्य त्यामागे असलेल्या भावनेत दडलेले असते असे शॉपर्स स्टॉपला वाटते, असे शॉपर्स स्टॉपचे कस्टमर केयर असोसिएट आणि प्रमुख मार्केटिंग अधिकारी जितेन महेंद्र म्हणाले. अर्थपूर्ण भेटवस्तू अंदाजे घेतलेली नसते, तर विचारपूर्वक जाणिवेतून निवडलेली असते, याची आठवण गिफ्ट ऑफ लव्ह आपल्याला करून देणार आहे. आपल्या प्रियजनांना खरंच काय आवडेल हे माहीत असतं, तेव्हा प्रत्येक गिफ्ट प्रेम, काळजी आणि कनेक्शन यांचे प्रतिबिंब ठरते.

या दिवाळीत शॉपर्स स्टॉप ग्राहकांना मनाचा कल ओळखून गिफ्ट निवडण्याचा आनंद साजरा करण्यासाठी व प्रत्येक क्षण खास करण्यासाठी आमंत्रित करत आहे. तुम्हाला खरेदी ऑनलाइन करायची असो किंवा इन- स्टोअर शॉपर्स स्टॉपद्वारे खरेदीचा अनोखा अनुभव मिळणार आहे. तुमच्या जवळच्या स्टोअरला भेट द्या किंवा लेटेस्ट कलेक्शन व एक्सक्लुसिव्ह ऑफर्सचा www.shoppersstop.com वर ऑनलाइन लाभ घ्या.

## रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने रोहित शर्मासह #CelebrateLarge, एक एआय-शक्तीशाली उत्सव मोहीम केली सादर

**मुंबई, १४ ऑक्टोबर :** सीग्रामच्या रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने त्यांच्या हम है जनरेशन लार्ज, हमारा हर सेलिब्रेशन लार्ज या उत्सवी मोहिमेची घोषणा केली. सण हे युवा पिढीसाठी त्यांच्या अनोख्या स्टाईल आणि उर्जेने उत्साह भरण्यासाठी आणि येणाऱ्या वर्षांसाठी आठवणी जपून ठेवण्यासाठी आणि अर्थातच, लाइव्ह इट लार्ज करण्यासाठी एक उत्तम संधी आहेत. जनरेशन लार्जला प्रेरणा देण्याच्या ब्रँडच्या तत्वज्ञानावर आधारित, या वर्षीच्या मोहिमेत एक तंत्रज्ञान-अग्रेसर, एआय-नेतृत्वाखालील अनुभव सादर केला जातो जो संस्कृतीत खोलवर रुजलेला असतो आणि ग्राहकांना उत्सवाच्या केंद्रस्थानी ठेवतो आणि ब्रँडच्या लिव्ह इट लार्ज तत्वज्ञानासह तरुण पिढीच्या इच्छेला सुंदरपणे एकत्रित करतो.

या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक उपक्रम आहे जो भारतीय सणांच्या शुभेच्छा एकमेकांना देण्याची पद्धत पुन्हा जागी करतो. रिजनरेटीव एआय आणि प्रगत व्हॉईस सिंथेसिसचा वापर करून, रॉयल स्टॅगचा नवीन सणांच्या शुभेच्छांचा अनुभवामुळे चाहत्यांना रोहित शर्मासोबत वैयक्तिकृत व्हिडिओ शुभेच्छा तयार करता



येतात. ऑरगॅनिक संभाषणात्मक स्वरूपात तयार केलेल्या, नाविन्यपूर्ण वास्तव वाटणाऱ्या शुभेच्छा उत्सवाच्या इच्छांना एकमेकांना कनेक्ट होण्याच्या क्षणात आणि #CelebrateLarge या भावनेचे वास्तव स्वरूप देतात.

या एआय-अग्रेसर संवादाला पूरक म्हणून ३डी फेस्टिव्ह मॅपचा वापर केला जात आहे, जो व्हिज्युअल पद्धतीने मोठा, एआर-अग्रेसर परस्परसंवादी अनुभव आहे जो #CelebrateLarge एआर तत्वज्ञानाला व्हिज्युअल पद्धतीने आकर्षक तसेच वास्तव बनवतो. या मोहिमेत भारताच्या गतिमान उत्सवाच्या भावनेने प्रेरित असलेले टी२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्याकडून विशेष तयार केलेल्या सूचना देखील दिल्या आहेत. भेटवस्तू, अन्नपदार्थ, फॅशन आणि संगीत या उत्सवाच्या प्रमुख घटकांवर लक्ष केंद्रित केलेले, हे वैशिष्ट्य वैयक्तिकृत शिफारसी देते ज्यामुळे वापरकर्त्यांना प्रत्येक क्षण अधिक अविस्मरणीय आणि अर्थपूर्ण बनविण्यास मदत होते.

या स्टँडआउट मोहिमेत रॉयल स्टॅगची भागीदारी गाना करत आहे. दोन्ही ब्रँड अविस्मरणीय आणि अनोखे अनुभव देऊन उत्सव जास्तीत जास्त आनंदाचा व्हावा या तत्वज्ञानाशी सुसंगत आहेत, ज्यामुळे एकमेकांना भेटण्याचा आनंद निर्माण होतो.

ईएनआयएलचे सीईओ यतिश महर्षी म्हणाले, भारतातील उत्सव हे संस्कृती, भावना व्यक्त करणे आणि एकत्रीकरण याकरिता असतात आणि संगीत हे या क्षणांना आणखी खास बनवते. गाना मध्ये, आम्हाला मोहिमेवर सीग्रामच्या रॉयल स्टॅगसोबत भागीदारी करण्यास उत्सुकता आहे, जी तंत्रज्ञान, क्रिएटिव्हीटी आणि नवकल्पकतेमधून उत्सवाचा अनुभव पुन्हा एकदा खास बनवून देत आहे. हे सहकार्य आजच्या पिढीला त्यांचे उत्सव अधिक वैयक्तिक, अर्थपूर्ण आणि खरोखरच मोठे बनवण्यासाठी प्रेरित करतात.

## ओसवाल केबल्स लिमिटेडतर्फे सेबीकडे डीआरएचपी सादर

**मुंबई, १४ ऑक्टोबर :** जयपूर मुख्यालय असलेल्या ओसवाल केबल्स लिमिटेडने बाजार नियामक सेबीकडे ड्राफ्ट रेड हेअरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे. कंपनी प्राथमिक समभाग विक्रीच्या माध्यमातून ५०० कोटी रु. पर्यंतचा निधी उभारण्याची योजना आखत आहे. त्यामध्ये प्रती शेअर ५ रु. दर्शनी मूल्याचे ३०० कोटी रु. पर्यंतचे फ्रेश इश्यू आणि २२,२००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे.

ओसवाल केबल्स लिमिटेड ही हाय व्होल्टेज कंडक्टिव्हिटी उत्पादनांची एकात्मिक निर्माता कंपनी असून ७६५ केव्ही पर्यंतच्या व्होल्टेज स्पेक्ट्रममध्ये उत्पादने तयार करते. ही उत्पादने ऊर्जा प्रसारण व वितरण, अक्षय ऊर्जा एकात्मीकरण, रेल्वे आणि औद्योगिक उपयोजन अशा महत्त्वाच्या ऊर्जा पायाभूत सुविधांमध्ये वापरली जातात.

कंपनीने अलीकडच्या काळात मजबूत आर्थिक वाढ दाखवली असून टर्नओव्हरच्या आधारावर भारतातील आघाडीच्या दहा केबल आणि कंडक्टर कंपन्यांमध्ये स्थान मिळवले आहे.

कंपनीने ऑफरमधून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा वापर खालील उद्देशासाठी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे: नवीन प्रकल्प उभारणीसाठी भांडवली खर्चाच्या गरजांना निधी पुरविण्यासाठी, कंपनीने घेतलेल्या काही कर्जांची अंशतः किंवा पूर्ण परतफेड/पूर्वपरतफेड करण्यासाठी आणि व सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी.

ओसवाल केबल्स च्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये स्टँडर्ड कंडक्टर्स, ॲडव्हान्स्ड कंडक्टर्स, एरियल बंच्ड केबल्स, लो-व्होल्टेज एनर्जी केबल्स, रेल्वे सिग्नलिंग केबल्स, सर्व्हिस ड्रॉप केबल्स आणि कॉन्सेंट्रिक केबल्स यांचा समावेश आहे. विविध स्पेसिफिकेशन्स आणि विस्तृत व्होल्टेज अप्लिकेशन्ससह इतक्या वैविध्यपूर्ण उत्पादन पोर्टफोलिओमुळे कंपनी ऊर्जा प्रसारण व वितरण उद्योगासाठी एक व्यापक उपाय सुविधा पुरवठादार बनली आहे.

तीन पिढ्यांचा अनुभव आणि पाच दशकांपेक्षा जास्त बाजारातील स्थान यांसह कंपनी आणि तिची उत्पादने ऊर्जा प्रसारण आणि वितरण उद्योगातील ५० हून अधिक ग्राहकांकडून मंजूर आणि नोंदणीकृत झाली आहेत तसेच भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक गुणवत्ता व प्रक्रिया प्रमाणपत्रे मिळवली आहेत.

कंपनीचे ईबीआयटीडीए आणि पीएटी मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये अनुक्रमे ४९.७३% आणि ६३.०८% च्या वेगवान सीएजीआर ने वाढले असून, इतर समकक्ष कंपन्यांच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २७.४२% चा सर्वोच्च नोंदवला आहे. तसेच, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीने ३०.१०% चा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च आरओसीई नोंदवला आहे. कंपनीने २०२५ मध्ये सर्वाधिक फिक्स्ड असेट टर्नओव्हर रेशो आणि इनव्हेंटरी टर्नओव्हर रेशो नोंदवले असून त्यायोगे कंपनी आपल्या समकक्ष कंपन्यांच्या तुलनेत सर्वाधिक खेळत्या भांडवलासाठी कार्यक्षम कंपनी ठरली आहे.

# टाटा प्ले सुरू करत आहे समझदार बनो, टाटा प्ले लगाओ अभियान

**नागपूर, १४ ऑक्टोबर :** टाटा प्ले या भारतातील आघाडीच्या कॉंटेण्ट वितरण प्लॅटफॉर्मने आपल्या समझदार बनो, टाटा प्ले लगाओ या नवीनतम डीटीएच अभियानाची घोषणा केली आहे. जाहिरातीच्या पारंपरिक फॉरमॅट्समध्ये न अडकता या अभियानात एआय-निर्मित व्यक्तिरेखांचा वापर करण्यात आला आहे. वाइज आउल आणि विटी डॉंकी या व्यक्तिरेखांद्वारे टाटा प्लेची मूल्यविधाने ग्राहकांना विनोदी व आपल्याशा वाटणाऱ्या पद्धतीने सुलभ करून सांगण्यात आली आहेत.

देशभरातील टेलीव्हिजन प्रेक्षकांना अद्वितीय मूल्याची ग्वाही या अभियानाच्या केंद्रस्थानी आहे. सुरुवातीलाच ३,६०० रुपये जमा करून टाटा प्ले सबस्क्रायबर्स संपूर्ण रकमेच्या मूल्याचा कॉंटेण्ट बघू शकतात, यातील प्रत्येक रुपया थेट त्यांच्या मनोरंजन उपभोगाच्या दिशेने जाईल याची निश्चितीही होते आणि कोणतेही जास्तीचे शुल्क न भरता या रकमेतूनच त्यांना एचडी सेट-टॉप बॉक्स, डिश अँटेना व इन्स्टॉलेशनही करून मिळते. शिवाय, ग्राहकाला हव्या असलेल्या वाहिन्या टाटा प्ले मोबाइल ॲपद्वारे (टीपीएमए) निवडण्याच्या सहजेबद्दलही या अभियानात सांगितले



आहे.

ओगिल्वीची संकल्पना व कार्यान्वयन असलेल्या या ब्रॅण्ड फिल्म्समध्ये डीटीएच दररचनेबद्दल ग्राहकांच्या मनात असलेला गोंधळ सोडवण्यात आला आहे. घुबड आणि गाढव त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण ढंगात थेट प्रेक्षकांशी संवाद साधत छुप्या शुल्कांबद्दलचे सामान्यपणे आढळणारे गैरसमज दूर करतात, टाटा प्लेची धमाका ऑफर अन्य कुणीही करून देणार नाही एवढी पैशाची बचत करून देत असल्याचे तसेच दर्जेदार अखंडित मनोरंजनाची सोय करत असल्याचे यातून स्पष्ट होते.

टाटा प्लेच्या मार्केटिंग कम्युनिकेशन्स विभागाचे प्रमुख कृष्णेंदू दासगुप्ता या अभियानाबद्दल म्हणाले, हे अभियान एका साध्या पण प्रभावी माहितीच्या पायावर उभे आहे. जेव्हा आपल्याला मनोरंजनासाठी काय बघायचे हे निवडण्याची वेळ येते तेव्हा लोकांना गोंधळ नको असतो, तर स्पष्टता हवी असते. निवडीसाठी पर्याय जास्त असल्याने गोंधळाची शक्यता जास्त वाढते. आमचे विक्षिप्त घुबड आणि विनोदी गाढव एका हलक्याफुलक्या, आपल्याशा वाटणाऱ्या संवादाच्या माध्यमातून विश्वासार्ह मार्गदर्शक म्हणून ग्राहकांच्या समोर जातात, त्यांची निर्णय घेण्याची प्रक्रिया विनासायास झाल्यासारखे वाटेल, असे ते वागतात.

## आज का अंदाज

बुधवार १५ ऑक्टोबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ७ | ४ | ७ | ८ | ० |
| १२९ | १२० | १६९ | १७९ | २३९ | १६० | १८१ | ५५० |
| २४६ | ४९० | २६८ | २७८ | ५९० | २७८ | ४५९ | ४६० |
| ३९० | ३४६ | ३६७ | ३७७ | ४०० | ३६८ | ३५० | ६७७ |
| २३ | ३१ | ६२ | ७३ | ४२ | ७१ | ८२ | ०२ |
| २५ | ३४ | ६५ | ७४ | ४६ | ७५ | ८४ | ०४ |
| २८ | ३८ | ६७ | ७८ | ४८ | ७९ | ८९ | ०६ |

१५ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | १२ | ३५ | ६३ |
| २५ | १५ | ३७ | ६७ |
| २८ | १८ | ३९ | ६९ |
| ३९० | २४५ | १६६ | २४० |
| ४८० | ४८९ | ३५५ | ३५८ |
| ५७० | ११९ | १२० | ४५७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ ३ ६ ७ ९

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## फोनपेतर्फे या धनत्रयोदशीनिमित्त २४के डिजिटल गोल्डवर आकर्षक कॅशबॅक ऑफर्सची घोषणा

**मुंबई, १४ ऑक्टोबर :** धनत्रयोदशीनिमित्त फोनपेने आज २४के डिजिटल गोल्डवर आकर्षक कॅशबॅक ऑफरची घोषणा केली. या मध्ये, फोनपेवरून किमान रूपये २००० किमतीच्या डिजिटल गोल्डच्या खरेदीवर वापरकर्त्यांना फ्लॅट २% कॅशबॅक (रूपये २००० पर्यंत) मिळेल. ही ऑफर १८ ऑक्टोबर, २०२५ रोजी एकदाच केलेल्या व्यवहारासाठी* (प्रति वापरकर्ता एकदाच वैध) लागू आहे.

वापरकर्ते फोनपे प्लॅटफॉर्मवर एमएमटीसी-पीएएमपी, सेफगोल्ड आणि कॅरेटलेन यांसारख्या डिजिटल गोल्ड क्षेत्रातील आघाडीच्या आणि विश्वसनीय कंपन्यांकडून ९९.९९% शुद्धतेचे प्रमाणपत्र असलेले २४के डिजिटल गोल्ड खरेदी करू शकतात. संपूर्ण भारतातील १.६ कोटींहून अधिक ग्राहकांनी फोनपे प्लॅटफॉर्मवर उत्तम शुद्धतेचे २४के गोल्ड खरेदी केले आहे.

एकदाच खरेदी करण्याव्यतिरिक्त, फोनपे वापरकर्त्यांना दैनिक किंवा मासिक द्वारे डिजिटल गोल्डमध्ये गुंतवणूक करण्याची सुविधा देखील देते, ज्यामुळे ग्राहकांना उत्तम पद्धतीने दीर्घकालीन गुंतवणूक करता येते. ग्राहकांना कोणत्याही रकमेची (किमान रूपये पाच पासून) गुंतवणूक करण्याची आणि त्यांची गोल्ड होल्डिंग कधीही विक्री करण्याची सोय उपलब्ध आहे, ज्याची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होते.

*ही ऑफर १८ ऑक्टोबर, २०१५ रोजी मध्यरात्री १२:०० ते रात्री ११:५९ वाजेपर्यंत, फक्त एका दिवसासाठी एकदाच केलेल्या व्यवहारांवर वैध आहे. किमान ऑर्डरची रक्कम रूपये २००० आहे. ऑफर प्रति वापरकर्त्यासाठी एकदाच वैध आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला एखाद्या गोष्टीची थोडीशी चिंता असेल, पण जवळच्या मित्रासोबत ती गोष्ट शेअर केल्याने तुम्हाला थोडा आराम मिळेल. तुम्ही तुमच्या कुटुंबासह चित्रपट पाहण्याचा बेत आखू शकता.

**वृषभ :** थोडा वेळ मजेच घालवा, रिलॅक्स वाटेल. आजचा दिवस तुमच्यासाठी एक रोमांचक आणि सकारात्मक अनुभव घेऊन येईल, जो तुमच्या सामाजिक जीवनाला नवीन उंचीवर नेईल.

**मिथुन :** तुमच्या सभोवतालचे वातावरण सकारात्मकतेने भरलेले असेल आणि याचा तुमच्या नातेसंबंधांवरही परिणाम होईल. आज आत्मविश्वास वाढेल. लोकांशी तुमचे संवाद चांगले असतील,

**कर्क :** तुम्ही एखाद्या मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला उपस्थित राहाल, जिथे तुम्हाला इतर मित्रांसोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. आज एखादे नवे स्किल शिकाल, त्याचा लाभ भविष्यात होऊ शकेल.

**सिंह :** आज जोडीदारासोबत रोमँटिक वेळ घालवण्याचा विचार करा, किंवा जर तुम्ही अविवाहित असाल तर काही मित्रांसोबत किंवा कुटुंबासोबत बाहेर जाण्याचा विचार करा. प्रगतीचे नवीन मार्ग उघडतील.

**कन्या :** आज तुम्हाला व्यवसायात लक्षणीय आर्थिक लाभ होतील. शत्रू कदाचित त्यांच्यापासून दूर राहतील. लाकडाच्या व्यापारात गुंतलेल्यांना आज एक मोठा प्रकल्प मिळेल. लेखक नवीन कथा लिहू शकतात.

**तुळ :** बदलत्या हवामानामुळे तुमची चिंता वाढू शकते. भरपूर पाणी प्या; तुमचे आरोग्य चांगले राहील. तुमचे आरोग्य चांगले राहील. तुमचे नातेसंबंध आणि सामाजिक संबंध मजबूत होतील.

**वृश्चिक :** कुरिअर सेवांमध्ये गुंतलेल्या व्यावसायिकांना आज फायदा होईल. आज तळलेले पदार्थ खाऊ नका, त्रास होऊ शकतो. तुम्ही घरी मित्रांसोबत चित्रपट पाहण्याची योजना आखू शकता.

**धनु :** तुमच्या चांगल्या वागण्यामुळे तुम्हाला समाजात एक वेगळी ओळख निर्माण होण्यास मदत होईल. तुम्ही घरी फुलांची सजावट करू शकता. कंत्राटदारांसाठी आजचा दिवस फायदेशीर असेल.

**मकर :** तुम्हाला अशा व्यक्तीची भेट होईल जी भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. तुम्हाला एखाद्या विशिष्ट कामात यश मिळेल. कामाबद्दल, व्यवसायाबद्दल तुमच्या मनात नवीन कल्पना येऊ शकतात.

**कुंभ :** मन एकाग्र करून केलेले काम फायदेशीर ठरेल. आजचा दिवस तुमच्या जोडीदारासाठी चांगला आहे. तुम्ही एखाद्या चांगल्या रेस्टॉरंटमध्येही जाऊ शकता. कोणत्याही जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे टाळावे.

**मीन :** तुम्ही व्यवसायाच्या प्रवासाला जात असाल तर तुमच्या वडिलांचे आशीर्वाद घ्या, कारण तुमचे काम यशस्वी होईल. तुमच्या जोडीदाराला आज प्रगतीची चांगली संधी मिळेल.


HDFC BANK
We understand your world

नोंदणीकृत कार्यालय: एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई-४०००१३ आणि एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, आय-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजुरमार्ग (पूर्व), मुंबई – ४०००४२ येथे स्थित पोर्टफोलिओ व्यवस्थापन म्हणून त्याचे एक कार्यालय आहे.

लिलाव विक्री सूचना

कर्जदारांना, विशेषतः, आणि सर्वसाधारणपणे जनतेला, याद्वारे सूचित केले जाते की खाली नमूद केलेल्या तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड ('बँक') ने कर्जाची थकबाकी भरण्याबाबत नोटीस देऊनही, त्यांनी स्वाक्षरी केलेल्या आणि स्वीकारलेल्या कर्ज कराराच्या अटीनुसार, ज्या कर्जदारांनी पैसे देण्यात चूक केली आहे त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा लिलाव करण्यात येईल. बँकेने कर्जदारांना नोटीस जारी केली होती ज्यामध्ये, खालील खात्यांमध्ये संपूर्ण थकबाकी कर्जाची रक्कम ७ दिवसांच्या कालावधीत देण्यात आली होती, असे न झाल्यास पुढील नोटीस जारी न करता संपूर्ण तारण ठेवलेल्या सोन्याच्या सुरक्षेतील लिलाव करण्यास बँकेला स्वातंत्र्य असेल. कर्जदारांनी दुर्लक्ष केले आणि पेमेंट करण्यात अयशस्वी झाले, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करून तारण म्हणून कर्जदारांनी बँकेकडे दिलेले सोन्याच्या सुरक्षेवरील तारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि संपूर्ण सोन्याचे दागिने/सुरक्षा लिलावाद्वारे विकून आणि थकबाकी वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

२३-१०-२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपासून खाली नमूद केलेल्या शाखेत लिलाव केले जातील. कोणत्याही तारण ठेवलेल्या तारखेचा लिलाव नमूद केलेल्या तारखेला आयोजित केला जाऊ शकत नाही किंवा पूर्ण केला जाऊ शकत नाही अशा स्थितीत, त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला आणि वेळेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे जाण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.


| कर्ज क्रमांक | कर्जदाराचे नाव | कर्जाची रक्कम | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 75548554 | अब्दुल मुदस्सीर अब्दुलगफ्फार | 278000 | एचडीएफसी बँक लिमिटेड सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 75464049 | रहीम बेग करीम | 161000 | |
| 75328344 | सुधाकर नामदेवराव महाल्ले | 42800 | |
| 4000136236 | शेख मुदस्सीर शेख सलीम | 115000 | एचडीएफसी बँक लिमिटेड सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 75637257 | सुधीर बाळकृष्णराव ठोकडे | 99000 | एचडीएफसी बँक लिमिटेड पोकर्ण टॉवर्स, महादेव मंदिर रोड, पोस्टल ग्राउंड समोर, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५००१ |
| 73628295 | मानस एस पाल | 39687 | एचडीएफसी बँक लिमिटेड फिदवी टॉवर, ग्राउंड फ्लोअर, सराफ चेंबर्स समोर, माउंट रोड, नागपूर, महाराष्ट्र ४४०००१ |
| 76037609 | शुभम आसारामजी वैद्य | 97300 | एचडीएफसी बँक लिमिटेड वर्धने टॉवर, मिडसी गेट जवळ, बुटी बोरी, महाराष्ट्र ४४१ १ ०८ |
| 4000070828 | रोशनी विशाल लोखंडे | 71000 | एचडीएफसी बँक लिमिटेड प्लॉट क्रमांक २२५, २२६, एमपीएलएव्ह क्रमांक ८२, नझुल शीट क्रमांक २७, ब्लॉक क्रमांक ११, न्यू शिवाजी वॉर्ड, हिंगणघाट, महाराष्ट्र ४४२३०१ |
| 4000068912 | प्रमोद रामभाऊ मांडवकर | 52000 | |
| 75170371 | फरीना शाहिद पठाण | 54400 | एचडीएफसी बँक लिमिटेड ग्राउंड आणि फर्स्ट फ्लोअर, प्लॉट क्रमांक ६, अड्यालवाले लेआउट, बायपास रोड, उमरेड, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र ४४१ २०३ |
| 75554395 | नरेश रामचंद्र गवई | 12000 | एचडीएफसी बँक लिमिटेड दीपक ट्रेडिंग जवळ, बस स्टँडच्या पुढे, एस कर. २५५/डी, जिल्हा – बुलढाणा, मलकापूर, महाराष्ट्र ४४३१०१ |
| 75948688 | अनिल बाळकृष्ण रोहणकर | 140300 | एचडीएफसी बँक लिमिटेड दुर्गा चेंबर्स, बस स्टँड रोड, जिल्हा – अकोला, अकोट, महाराष्ट्र ४४४१०१ |
| 75421793 | कांता विलास कोकरे | 229400 | एचडीएफसी बँक लिमिटेड व्हीनस प्लाझा, शेगाव नाका, अमरावती, महाराष्ट्र ४४४६०४ |
| 4000068810 | नर्गिस परवीन मोहिदखान | 38000 | |
| 75686059 | राजेंद्र तात्याराव देशमुख | 55000 | एचडीएफसी बँक लिमिटेड साई राम प्लाझा, वसंतराव नाईक चौक, पुसद, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०४ |
| 75813033 | सौरभ अरुणराव तिडके | 40000 | एचडीएफसी बँक लिमिटेड मेघा पेट्रोल पंपासमोर, बस-स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 465941235 | अनिल बापूराव मोजनकर | 77600 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला बसवार कॉम्प्लेक्स, नाहरू मार्केट समोर, बस स्टँड जवळ, सावनेर, सावनेर, महाराष्ट्र ४४११०७ |
| 75827645 | विजय जागेश्वर सहारे | 100000 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला, प्लॉट नंबर ११९ प्रथम फॅशन मॉल, पटेल वॉर्ड, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली, महाराष्ट्र ४४१ २०७ |
| 75409555 | सचिन दिगंबर वानखेडे | 261700 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला, कसारा नं ४-११५, धानकी रोड, उमरखेड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०६ |
| 76017630 | भागवत श्रीकृष्ण दंडले | 101000 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला, गणेश भवन, समोर, बुलढाणा अर्बन को-ऑप. सोसायटी लि., मेनरोड, जळगाव जामोद, जि. बुलढाणा, महाराष्ट्र ४४३४०२ |
| 75917981 | सविता दीपक बोडखे | 100000 | एचडीएफसी बँक लिमिटेड श्री दत्त कॉम्प्लेक्स, शुभम हार्डवेअर व्यतिरिक्त, डोणगाव रोड, मेहकर, मेहकर, महाराष्ट्र ४४३३०१ |
| 75618003 | श्यामकुमार ब्रम्हदेव लिंगे | 59400 | एचडीएफसी बँक ली. रसिक प्लाझा, जयस्तंभ स्क्वेअर, मोर्शी रोड, अमरावती, महाराष्ट्र ४४४६०१ |

लिलाव "जसे आहे तेथे" आणि "जसे आहे तसे" तत्त्वावर केला जाईल आणि बँक त्या सोन्याचे गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकन या संदर्भात कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी देत नाही. दागदागिने: बोली लावण्यापूर्वी नमूद केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकन याबद्दल स्वतः ची पडताळणी करणे, तपासणी करणे व त्यांचे समाधान करणे ही संभाव्य खरेदीदारांची पूर्णपणे आणि परिपूर्ण जबाबदारी असेल आणि अशा हेतूने ते मुक्त असेल. संभाव्य खरेदीदारांना त्यांची एकमेव किंमत आणि खर्चाचे परीक्षण करणे आणि यापूर्वी दिलेल्या [illegible] पूर्वसूचना दिल्याशिवाय लिलाव कार्यवाही पुढे ढकलणे किंवा रद्द करणे किंवा कोणतेही कारण न सांगता, लिलाव प्रक्रिया पुढे ढकलणे किंवा रद्द करणे आणि कोणतेही कारण न सांगता कोणतीही किंवा सर्व बिड किंवा ऑफर नाकारणे ही पूर्णपणे विवेकाधिकार बाब असल्याचे लक्षात घ्या.

तारीख: १५-१०-२०२५
ठिकाण : नागपूर

एसडी/-
प्राधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक लि.


## शब्दकोडे क्रमांक २२४०



**आडवे शब्द:-**
१) परतपरत
४) जाणकार
७) अजगर
१०) राण्यांचा निवासस्थान
१२) जवळपास, बहुतांशी
१५) शरीर
१७) निवासस्थान
१८) मनुष्य
२०) अखेर, शेवट
२१) श्रेष्ठ पुरुष
२३) व्याघ्र
२४) वर्षानुवर्षे
२८) नंतर
२९) सेवक
३१) हट्टी, हेकट
३३) वडिलांचा भाऊ (हिं.)
३४) एक अधिक एक चतुर्थांश
३५) संतोषजनक
३८) युक्ती
४१) धमनी
४२) मला
४४) खाली मान घातलेला
४७) संताप
४९) एकत्र करणे, गोळा करणे
५१) धनी
५२) राजाची कचेरी
५४) रक्षण करणारा
५५) किंमत
५६) वर वधुची मिरवणूक
५७) मारुती
५८) सोन्याचा कस
६०) काचेला पडलेली चीर
६१) निद्रा, झोप
६३) अस्वल
६५) खोडण्याचे साधन
६६) हार, सर
६७) व्यायाम
६९) शरीरातील वात दूर करणारा
७०) विधवा
७१) मोठा डेरेदार वृक्ष
७३) दु:ख, खेद
७५) दगडाचा एक प्रकार
७७) छोटी लढाई
८०) बटवडा
७१) घोंगड्या विणणारा जमात
८२) प्रशंसनीय, स्तुत्य

**उभे शब्द :-**
१) प्राचीन
२) पेठ, शहराचा एक भाग
३) स्नान करण्याची जागा, बाथरुम
४) मत्स्य
५) तापविणारा सूर्य
६) मातीचा कण
७) आरोप
८) चांदी
९) रांग
११) नवरदेव
१३) वळण, वेढा, फेरा
१४) वट, पारंब्याचा वृक्ष
१६) कोवळे गवत
१८) एक मराठी महिना
१९) व्रत
२२) तमाशातील नाट्य
२३) गंध
२५) नेत्र
२६) मनाची फिरणारी इच्छा
२७) फाणस दिवा
२९) मोठा भाऊ
३०) सारखा, तुल्य
३२) डोंगराचा तुटलेला उभा कडा
३३) चाकरी करणारा
३४) सदोदित
३६) धास्ती, दहशत
३७) आजच्या आधीचा दिवस
३९) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
४०) गुरुजी
४३) ढग, मेघ
४५) सहाय्यक
४६) खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
४८) गोलमटोल
४९) धोका
५३) धोबी
५९) उसाचा रस काढण्याचे यंत्र
६०) शिव्याशाप
६२) अटील दोन शब्द
६४) सहाय्य करणारा
६६) कापड विणण्याचे साधन
६७) दार
६८) रुक्ष
६९) दिवस, घाव
७२) वागणूक
७४) पुत्र, मुलगा
७६) हिम
७७) खंदक
७८) झकास, छान
७९) मिठी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# डब्लू सी एल येथे सुवर्ण महोत्सवी
## व्याख्यानमालेत सुश्री जया किशोरी यांचे व्याख्यान

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १४ :**
कोल इंडिया लिमिटेड आणि डब्लू सी एल च्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने, डब्लू सी एल च्या प्रसिद्ध प्रेरक वक्त्या सुश्री जया किशोरी यांचे व्याख्यान सत्र कविवर्य सुरेश भट, रेशीमबाग, नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. कोल इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक पी.एम. प्रसाद आणि डब्लू सी एल चे सीएमडी जे.पी. द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या विशेष अतिथी झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा आभा द्विवेदी ,प्रमुख पाहुणे पी.एम. प्रसाद, अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक, कोल इंडिया लिमिटेड यांनी आपल्या भाषणात सांगितले की कोळसा उद्योग हा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि कोल इंडिया ५० वर्षांसाठी देशाची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करेल. ते म्हणाले की कोल इंडिया लिमिटेड हरित, सुरक्षित आणि तंत्रज्ञान-चालित खाणकाम करण्यास सक्षम आहे. आपल्या भाषणात त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर, कोळसा क्षेत्रातील बदल आणि समस्यांवर भर दिला. पुढे, कोल इंडिया लिमिटेड आणि डब्ल्यूसीएलला त्यांच्या सुवर्ण महोत्सवाबद्दल अभिनंदन.

तुमचे भाषण वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडचे ? ?सीएमडी जे.पी. द्विवेदी म्हणाले की, कोल इंडियाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष केवळ कामगिरीचा उत्सव नाही, तर उलट, नवीन उर्जेने भविष्याची दिशा ठरवण्याची ही एक संधी आहे.

ते म्हणाले की व्हर्न कोलफिल्ड्स लिमिटेड देशाची कोळशाची गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या भाषणात त्यांनी शाश्वत विकास, पर्यावरण संतुलन आणि सर्वांगीण प्रयत्नांवर भर दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी, प्रसिद्ध प्रेरक आणि आध्यात्मिक वक्त्या सुश्री जया किशोर यांनी सकारात्मकता, संतुलन आणि जीवनात आत्मविश्वास यावर आपले विचार मांडले. त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, येशूचा मूळ मंत्र श्रद्धा आणि भक्ती आहे. ते म्हणाले की, जेव्हा आपले काम प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचारांनी केले जाते, तेव्हाच सामाजिक संघटना पूर्ण प्रगतीकडे नेईल.

त्यांच्या संकल्पनेच्या शक्तीबद्दल सविस्तर चर्चा केली. ते म्हणाले की, प्रत्येकाच्या आयुष्यात कठीण परिस्थिती येतात. जणू काही केवळ दृढनिश्चयाच्या बळामुळेच आपल्याला पुढे जाण्याचे धाडस मिळते.

सकारात्मकतेने जीवनशैली घडवण्याबद्दल बोलताना, परंतु केवळ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतच, संयम आणि संयमावर भर दिला जातो. त्यांनी कोल इंडिया लिमिटेड आणि डब्ल्यूसीएलने देशाची कोळसा माहिती पूर्ण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे आणि त्यांना सुवर्ण महोत्सवी वर्षासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

या संधेवर संचालक (वित्त) श्रीक्रम यांनी घोषित केले, संचालक (मानवसंसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे, मुख्य अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे, झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा आभा द्विवेदी आणि उपाध्यक्ष रीना पांडे आणि डॉ.सोनाली म्हेत्रे, लोकशाही मंडळाचे प्रतिनिधी, कोल इंडिया लिमिटेड आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडचे ??अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत आणि आभार मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) अनुपमा टेमुरणीकर प्रशासक आणि जनसंपर्क मिलिंद चहांदे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## दहा फुटाचा आढळला अजगर

**भिवापूर :** जवळी येथे शेतात सोयाबिनची कटाई करीत असतांना दहा फुटाचा अजगर आढळून आला. त्यामुळे शेतमजुरात भितीचे वातावरण तयार झाले. यावेळी सर्पमित्राला पाचारण करण्यात आले होते. शेतामध्ये मजूर काम करत असताना सुरेंद्र पांडे नामक शेतकऱ्याच्या शेतात अचानक एक हा दहा फुट लांबीचा अजगर आढळून आला.

यावेळी सर्पमित्राला पाचारण करण्यात आले. यावेळी योगेश मडावी, सागर हरडे, कुणाल मडावी राकेश परमरे, लोकेश मडावी, रितिक चंदन बावणे हे उपस्थित होते.

पकडण्यात आलेल्या अजगराला उमरेड क-हाडला अभयारण्य येथील अधिकाऱ्याच्या हवाली करण्यात येत आहे.

# कोल इंडिया लि. चे अध्यक्ष पी. एम. प्रसाद यांची डब्ल्यूसीएलला भेट

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४ :**
अध्यक्ष पी. एम. प्रसाद यांनी १२ ऑक्टोबर २०२५ रोजी डब्ल्यूसीएल मुख्यालयात उत्पादन, उत्पादकता, पर्यावरण संरक्षण, सीएसआर आणि भविष्यातील योजनांशी संबंधित विषयांवर आढावा बैठक घेतली.



आढावा बैठकीत त्यांनी टीम डब्ल्यूसीएलच्या कार्यसंस्कृती आणि कामगिरीचे कौतुक केले आणि चालू आर्थिक वर्षात चांगल्या निकालांची अपेक्षा व्यक्त केली.

त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर, खाणकामांमध्ये सुरक्षितता आणि योग्य नियोजन यावर भर दिला. त्यांनी कोळसा वाहतुकीच्या परिस्थितीबद्दल सविस्तर माहिती घेतली आणि या दिशेने सुधारणा करण्यासाठी सूचना दिल्या.

आढावा बैठकीत, डब्ल्यूसीएलचे सीएमडी जे. पी. द्विवेदी यांनी २०२५-२६या वर्षातील कामगिरी आणि योजनांविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यांनी विश्वास व्यक्त केला की डब्ल्यूसीएल या आर्थिक वर्षातील त्यांचे कोळसा उत्पादन लक्ष्य साध्य करेल.

संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे, मुख्यालयाचे प्रादेशिक महाव्यवस्थापक आणि विभाग प्रमुख बैठकीला प्रमुख म्हणून उपस्थित होते.

# तिडके महाविद्यालय वन्यजीव सप्ताह साजरा

**महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १४ :** श्री नरेंद्र तिडके कला वाणिज्य महाविद्यालय रामटेक येथे निसर्ग मंडळ द्वारा वन्यजीव सप्ताह निमित विविध उपक्रम राबवण्यात आले.



विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचे हेतूने विद्यार्थ्यांना वन्यजीव सप्ताहाचे महत्त्व इतिहास आणि आजच्या काळाची गरज हे समजावून सांगण्यात आले. वन्यजीव मानव संघर्ष, निसर्ग आणि वन्यजीव संवर्धन या विषयावरती विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि कर्मचारी यांच्याकरिता चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये या स्पर्धेमध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट चित्र रेखाटले.

प्रथम क्रमांक तनू बागडे आणि श्रुती टेकाम यांना विभागून देण्यात आला, द्वितीय क्रमांक सुमित निशाने तसेच तृतीय क्रमांक समीक्षा चाम्पुरकर यांना देण्यात आला. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मधून प्रथम क्रमांक प्रा. अश्विनी डोंगरे द्वितीय क्रमांक अर्चना पारवे आणि तृतीय क्रमांक उर्मिला सोनवणे यांना देण्यात आला. यावप्रसंगी महाविद्यालयात मोह, जांभूळ, बेडा, वड आणि पिंपळ आधी विविध प्रजातींचे झाडे लावण्यात आली. या झाडाचे संगोपन आणि संवर्धन ची जबाबदारी प्रेमसागर धुर्वे, विलास घोडाम, एकलव्य राऊत, आयुष डोंगावे आणि ईश्वर तांडुळकर यांनी घेतली.

कार्यक्रम यशस्वीतेकरिता निसर्ग मंडळाचे समन्वयक प्रा. स्वप्निल मनघे, सदस्य प्रा. दिलीप जेना, प्रा. ठाकरे, प्रा. भोवते, प्रा. लाड, प्रा. विवेक साहू तसेच निखिल तिवारी, सुमित निशाने, कोमल नागपुरे, दीक्षा फुटाणे, प्रणाली भिलकर, श्रुती टेकाम नंदिनी पचारे, आचल बलगेवार, मनीष बिसेन, साहिल वैद्य, सानिया नेवारे इत्यादी विद्यार्थ्यांनी केले.

# विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेत डॉ.आदमनेचा दबदबा



**सावनेर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेत सी झोन मध्ये सावनेर येथील डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालयाने नरखेड येथील पंढरीनाथ महाविद्यालयाला पराभूत करून कबड्डीप्रमाणेच हॉलीबॉलमधेही आपला दबदबा कायम ठेवला आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी सावनेर येथील पोलिस उपनिरीक्षक उमेश पाटील उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वीरेंद्र जुमडे यांच्या मार्गदर्शनात सदरहू स्पर्धेचे आयोजन केले गेले. यावेळी क्रीडांगणावर प्रमुख पाहुणे डॉ. योगेश पाटील,परीक्षक डॉ.राऊत, प्रा.अतुल भोयर,प्रा.प्रशात पाटील डॉ.प्रगटसिंघ बावरा,प्रा.मोहुर्ले,महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख डॉ.दिनेश किमटा या सर्वांनी खेळाडूंचे मनोबल वाढविण्याचे कार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अर्चना पाटील यांनी केले.

# लाव्हा येथे निशुल्क रोग निदान शिबीर



**महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. १३ :**
लाव्हा ग्रामपंचायतच्या वतीने भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड आणि मिशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने निशुल्क रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ तब्बल १५० नागरिकांनी घेतला.

या प्रसंगी बीपीसीएलचे सेल्स ऑफिसर निशांत भागीया, सरपंच ज्योत्सना नितनवरे, उपसरपंच रॉबिन शेलारे, तसेच प्रकाश कोकाटे, शेषराव गोरले, आकाश चोखांद्रे, देवनाथ गोरले, यादव इंगळे, सारिका सलामे, प्रतिभा मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात मिशन इंडियाचे संचालक डॉ. रेझी लुकोज, डॉ. केला, प्रोग्राम कोऑर्डिनेटर वृषाली शेष, ईशा बावणकर, सुनैना सहारे, प्रशांत साकोरे, तसेच सुजित नितनवरे, योगेश लोखंडे, नाना मेंढे, काशिनाथ बंजारी आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संचालन अजय तायवाडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# समस्या कमकुवत मनाची निर्मिती : बी.के सूरजभाई यांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४ :**
प्रजापिता नागपूर ब्रह्मकुमारीजने नुकतेच वसंतनगर येथील सेवा केंद्र, विदर्भ-स्तरीय मुख्यालय येथे 'समाधान' या शीर्षकाच्या परिसंवादाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात राजस्थानमधील माउंट आबू येथील राजयोगी ब्रह्मकुमार सूरजभाई, लोकप्रिय टीव्ही अँकर ब्रह्मकुमार रूपेशभाई उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या शांती आणि जागृती टीव्ही चॅनेलद्वारे समस्या सोडवून, तणावमुक्त जीवन प्रदान करून आणि दिव्य अनुभव देऊन भारत आणि परदेशातील लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. याप्रसंगी माउंट अबू येथील राजयोग शिक्षिका ब्रह्मकुमारी गीता दीदी, नागपूर सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगिनी रजनी दीदी आणि सह संचालक बीके मनीषा दीदी उपस्थित होते. बीके गीता दीदी म्हणाल्या, की जेव्हा कोणी खेळ खेळतो तेव्हा एक संघ जिंकतो आणि दुसरा हरतो हे निश्चित असते. पराभव संघाला अनुभवी बनवतो आणि विजयाच्या युक्त्या शिकवतो. त्याचप्रमाणे, मानवी जीवनात चढ-उतार, सुख-दुःख आनंद आणि दुःखाचा खेळ सुरूच राहतो. त्या म्हणाल्या की समस्या नसलेली एकमेव जागा म्हणजे स्मशानभूमी. मन कमकुवत असताना समस्या मोठ्या दिसतात. मानवांकडे त्यांना तोंड देण्यासाठी एक शक्तिशाली मन आणि बुद्धी असते. कार्यक्रमादरम्यान, सूरज भाईनी परिस्थितीशी सामना करण्याची कला, आत्मविश्वास विकसित करण्याच्या पद्धती आणि ध्यानाद्वारे उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की आज पर्यावरणीय प्रभावांमुळे बरेच लोक नकारात्मक बनतात. त्यांनी पुढे म्हटले की, ज्याप्रमाणे हरणाचे पिल्लू सिंह बनते, त्याचप्रमाणे आपणही सर्वशक्तिमान देवाची मुले आहोत. ही जाणीव मानवतेच्या सुप्त शक्तींना जागृत करेल. आजकाल प्रत्येक मानवी मन परावलंबी होत चालले आहे. दिवसभर आपले मन इतरांच्या विचारांनी प्रभावित होत आहे का, हे आपण तपासले पाहिजे यावर त्यांनी भर दिला. समस्या या कमकुवत मनाची निर्मिती आहेत. जरआपण आपल्या मनाला सक्षम करायला शिकलो तर आपल्या अर्ध्या समस्या नाहीशा होतील. कोणतेही काम करण्यापूर्वी एक मिनीट शांतता बाळगा, देवाची शक्ती शोधा आणि वास्तववादी निर्णय घ्या. एका मिनिटाच्या ध्यानामुळे १५ मिनिटांची ऊर्जा वाचेल. जर तुम्ही सकाळी उठताच तुमचे मन सकारात्मक संकल्पांनी भरले तर तुमच्या मनाच्या शक्ती भीती वाटते तेव्हा काय करावे? यावेळी बीके रूपेश भाईनी त्यांना प्रश्न विचारले, ज्यांची उत्तरे सूरज भाईनी दिली. सध्याच्या काळात, जाणूनबुजून किंवा नकळत, चिडचिडेपणासोबत भीती वाढत आहे. मनात अनेक प्रश्न निर्माण होत राहतात. याबद्दल काय करावे? त्यांनी उत्तर दिले की रात्री झोपण्यापूर्वी ज्याला झोपायचे आहे त्याने पाच मिनिटे सकारात्मक संकल्प करावेत, जसे की माझे गुडघे बरे होत आहेत. मी या जगात खूप भाग्यवान आहे. मी निर्भय आणि शक्तिशाली आहे. पुन्हा पुन्हा सकारात्मक संकल्प लिहा. सकारात्मक संकल्प करताना अन्न आणि पाणी प्या. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या लोकांनी त्यांच्या जीवनातील समस्यांशी संबंधित प्रश्नदेखील विचारले, ज्यांची सूरजभाईनी अचूक उत्तरे दिली. सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, त्यांनी दररोज ध्यान करण्याचा सल्ला दिला आणि शेवटी सहभागींना राजयोग ध्यानाचा सराव करण्यास मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन बी. के -प्रियंका यांनी केले.



# स्वच्छता पखवाडा २०२५ च्या १३ व्या दिवशी प्रवाशांना स्वच्छता स्पर्धेत भाग घेण्याची संधी

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४ :**
मध्य रेल्वे, नागपूर मंडळ यांच्या तत्वावधानाखाली सुरु असलेल्या स्वच्छता पखवाडा २०२५ च्या १३ व्या दिवशी प्रवाशांसाठी स्वच्छता जागरूकता स्पर्धा आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश प्रवाशांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व वाढवणे आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचे महत्व समजावणे हा आहे.



स्पर्धेत प्रवाशांना रेल्वे परिसरातील स्वच्छता आणि निगा राखीशी संबंधित प्रश्न विचारले गेले. योग्य उत्तर देणाऱ्या प्रवाशांना सन्मानित केले गेले व त्यांना झाडांच्या रोपांची भेट देण्यात आली, ज्यामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत त्यांची जागरूकता आणि उत्साह वाढावा. या कार्यक्रमात रेल्वे कर्मचारी आणि अधिकारी सक्रिय सहभाग घेतला आणि प्रवाशांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. प्रवाशांनी उत्साहाने भाग घेतला आणि रेल्वेच्या स्वच्छता उपक्रमाचे कौतुक केले. मध्य रेल्वे, नागपूर मंडळानुसार, अशा उपक्रमांमुळे फक्त प्रवाशांमध्ये स्वच्छतेची जाणीव वाढत नाही, तर रेल्वे परिसऱ्याही अधिक स्वच्छ, हिरवीगार आणि पर्यावरणपूरक बनतात. पखवाड्याच्या अखेरपर्यंत असे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातील, ज्यात रेल्वे कर्मचारी, प्रवासी आणि स्थानिक नागरिक सहभागी होतील.

## डॉ.कमलजीत कौर यांना आरोग्य आणि कला भूषण पुरस्कार २०२५ प्रदान



**नागपूर:** नागपूर येथिल विनोबाभावे सभा येथे आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य कार्यक्रमात दोन प्रतिष्ठित सन्मान ह्न आरोग्य भूषण पुरस्कार २०२५ आणि कला भूषण पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आले. हा कार्यक्रम जय साई नटराज नाट्य चित्रपट कला व सांस्कृतिक संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता, ही संस्था महाराष्ट्र सरकारशी संलग्न आहे. कार्यक्रमाचे आयोजक विजय मनवतकर यांनी डॉ. कमलजीत कौर यांची या सा. संस्थेच्या सल्लागार पदावर नियुक्ती केली.

## चालकाच्या संगनमताने व्यापाऱ्याला लुटणाऱ्यांना अटक

**रामटेक, दि. १४**
चालकाशी संगनमत करून एका व्यापाऱ्याला मारहाण करीत त्याच्याजवळील २ लाख ४० हजार रुपये लुटून नेणाऱ्या तीन लुटारूंना नागपूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली.

राहुल गणेश पाटील (३१) आंबेडकर वार्ड, भंडारा, देवा राजरत्न चंद्रिकापुरे (२०) वरठी, जि. भंडारा आणि भागवत अमृत वर्मा (२३) डिप्टी सिग्नल, नागपूर अशी या लुटारूंची नावे आहेत. शांतीनगर वार्ड (भंडारा) येथील गुलशन रमेशलाल गोपलानी (४९) यांचा खेड्यापाड्याली दुकानदारांना किराणा माल पोहचवून देण्याचे काम आहे. राहुल पाटील हा गोपलानी यांच्या चारचाकी वाहनावर चालकाचे काम करतो. ११ ऑक्टोबर रोजी गोपलानी यांनी आजूबाजूच्या दुकानातील दुकानदारांना, तसेच धर्मापुरी येथील दुकानदारांना माल देऊन त्यांच्याकडून २ लाख ४० हजार रुपये घेतले.

**Change Of Name**

MY OLD PASSPORT NO, **K4976580.** MY OLD NAME WAS **ARTI RATHI.** NOW MY NEW NAME IS **AARTI PANKAJ RATHI.**
ADD : PLOT NO. 31, MAHESH COLONY NEAR HANDA BUILDING CHANDAN NAGAR, NAGPUR - 440024.

MY OLD PASSPORT NO, **L2582280.** MY OLD NAME WAS **SARBJIT KAUR.** NOW MY NEW NAME IS **SARABJIT KAUR KAWALDEEP SINGH MUDER.**
ADD : PLOT NO.220, ASHOK CHOWK GURUNANAK PURA NAGPUR - 440017.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **L2580956.** MY OLD NAME WAS **ASTHA MILIND MANE.** NOW MY NEW NAME IS **AASTHA MILIND MANE.**
ADD : HOUSE NO 47/C NAGBHUMI SOCIETY JARIPATKA NAGPUR 440014.

MY OLD NAME WAS **ARZEEN NADEEM HYDER.** NOW MY NEW NAME IS **ARZEEN NADEEM HAIDER.**
ADD : MAHDI BAGH COLONY DR AMBEDKAR MARG NAGPUR - 440017.

MY OLD NAME WAS **SABA TABASSUM SABDAR ALI.** NOW MY NEW NAME IS **SABA AABID ALI.**
ADD : AMRAVATI ROAD NEAR MASJID TELANGKHEDI RAMNAGAR UNIVERSITY CAMPUS NAGPUR MAHARASHTRA 440033.

MY OLD NAME WAS **SAYYED SAIMA SADAF USMAN / SAIMA SADAF SAYYED USMAN.** NOW MY NEW NAME IS **SAIMA MOHAMMAD SHOAIB SHEIKH.**
ADD : WARD NO.04 BEHIND MASJID JAGDAMBA NAGAR NAGPUR 441002.

MY OLD NAME WAS **SAIYYAD MANNAN DAULAT.** NOW MY NEW NAME IS **SAIYYAD MANNAN SAIYYAD DAULAT.**
ADD : MURTUJA NAGAR TAKIYA UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206.

MY PASSPORT NO.**K3567797** IS MY INCORRECT NAME WAS **SHAREEFHA PARVEEN HABIB HASAN ALJILANI.** NOW NEW CORRECT NAME IS **PARVEEN HABIB HASAN ALJILANI.**
ADD: ARAB GALLI,ANDROIN KILLA, JAFRABAD DISTRICT, JALNA 431206 MS

MY OLD NAME WAS **HABIB MAHMAD ALJILANI.** NOW MY NEW NAME IS **HABIB MAHAMMAD HABIB MAIHSAN.**
ADD : ARAB GALLI,ANDROON KILLA, JAFRABAD, DISTRICT. JALNA. 431206 MS.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **K1734067.** MY OLD NAME WAS **SHABANAM ASHFAK HADAFA.** NOW MY NEW NAME IS **SHABANAM ASHFAQUE HADFA.**
ADD : NEAR BHOLA SHAH DARGAH BANGALI PANJA NAGPUR 440002.

**जाहीर नोटिस**

जाहीर नोटीस आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार गजानन दुष्यानी पोटभरे व अन्य, रा. कांदी, त. पारशिवनी, जि. नागपूर, यांची वडीलोपार्जित मालकीची संपत्ती मौजा कांद्री, प.ह.नं. १५ ज, त. पारशिवनी, जि. नागपुर येथिल भु.क्र. १५९/१, आराजी ०.९९ हे.आर, वर्ग १ व भु.क्र. १५९/३, आरानी ०.९२ हे.आर, वर्ग - १ ही जागा ची खरेदी / विक्री करणेसाठी आक्षेप आहे. करिता सदर संबंधित दर्शविलेल्या संपत्तीवर कोणत्याही संबंधित व्यक्ती नामे मनाबाई वि. नत्युजी पोटभरे व अरून नत्युनी पोटभरे रा. वार्ड न. २, कांडी, त. पारशिवनी, जि. नागपूर, व अन्य नातेवाईक, संस्था वा इतर कोणाचेही संपत्तीचे खरेदी / विक्री करणेसाठी माझे पक्षकाराचे आक्षेप आहे व करूनचे व जर कोणीही पूर्व खरेदी / विक्री केली असल्यास त्यावर आक्षेप आहे वा केली असल्यास संबंधितानी उजर जाहिरात प्रसिध्दी झाल्यावा ७ दिवसाचा आत दिलल्या जाहिरात संपर्क साधावा.

वरिल मालमत्तेवर कोणताही व्यक्ती किंवा संस्थेचे कर्ज बोझे असल्यास किंवा कोणाचाही हक्क वगैरे असल्यास तसेच आक्षेप किंवा उजर असल्यास संबंधित मालमत्तेचे सर्व कागदपत्रासह नोटिस प्रसिध्दी झाल्याचा ७ दिवसाच्या आत माझेशी संपर्क साधावा अन्यथा तरी वरिल मुदतीत न केल्यास माझा पक्षकार फेरफार / वाटनी करण्यास मोकळा राहील व कुणाचेही हरकत, आक्षेप वा उजर विचारात घेतल्या जाणार नाही व त्यास आपण स्वत: जबाबदार राहणार व कोणतीही फेरफार / वाटनी संबंधी कोणतही हरकत, आक्षेप या उजर बंधनकारक राहणार नाही.

नागपूर
दिनांक: ०१.१०.२०२५.
(अॅड. नरेंद्र अ. वैद्य)

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १०० प्रकरणांची नोंद

**उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई**

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**
नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. रविवार आणि सोमवार(ता.१२ व १३) रोजी शोध पथकाने १०० प्रकरणांची नोंद करून ५२,४०० रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ३० प्रकरणांची नोंद करून १२,००० रुपयांची वसुली करण्यात आली.व्यक्तीने रस्ता,मोकळी जागा,फुटपाथ अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून रू.१०० रूपयाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ११ प्रकरणांची नोंद करून रू.४,४०० चे दंड वसुली करण्यात आली. मॉल,उपहारगृहे,लॉजिंग बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २ प्रकरणाची नोंद करून रू.४,००० रूपयाची दंड वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करून अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १८ प्रकरणांची नोंद करून १५,५०० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २७ प्रकरणांची नोंद करून ५,४०० रुपयाचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ११ प्रकरणांची नोंद करून रु. ११,००० चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. वसंत अपार्टमेंट यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्या प्रकरणी रू.१०,००० दंड वसुल करण्यात आले. हनुमाननगर झोन अंतर्गत मे. साई मनिष बिल्डर यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्या प्रकरणी रू.१०,००० दंड वसुल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत मे.मिनी मिरॅकल स्पीरीच्युल प्ले स्कुल यांनी विनापरवानगी विद्युत खांबावर जाहिरातीचे फलक लावल्या प्रकरणी रू. ५,००० दंड वसुल करण्यात आले.



## श्री संत जगनाडे महाराज मंडाळा तर्फे कोजागिरी कार्यक्रम संपन्न



**नागपूर:** श्री संत जगनाडे महाराज मंडळाकडून कोजागिरी कार्यक्रमाचे एम.पी. हॉल येथे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी राजकुमार चकोले होते.माजी अध्यक्ष राजु दिपटे, माजी सचिव सुनिल किरपाने तसेच महेश भोले व अतुल दुधे उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष कुलदीप खोबरागडे सचिव संजय मेहर आणि इतर सदस्य कार्यक्रमात सहभागी झाले होते. सर्व तेली समाज बांधवांनी या कार्यक्रमाला सहकार्य केलं. या कार्यक्रमांमध्ये. संताजी मंडळाचे सचिव आणि अध्यक्ष त्याचबरोबर संपूर्ण युवा कार्यकारणी व वरिष्ठांनी खूप मेहनत घेतली आणि कार्यक्रमाला आपलं वेळ आणि सफल बनवण्यासाठी प्रयत्न केलं.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कोरडवाहू व पाणी टंचाई ग्रस्त गावात

## एसबीआय फाउंडेशनच्या पुढाकारातून ग्राम सक्षम प्रकल्प साकार



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
एसबीआय फाउंडेशनच्या 'ग्राम सक्षम' प्रकल्प अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील सावंगी (बु) व सावंगी (खुर्द) या कोरडवाहू व पाणी टंचाई ग्रस्त गावात पावसाच्या पाण्याचे संधारण, संवर्धन व भूजलाचे पुनर्भरण प्रकल्प कार्य साकार झाले. या प्रकल्पा अंतर्गत जलस्त्रोत सावंगी नाल्याचे वाटरशेड विकास आधारित नाल्याचे गाळमुक्तीकरण, खोलीकरण व रुंदीकरण कार्य सदभावना ग्रामीण विकास संस्था, वर्धा यांचे माध्यमातून पूर्ण झाले.

या कायामुळे कोरडवाहू क्षेत्रातील जलस्त्रोताची साठवण क्षमता व भूजल पुनर्भरण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामीण व कृषि क्षेत्रासाठी पिण्याचे पाणी, घरगुती वापराचे पाणी, पशुपालनासाठी पाणी व शेती करिता खरिप व रब्बी पिका करिता आवश्यक संरक्षित सिंचनाचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाले आहे. ज्या प्रमाणे पाण्याच्या दुष्काळापासून परिसर दुष्काळमुक्त झाला त्याच बरोबर जलस्त्रोताच्या विकासामुळे पावसाच्या पाण्याचा पुरामुळे दरवर्षी होणारे नुकसान टळले आहे.

या पुरमुक्त व दुष्काळमुक्त स्थितीमुळे ग्रामीण व शेतकरी लोकांचे अर्थकारन वाढत्या उत्पादनामुळे व वाढलेल्या उत्पनामुळे अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. या प्रकल्पामागे प्रेरणा विकास पुरुष केंद्रीय मंत्री . नितीनजी गडकरी यांची असून सहयोग पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था, माध्यमातून करण्यात आली.

या जलसंधारण कार्या व्यतिरिक्त, एसबीआय फाउंडेशनने त्यांच्या सीएसआर निधीतून गावात "किसान भवन" देखील निर्माण केले. या इमारतीचा उद्देश गावकऱ्यांना एक सामायिक व्यासपीठ प्रदान करणे आहे जिथे ते एकत्रितपणे शेती, पाणी व्यवस्थापन आणि इतर समस्यांवर चर्चा करु शकतात. ही इमारत आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये खुर्चा, टेबल, इंटरनेट, शुद्ध पाण्याचे फिल्टर आणि इतर सर्व आवश्यक वस्तूंचा समावेश आहे आणि त्याची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक ग्रामस्थांवर सोपवण्यात आली आहे.

या प्रकल्पात कृषी उपजीविका मजबूत करण्यावरही भर देण्यात आला. कृषी विज्ञान केंद्राच्या एक दिवसाच्या अभ्यास दौऱ्याद्वारे ग्रामस्थांना कृषी आणि पूरक व्यवसाय व्यवस्थापनावर मार्गदर्शन मिळाले. याव्यतिरिक्त, शेतकऱ्यांना लहान आकाराचे बियाणे आणि भाजीपाला पिकांचे बियाणे वाटप करण्यात आले आणि लागवड पद्धतींवर कार्यशाळा घेण्यात आल्या.

नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण केल्याने शेतकऱ्यांमध्ये शेतीबद्दल नवीन उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी त्यांचे अनुभव सांगितले की, यावर्षी मुसळधार पाऊस असूनही, नाल्याची खोली आणि रुंदी वाढल्याने शेतात पाणी शिरु शकले नाही, त्यामुळे पिकांचे नुकसान टाळता आले. कृषी विज्ञान केंद्र नागपूर चे कृषीतज डॉ. मयूर मेश्राम, हरीश भगत आणि मारुती चवरे सारख्या तज्ञांनी शेती, माती आणि पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व यावर प्रशिक्षण दिले, त्यांची समज वाढवली आणि त्यांना पाणी पुनर्भरण आणि नाल्याच्या देखभालीचे महत्त्व कळवले. या प्रकल्पाचे समन्वयक सत्यजित जांभुळकर, व सुपरवायझर गौतम मेश्राम यांच्या देखरेखीखाली झालेल्या या कार्यक्रमात शेकडो पुरुष आणि महिलांनी उत्साहाने भाग घेतला. गावकऱ्यांनी एसबीआय फाउंडेशन आणि सद्भावना संस्थेचे यशस्वी अंमलबजावणीसाठी मनापासून आभार मानले, कारण हा उपक्रम "पाणी हेच जीवन आहे" या म्हणीला पुन्हा पुष्टी देतो असे मानले.

# दिवाळीचा फराळ पाठवा थेट परदेशात

**नागपूर टपाल विभागाचा उपक्रम**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
परदेशातील नातेवाईकांना दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा म्हणून फराळ त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी नागपूर टपाल विभाग यंदाही सज्ज झाला आहे. दिवाळीनिमित्त नागपूर टपाल विभागाने फराळचे पदार्थ नाममात्र किमतीमध्ये पॅकिजिंग करून माफक दरात परदेशात पाठविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे, अशी माहिती नागपूर विभागाचे सहायक निदेशक गजेंद्र जाधव यांनी दिली.

दिवाळीचा फराळ करून तयार आहे पण, तो पाठविण्याचा मुहूर्त लागत नाही. तसेच आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढून टपाल कार्यालयामध्ये येऊ शकत नाहीत, अशा नागरिकांसाठी घरी येऊन फराळ पार्सल घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी पोस्टमन घरी येऊन फराळाच्या पदार्थांचे पार्सल विनामूल्य घेऊन जातील. १९२ देशात सेवा उपलब्धयुके, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युएई, जर्मनी, इंग्लंड, चीन, रशिया अमेरिकासारख्या प्रमुख १९२ देशात सेवा उपलब्ध आहे. चिवडा, लाडु, करंजी, चकली, शेव यासारखे पारंपरिक पदार्थ पाठवता येणार आहे. पार्सलसेवा जवळच्या प्रमुख टपाल कार्यालयात उपलब्ध असून ग्राहकाला फक्त बुकींग करून पत्ता द्यावा लागणार आहे. नोंदणी, पॅकिजिंग आणि शुल्क एकाच ठिकाणी करता येणार आहे. विविध देशात फराळ पाठवण्याचे दर जर्मनी ५८७६, युके ६४५१, यूएई ३४९३, ऑस्ट्रेलिया ११,९१२, रशिया ६७५०, सिंगापूर ४३७८ रुपए लागतात.

इंटरनॅशनल स्पीड स्पोट सेवादिवाळीचा फराळ विदेशात पाठवण्यासाठी इंटरनॅशनल स्पीड स्पोटची सेवा उपलब्ध आहे. नियमित उत्पादने विदेशात पाठवणाऱ्या कंपन्यांसाठी ३५ किलोचे पार्सल डाकघर निर्यात केंद्राद्वारे पाठवता येईल. या शिवाय डाक विभागाचे पीपीयू म्हणजे पार्सल, पॅकिजिंग यूनिट आहे. या यूनिटमध्ये विशिष्ट प्रकारचे पॅकिंग बॉक्स, रॅपिंग पेपर, सेलो टेप आदी सुविधा उपलब्ध आहे.

# महावितरणच्या सेवेत क्रांती

## नागपूर परिमंडलात टारगेट ओरिएंटेड' पुर्नरचनेचा प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
महावितरणच्या ग्राहकसेवेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीत अधिक स्पष्टता आणण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाने कंपनीने हाती घेतलेल्या पुनर्रचना प्रक्रियेला नागपूर परिमंडलात औपचारिकरित्या सुरुवात झाली आहे. या 'लक्ष्य-केंद्रित' पुनर्रचनेमुळे ग्राहकांना जलद आणि अधिक प्रभावी सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असा विश्वास महावितरण प्रशासनाने व्यक्त केला आहे.

महावितरण प्रशासनाने जाहीर केलेल्या निर्णयानुसार, या पुनर्रचनेची अंमलबजावणी १३ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झाली आहे. या महत्त्वपूर्ण बदलाची सुरुवात नागपूर परिमंडलात आज (सोमवार) पासून करण्यात आली आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशासकीय रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. एखाद्या विभागात चार उपविभाग असतील तर आता दोन-दोन उपविभागांना एकत्रित करून त्यांचे प्रामुख्याने दोन विशिष्ट कार्यात्मक उपविभागांमध्ये विभाजन करण्यात येणार आहे:

संचलन व सुव्यवस्था: हा विभाग वीजपुरवठा दुरुस्ती, नवीन वीजजोडणी, देखभाल, तांत्रिक सुरक्षा आणि वीज पुरवठ्यासंबंधी ग्राहक तक्रारींचे निवारण यांसारख्या कामांवर लक्ष केंद्रित करेल.

देयक व महसूल: या विभागात वीजबिल देयके, महसूल संकलन, वीज बिलांबाबत ग्राहकांच्या तक्रारी आणि वसुलीची कामे प्रामुख्याने केली जातील.

नवीन पुनर्रचना निर्णयानुसार कर्मचाऱ्यांची कामांनुसार स्पष्ट विभागणी होणार आहे. यामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यावर त्याच्या निवडक कामाचीच जबाबदारी निश्चित केली जाईल. तांत्रिक पथक: वीजपुरवठा दुरुस्ती, ग्राहक तक्रारी निवारण, नवीन वीजजोडणी, देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षा. वसुली पथक: देयक संकलन, वीज बिलांच्या तक्रारी आणि थकबाकी वसुली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, थकबाकी वसुलीसाठी नेमलेल्या वसुली पथकावर उपविभागीय कार्यालयाचे थेट नियंत्रण असणार आहे. यामुळे वसुलीच्या कामात अधिक गती आणि पारदर्शकता येण्यास मदत होईल.

कर्मचाऱ्यांवरील कामाचा अनावश्यक ताण कमी होऊन त्यांना विशिष्ट कामावर लक्ष केंद्रित करता येईल, ज्यामुळे कार्यक्षमतेत सुधारणा होईल, अशी महावितरण प्रशासनाची अपेक्षा आहे.

# जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या सदस्यांचे आरक्षण सोडत जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
जिल्हधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या 57 सदस्यांची आरक्षणाची सोडत आज जाहीर करण्यात आली. यावेळी विविध पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हा परिषदेत एकूण 57 निवडणूक विभाग असून अनुसूचित जाती-10 (महिला-5),अनुसूचित जमाती-8 (महिला-4), नागरिकांचा मागासवर्ग-15 (महिला-8) व खुला प्रवर्ग-24 (महिला-12) असे आरक्षण जाहीर करण्वात आले आहेत. नागपूर जिल्हा परिषद निवडणूक विभागातील आरक्षित जागा - २०२५ चा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग, खुला प्रवगार्चा तालुकानिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.



सावनेर तालुक्यातील बडेगाव - सर्वसाधारण, वाघोडा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, केळवद - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), पाटणसावंगी- सर्वसाधारण, वलनी- सर्वसाधारण (महिला), चनकापूर- अनुसूचित जाती, चिचोली- अनुसूचित जाती. पारशिवनी तालुक्यातील माहुली-अनुसूचित जमाती (महिला), करंभाड- सर्वसाधारण (महिला), गोंडेगाव- नागरिकांचा मागास प्रवर्ग, टेकाडी (को.ख.)- सर्वसाधारण, रामटेक तालुक्यातील वडांम्बा- अनुसूचित जमाती, बोथिया (पालोरा)- अनुसूचित जमाती, सोनेघाट- अनुसूचित जमाती (महिला), मनसर -अनुसूचित जमाती (महिला), नगरधन- नागारिकांचा मागास प्रवर्ग (महिला) असे आहेत.

मौदा तालुक्यातील अरोली- सर्वसाधारण, खात- सर्वसाधारण (महिला), चाचेर- सर्वसाधारण, तारसा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, धानला- नागरिकांचा मागास प्रवर्ग. कुही तालुक्यातील राजोला- नागारिकांचा मागास प्रवर्ग (महिला), वेलतूर- अनुसूचित जाती (महिला), सिल्ली- सर्वसाधारण, मांढळ- अनुसूचित जाती. कामठी तालुक्यातील कोराडी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), भिलगाव- सर्वसाधारण (महिला), गुमथळा- सर्वसाधारण (महिला), वडोदा- सर्वसाधारण. नागपूर (ग्रामीण) तालुक्यातील भोकारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), कापसी खुर्द- सर्वसाधारण, दवलामेटी- अनुसूचित जाती (महिला), सोनेगाव निपानी- सर्वसाधारण, बोरखेडी फाटक- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला). कळमेश्वर तालुक्यातील तेलकामठी- नागरिकांचा मागास प्रवर्ग(महिला), धापेवाडा- सर्वसाधारण, गोंडखैरी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) असे आहे.

काटोल तालुक्यातील येनवा- अनुसूचित जाती, रिधोरा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, पारडसिगा- अनुसूचित जाती, दुधाळा- सर्वसाधारण (महिला). नरखेड तालुक्यातील बेलोना-सर्वसाधारण (महिला), सावरगांव- सर्वसाधारण (महिला), जलालखेडा- सर्वसाधारण (महिला), भिष्णुर- सर्वसाधारण. हिंगणा तालुक्यातील रायपूर- सर्वसाधारण (महिला), ईसासनी- अनुसूचित जाती (महिला), टाकळघाट- अनुसूचित जाती (महिला), सावंगी (देवळी)- अनुसूचित जमाती, कान्होलीबारा- अनुसूचित जमाती (महिला). उमरेड तालुक्यातील मकरधोकडा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, वायगाव- अनुसूचित जाती (महिला), बेला- सर्वसाधारण, सिर्सी- नागरिकांचा मागास प्रवर्ग. भिवापूर तालुक्यातील तास- सर्वसाधारण (महिला), मालेवाडा- सर्वसाधारण (महिला), नांद- अनुसूचित जमाती असे एकूण 57 जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या सदस्यांचे आरक्षण आहेत.

# कारागृहातील ६८० महिलांच्या हातांवर सजली मेहंदी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने महिला सक्षमीकरण आणि सणांचा आनंद पोहोचविण्याच्या उद्देशाने शारदोत्सवात राबविण्यात आलेल्या मेहंदी उत्सवाचा समारोप सोमवारी नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात आला. संस्कार भारतीच्या अध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या कांचनताई गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात कारागृहातील ६८० महिला बंदिवान, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हातांवर सुंदर मेंहदीचे रेखाटन करण्यात आले. कांचनताईंच्या हते यावेळी कारागृहातील बंदिवानांनी तयार केलेल्या विविध वस्तूंच्या प्रदर्शन-विक्री केंद्राचे तसेच दिवाळी मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.



कारागृह अधीक्षक वैभव आगे, सहअधिक्षक दीपा आगे, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा.अनिल सोले, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा.राजेश बागडी, अविनाश घुशे, निशांत गांधी तसेच भाजप महिला आघाडी अध्यक्षा दिव्या धुरडे आणि संयोजिका मनिषा काशिकर उपस्थित होत्या. मेहंदी कलाकार सुनीता धोटे यांच्या चमूने हा उपक्रम यशस्वी होण्यात महत्वाचे योगदान दिले. कांचनताई गडकरी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

### दिवाळीच्या मुहूर्तावर ४०३२ माथाडी कामगारांना

# ६ कोटी ६४ लाख बोनस

**नागपूर :** राज्य सरकारच्या कामगार मंत्रालया अंतर्गत नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर मार्फत कार्यरत असलेल्या ४०३२ माथाडी कामगारांना दिवाळी बोनस पोटी रु. ६,६३,३५,०७४/- रुपये सहा कोटी त्रेसष्ठ लाख पस्तीस हजार चो-याहत्तर प्रत्येक माथाडी कामगारांचे बँक खात्यात जमा करण्यांत आलेले आहे. नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूरचे अध्यक्ष संतोष ग. कोकाट व सचिव उत्कर्ष द. मोराणकर, यांनी प्रसिध्दी पत्रकात नमुद केले की, किशोर दहीफळकर अप्पर कामगार आयुक्त,नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली माथाडी मंडळात नोंदीत कार्यरत एकुण ४०३२ माथाडी कामगारांना बोनस वाटप करण्यांत आला आहे.

# आरसीएमच्या रूपांतरण यात्रेला नागपुरात उत्स्फूर्त प्रतिसाद




■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :
आरसीएमची देशव्यापी रूपांतरण यात्रा नागपूर येथे १३ ऑक्टोबर रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाली. या कार्यक्रमाला स्थानिक समुदाय सदस्य आणि असोसिएट खरेदीदारांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.सध्या आरसीएमकडे देशभरात २० लाखांहून अधिक सक्रिय असोसिएट खरेदीदार आहेत आणि आगामी काळात ही संख्या वाढवण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

आरसीएमच्या २५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित ही यात्रा १०० दिवसांची असून, ती १७,००० किमीचा प्रवास, ७५ शहरे आणि २५ प्रमुख कार्यक्रमांचा समावेश केला आहे. नागपूर भेटीदरम्यान रूपांतरण यात्रे ने आरसीएमच्या तीन मुख्य स्तंभांना स्वास्थ्य (आरोग्य), सेवा आणि संस्कार नव्याने अधोरेखित केले. नागपूरकरांनी रूपांतरण यात्राचे उत्साहात आणि जल्लोषात स्वागत केले. नागपूर, येथे झालेल्या भव्य सोहळ्यात शेकडो लोकांनी सहभाग घेतला. दोन भागांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. सकाळी आरोग्य आणि सेवेशी संबंधित उपक्रम राबविण्यात आले, तर संध्याकाळी उत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. हेल्थ झोन मध्ये न्युट्रिचार्ज आणि गॅम्मा उत्पादनांची श्रेणी सादर करण्यात आली, तसेच कीसोल पॅव्हिलियन मध्ये महिलांच्या वस्त्र आणि पादत्राणांचे आकर्षक प्रदर्शनी आयोजित करण्यात आले. फूड कोर्टमध्ये आरसीएमच्या स्वेच्छा आणि गुड डॉट ब्रँडअंतर्गत अनेक स्वादिष्ट आणि पौष्टिक पदार्थांची मेजवानी देण्यात आली. तसेच, एक विशेष रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. व्यवस्थापकीय संचालक सौरभ छाबड़ा म्हणाले, नागपूरमधील उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्या लोकशक्तीवर आधारित चळवळीच्या सामर्थ्याचा आणि आत्म्याचा प्रत्यय आहे.

प्रत्येक कुटुंबाला चांगले आरोग्य, आर्थिक संधी आणि दृढ जीवनमूल्ये प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहोत असे मनाले, जेणेकरून स्त्रिया देखील पुरुषांसोबत नवभारताच्या निर्मितीत समान योगदान देऊ शकतील, असे व्यवस्थापकीय संचालक प्रियंका अग्रवाल म्हणाल्या.

## पाच वर्षात ४५७ जणांचा रस्ते अपघातात बळी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
वाहतुकीच्या नियमांचे वारंवार उल्लंघन केल्यामुळे दिवसेंदिवस रस्ते अपघातात वाढ झाली आहे. गेल्या पाच वर्षात रस्ते अपघात जड वाहनांमुळे शहरात 422 अपघात झाले. यात 457 लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच या अपघातात 563 जण गंभीर जखमी झाले असून त्यांना कायमचे अपगंत्व आले आहेत. यादरम्यान घडलेल्या 180 अपघातात 247 जण लोक किरकोळ जखमी झाले. त्यामुळे, जड वाहतुकीला शहरात नो एन्ट्री असणार आहे, अशी माहिती वाहतूक विभागाने दिली आहे. अन्य राज्यातून किंवा शहरातून उपराजधानीत होणारी वाहतूक वाढत्या अपघाताला कारणीभूत ठरत असल्याचे सांगत नागपूर शहर वाहतूक विभागाचे उपायुक्त लोहित मतानी यांनी शहरातून जड वाहतुकीला बंदी घातली आहे. याबाबतचे परिपत्रक त्यांनी जारी केले.

# स्विमिंग पुलमध्ये शॉक लागुन तरुणाचा मृत्यु

■ महासागर प्रतिनिधी कन्हान, दि. १४ :
कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत गाडेघाट ते जुनी कामठी रोड वरील राज फार्म हाउस येथे स्विमिंग पुलात शॉक लागुन ३४ वर्षीय तरुणाचा मृत्यु झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असुन स्विमिंग पूलमध्ये सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याचा मुद्दा समोर आला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार शनिवार ते रविवार (दि.१२) ऑक्टोंबर रोजी रात्री १२ वाजता च्या दरम्यान मृतक मयुर सुधाकर मांडवगडे (वय ३३) रा.रुक्मिणी नगर हुडकेश्वर, नागपुर हा आपल्या मित्र शुभम सुरेंद्र राघौरे (वय ३०) रा.विनायक नगर,हुडकेश्वर, नागपुर याचा सोबत मैत्रीणीच्या वाढदिवसाची पार्टी बनविण्याकरिता राज फार्म हाउस जुनी कामठी येथे गेले होते.

काही वेळाने मृतक मयुर मांडवगडे हा स्विमिंग पुल मध्ये पोहण्याकरिता उतरला असता पाण्यात करंट लागला आणि तो पाण्यात आढवा पडला. त्याचा नाका, तोडांत पाणी गेल्याने त्याला खाजगी रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीस निरीक्षक वैजयंती मांडवधरे, उपनिरीक्षक एकनाथ राठोड स्टॉपसह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदना करिता उपजिल्हा रूग्णालय कामठी येथे नेण्यात आले.

# दिवाळीतील रोषणाई शुभ आणि सुरक्षित हवीच!

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :
प्रकाशपर्व अर्थात दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपले असून, घरोघरी उत्साह, साफसफाई आणि तयारीची लगबग सुरू झाली आहे. या मंगलमय आणि नवचैतन्याच्या वातावरणात दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी, महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी समस्त वीज ग्राहकांना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी या निमित्ताने सर्व वीज ग्राहक, कर्मचारी आणि हितचिंतकांना दिवाळी सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.




दिवाळीतील सजावट, रोषणाई आणि फटाक्यांची आतिषबाजी यामुळे होणारी छोटीशी चूकही दुर्दैवी घटनांना आमंत्रण देऊ शकते. दरवर्षी फटाक्यांमुळे आग लागण्याच्या अनेक घटनांची नोंद होते, ज्यात दुर्दैवाने वित्तहानीसोबतच जीवितहानी होण्याचीही शक्यता असते. निष्काळजीपणा आणि सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केल्यामुळे असे अपघात घडतात. आपल्या आणि कुटुंबाच्या दिवाळीचा आनंद टिकवून ठेवण्यासाठी, महावितरणने काही महत्त्वाचे खबरदारीचे उपाय सुचवले आहेत, ज्यांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक आहे.

दिवाळीत मोठ्या प्रमाणात होणाऱ्या विद्युत रोषणाईमुळे वीज यंत्रणेवर तात्पुरता ताण येतो. त्यामुळे वीजेचा वापर गरजेनुसार आणि जपून करा. बाजारात आता कमी वीज लागणारे एलईडी दिवे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या आधुनिक दिव्यांचा वापर केल्यास वीज वापर नियंत्रित राहील आणि वीज बिलही कमी येईल. रोषणाईसाठी नेहमी उच्च दर्जाच्या मार्क असलेल्या) दिव्यांच्या माळा आणि वायर्सचाच वापर करा.

दिवाळीच्या साफसफाई आणि रंगरंगोटी दरम्यान विजेचे अपघात टाळण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. भिंतींना रंग लावण्यापूर्वी, विशेषतः स्विच बोर्ड आणि सॉकेटजवळ काम करताना, त्या भागाचा मुख्य वीज पुरवठा नक्की बंद करा. रंग लावण्यासाठी वापरली जाणारी शिडी (जिना) कोणत्याही लाईव्ह वायरला स्पर्श करणार नाही याची काळजी घ्या. तसेच, कोणत्याही विद्युत उपकरणांची साफसफाई करण्यापूर्वी ते बंद करा आणि प्लगमधून काढून टाका स्विच बोर्ड्स आणि सॉकेट्स साफ करताना फक्त कोरड्या कपड्याचा वापर करा. ओला कपडा वापरणे टाळा. साफसफाई करताना सॉकेट्स, स्वीचेस आणि वायर्समध्ये तुटफूट किंवा जळाल्याचे चिन्ह आढळल्यास, त्वरित परवानाधारक इलेक्ट्रिशियनकडून दुरुस्त करून घ्या. उंदरांनी कुरतडलेल्या वायर्समुळे शॉर्ट सर्किटचा धोका वाढतो, त्यामुळे अशा वायर्स तात्काळ बदलून घ्या.

रोषणाईचे दिवे पडदे, बिछाना, पंखे किंवा मुख्य वीज तारांपासून लांब आणि सुरक्षित ठिकाणी असतील याची खात्री करा. लहान मुलांना लाईव्ह वायर्स आणि उपकरणांपासून दूर ठेवा. एकाच विद्युत सॉकेटवर अनेक दिव्यांच्या माळा किंवा उपकरणे जोडून अतिरिक्त भार (ओव्हरलोड) टाकणे टाळा. वीज तारांजवळ किंवा विजेच्या उपकरणांजवळ फटाके उडवणे पूर्णपणे टाळा. आतिषबाजी नेहमी मोकळ्या जागेत आणि आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजना करूनच करा. फटाके उडवल्यानंतर होणारा कचरा वीज यंत्रणेजवळ फेकू नका; त्याची योग्य विल्हेवाट लावा. ग्राहकांना या प्रकाशपर्वात दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी वीज वाहिन्या व उपकरणांची देखभाल व दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या काळात सार्वजनिक ठिकाणी वीज अपघात होऊ नये यासाठी बाजारपेठ परिसरातील कर्मचाऱ्यांनी दक्ष राहून उपाययोजना कराव्यात.

# आक्षेप घेतले तरी आम्ही आमचे काम करुच!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतचोरीचा मुद्दा खुप गाजला, आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे वारे वाहत आहे, नागपूर जिल्ह्यातील हिंगणा मतदारसंघातील वानाडोंगरी नगरपंचायतीच्या मतदार यादीतील घोळ उघड झाला आहे. एकाच पत्त्यावर दोनशे मतदारांची नोंदणी करण्यात आल्याचे उघड झाले आहे. एकूणच राज्यातील स्थिती कमी अधिक प्रमाणात अशीच आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांचे शिष्टमंडळ निवडणूक आयोगाला भेटले. यासंदर्भात नागपुरात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली.

बावनकुळे म्हणाले ह्व निवड्णूक आयोगाकडे जाणे हा विरोधी पक्षाचा अधिकारच आहे. आतापासूनच ते पराभूत मानसिकतेत गेले आहे. निवडणूक आयोगाकडे आम्हीही गेलो होतो. आक्षेप घेतले होते. आक्षेप घेतले तरी आम्हाला अडचण नाही आम्ही आमचे काम करू.

महापालिकेप्रमाणे जिल्हा परिषदेत तीन आणि पंचायत समितीत दोन स्वीकृत सदस्य नियुक्ती करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधीशी बोलताना केली. मुख्यमंत्री मान्य करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नागपूर जिल्हा परिषदेसाठी सोमवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानंतर दुस?याच दिवशी बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्य नियुक्तीचा मुद्दा पुढे केला आहे. आरक्षणामुळे भाजपमधील अनेक इच्छुकांचे जिल्हा परिषद निवडणूक लढण्याचे स्वप्नभंमग झाले आहे. त्यांची समजूत काढण्यासाठी तर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्य नियुक्तीचा मुद्दा पुढे केला अशी चर्चा राजकीय वतुळांत सुरू आहे.

**१६ ऑक्टोबरला तोडगा**

राज्यातील कोतवालांच्या मागण्यांवर १६ ऑक्टोबरला तोडगा निघणार असल्याच बावनकुळे म्हणाले. ३६ दिवसांपासून कोतवालांचे आंदोलन सुरु आहे. राज्यात चतुर्थश्रेणी पदनाम बंद करण्यात आले असल्याने ती मागणी पूर्ण करता येणार नाही. मात्र, कोतवालांच्या इतर न्याय्य मागण्यांचा विचार करून १६ ऑक्टोबरला होणाऱ्या बैठकीत प्रश्न मार्गी लावू, असे ते म्हणाले.

सायन्स सेंटरच्या नावाबाबत काँग्रेसकडून होत असलेल्या टीकेला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, लायन्स सेंटर हे नाव आधुनिक आणि विकसित भारताचं प्रतीक आहे. नेहरू सेंटर का नाही दिलं यावर वाद घालण्यात अर्थ नाही; नावापेक्षा काम महत्त्वाचं आहे, असा टोला बावनकुळे यांनी लगावला.

# झेडपी आरक्षणाने अनेक दिग्गजांचा हिरमोड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

नागपूर जिल्हा परिषद सर्कल आरक्षणाची सोडत सोमवारी काढण्यात आली. महिला व अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणामुळे जिल्हा परिषदेचा माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे, माजी मंत्री रमेश बंग यांचे पूत्र दिनेश बंग, माजी सभापती सतीश शिंदे, काँग्रेस माजी जिल्हाध्यक्ष व गटनेते बाबा आष्टणकर यांना फटका बसला आहे. त्यामुळे अनेकांचा हिरमोड झाला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री रमेश बंग यांचे सुपूत्र हिंगणा तालुक्यातील रायपूर सर्कलमधून प्रथमच निवडून आले होते. मात्र आता त्यांचे सर्कल महिलेसाठी राखीव झाले आहे. २० वर्षांपूर्वी याच सर्कलमधून काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाबा आष्टणकर हे निवडून आले होते. त्यावेळी ते काँग्रेस सत्तापक्षनेते होते. आरक्षणामुळेच त्यांना मधले पंधरा वर्ष लढता आले नाही. यावेळी ते पुन्हा लढण्याच्या तयारीत होते. मात्र त्यांचाही पत्ता आता कट झाला आहे.

या सर्कलमधून उज्वला बोढारे या निवडून आल्या होत्या. त्यावेळी हे सर्कल महिलांसाठी राखीव होते. मागच्या निवडणुकीत त्या कान्होलीबारा सर्कलमधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आल्या होत्या.

अडीच वर्ष सभापती होत्या. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपच्या संभाव्य जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून त्यांच्या नावाची चर्चा होती. मात्र त्यांचे कान्होलीबारा सर्कल अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी आरक्षित झाले आहे.




काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघाअंतर्गत येणारे सावरगाव सर्कल हे सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाले आहे. या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व माजी आमदार सुनील शिंदे यांचे सुपूत्र सतीश शिंदे यांनी केले आहे. ते सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत.

पंधरा वर्षांपासून आरक्षणामुळे त्यांची अडचण होती. यावेळी सर्कल खुले झाले मात्र महिलेसाठी राखीव झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्य परिषदेच्या राजकारणात पुन्हा सक्रिय होण्याचे त्यांचे इरादे संपुष्टात आले आहेत.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे यांच्यावर पुन्हा राखीव बाकावर बसण्याची वेळ आली आहे. त्यांचे तेलकामठी सर्कल ओबीसी महिलेसाठी राखीव झाले आहे. असे असले तरी आपल्याच घरी सत्ता राखण्यास त्यांना मदत झाली आहे. या सर्कलमधून मागील निवडणुकीत त्यांच्या पत्नी निवडून आल्या होत्या. त्यासुद्धा उपाध्यक्ष होत्या.

मात्र यावेळी मनोहर कुंभारे यांनी निवडणूक लढण्याची तयारी केली होती. त्यांच्या मतदारसंघाच्या शेजारी असलेले केळवद हे सर्कल देखील ओबीसी महिलेसाठी राखीव झाले आहेत.

या सर्कलमधून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन राठी हेसुद्धा निवडणूक लढण्यास इच्छुक होते. काँग्रेस नेते सुनील केदारांनी त्यांनी लढण्यासाठी बळ देण्याचा शब्द दिला होता.

विशेष म्हणजे मनोहर कुंभारे काँग्रेसचे नेते सुनील केदारांचे कट्टर समर्थक होते. लोकसभेच्या निवडणुकीत ते अचानक भाजपमध्ये दाखल झाले. त्यांना भाजपचे लगेच जिल्हाध्यक्ष केले आहे. मात्र आरक्षणामुळे त्यांना लढता येणार नसल्याचे स्पष्ट आहे.

## प्रवासादरम्यान स्फोटक, ज्वलनशील पदार्थ नेवू नका

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १४ :

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारचे स्फोटक, ज्वलनशील किंवा धोकादायक पदार्थ सोबत नेऊ नयेत, असे आवाहन रेल्वेने केले आहे.

प्रतिबंधित ज्वलनशील वस्तू घेऊन प्रवास करताना आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या गुन्ह्यासाठी ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच अशा निष्काळजीपणामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास संबंधित व्यक्तीवर अधिक कठोर कारवाई केली जाईल, असे रेल्वेच्या भुसावळ विभागाने स्पष्ट केले आहे.

प्रवाशांमध्ये सुरक्षा जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने विभागीय रेल्वे प्रशासनामार्फत नियमितपणे प्रचार मोहीम, पोस्टर प्रदर्शन, स्टेशनवरील उद्घोषणा अशा विविध माध्यमांद्वारे ज्वलनशील पदार्थ सोबत नेऊ नयेत म्हणून रेल्वेच्यावतिने आवाहन केले जात आहे.

# ....तर आमदारांच्या दारात काळी दिवाळी साजरी करणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

**वंचित आघाडीचा सरकारला इशारा**



अतिवृष्टीने बेजार झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई मिळाली नाही, तर शेतकऱ्यांसोबत सत्ताधारी आमदारांच्या घरी जाऊन काळी दिवाळी साजरी केली जाईल, असा इशारा प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीने दिला आहे. शेतकऱ्यांकडे होणारे दुर्लक्ष आम्ही अजिबात सहन करणार नाही, असेही वंचितने म्हटले आहे.

महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. विशेषतः मराठवाडा व लगतच्या जिल्ह्यांतील शेतजमिनी पूर्णतः खरडून गेल्या आहेत. यामुळे तिथे रब्बी हंगाम घेणेही अवघड झाले आहे. सरकारने या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सुमारे ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. तसेच शेतकऱ्यांच्या खात्यावर दिवाळीपूर्वी मदत पुरवण्याचा शब्दही दिला. पण आजपर्यंत अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ही मदत मिळाली नसल्याची ओरड केली जात आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळीला अवघे काही दिवस शिल्लक असताना वंचित बहुजन आघाडीने शासनाला वरील इशारा दिला आहे.

प्रकाश आंबेडकर या प्रकरणी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले की, राज्य सरकार आतासुद्धा शेतकऱ्यांच्या बद्दल असंवेदनशील आहे. शासनाला फक्त वेळ काढायचा आहे आणि शेतकऱ्यांचा बळी घ्यायचा आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची तत्काळ मदत त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे, ही मागणी आम्ही वारंवार करत आहोत. वंचित बहुजन आघाडीच्यावतीने प्रदेश महासचिव प्रा. किसन चव्हाण यांच्या नेतृत्वात ज्या पद्धतीने सत्ताधारी आमदारांच्या घरावर मोर्चे काढले, त्याच पद्धतीने महाराष्ट्रभरातील आमदारांच्या घरावर मोर्चे काढायला आम्हाला मजबूर करू नका.

शेतकऱ्यांची कर्जमाफी करू म्हणून मते घेऊन हे सत्तेवर आलेत. शेतकऱ्यांना जर दिवाळीच्याआधी नुकसान भरपाई मिळाली नाही, तर सर्वच सत्ताधारी आमदारांच्या घरी जाऊन शेतकऱ्यांना सोबत घेऊन काळी दिवाळी साजरी करू. शासनाने गांभीयार्ने याची दखल घ्यावी. शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतीमालाला हमीभाव, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान हे प्रश्न सोडवण्याकडे तातडीने लक्ष द्यावे. शेतकऱ्यांना दुर्लक्षित करणे अजिबात सहन करणार नाही, असे ते म्हणालेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे वंचित बहुजन आघाडीने सोमवारी प्राध्यापक किसन चव्हाण यांच्या नेतृत्वात अहिल्यानगरच्या भाजप आमदार मोनिका राजळे यांच्या शेवगाव संपर्क कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. या मोर्चात शेतकरी व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यावेळी राजळे यांच्याविरोधात घोषणाबाजी करत शासनाने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा यासह अतर अनेक मागण्या लावून धरल्या होत्या.

# भाजपला बिहारपेक्षा मुंबई महत्वाची..



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १४ :

बिहारपेक्षा भाजपला आता मुंबईची गरज आहे. भाजप काँग्रेसला बिहार देऊ शकते आणि मुंबई ताब्यात घेऊ शकते, ईव्हीएमचा प्रताप दाखवू शकते. निवडणूक आयोगाचे कामकाज हे भाजपच्या कार्यालयातून चालत आहे, अशी टीका प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, काँग्रेस इतर राज्यात मराठी विषय घेऊन जाऊ शकत नाही. भाजपला बिहारपेक्षा मुंबई हवी आहे. त्यासाठी भाजपची धडपड सुरू आहे. ईव्हीएमवर संशय व्यक्त केला जाऊ नये, म्हणून बिहारची सत्ता काँग्रेसला दिली जाऊ शकते. म्हणजे ते ईव्हीएमचा खेळ मुंबईत करण्यास मोकळे होतील. ईव्हीएम काँग्रेसने आणली नसती तर आमच्या मते हे पाप आले नसते. त्यांनी चूक केली. ईव्हीएम मशीन ठेवा पण बॅलेट पेपर प्रमाणे, असे आमचे म्हणणे आहे, असे कडू म्हणाले.

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. एकदा तरी त्यांनी कोरा करून दाखवावा. सगळ्या गोष्टी राजकारणासाठी नाही तर आशीवार्दासाठी कराव्या लागतात असेही कडू म्हणाले.

## : मुलखावेगळी माणसं :
## काष्ठशिल्पकार विकास पाटील

**लोकमानस**



निसर्गाने निर्माण केलेल्या सृष्टीत अनमोल खजिना दडलेला आहे. झाडे, पाने, फुले, फळे यांसारख्या अनेक गोष्टी या निसर्गातून मिळतात. त्याच प्रमाणे जंगलातील अनेक वनस्पती झाडांपासून विविध आकार असलेली शिल्पे तयार होतात. परंतु ते प्रत्येकाच्या नजरेस पडत नाहीत. कारण त्यास गरज असते ती कलाकारच्या नजरेची. जन्मजात मिळालेल्या याच नजरेच्या माध्यमातून मनपातील वैद्यकीय अधिकारी पदाची नोकरी सांभाळीत डॉ. विकास पाटील यांनी काष्ठशिल्पाचा छंद जोपासला आहे.

पावसाळ्यात नदीत वाहून येणारी झाडांची मुळं, फांद्या, लाकूड, वेली यात विविध प्रकारच्या कलाकृती दडलेल्या असतात. त्यांना आकार देऊन सुंदर काष्ठशिल्प घडविण्याचे काम पाटील यांच्या कारखान्यात केले जात होते. परंतु आता मनपातील आरोग्य अधिकारी पदाची जबाबदारी अंगावर असल्याने या कला जोपासण्यासाठी त्यांना वेळ कमी मिळत असला, तरी येणाऱ्या काही दिवसांत ही कला अनेकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न ते करणार आहेत. आयुर्वेदातील बीएमए पदवी घेतल्याने १९८३ पासून ते जवळच असलेल्या सातपुडा जंगलात आयुर्वेदीक वनस्पती, कंदमुळांचा अभ्यास करण्यासाठी जात असत.

त्यादरम्यान वनस्पतीची माहिती घेताना नदीच्या काठावर अंगठ्याच्या आकाराचे वेटोळे घेतलेले लाकूड त्यांना दिसले. त्यात त्यांना सापाचा आकार दिसल्याने त्यांनी ते घरी आणले आणि त्यापासून एक लहान शिल्प बनविले. त्या शिल्पाची घरी आलेल्या प्रत्येकाने भरभरून स्तुती केली. तेव्हापासून या कलेची त्यांना आवड निर्माण झाली. त्यानंतर प्रत्येकवेळी पावसाळ्यात ते सुट्टीच्या दिवशी जंगल सफरीसाठी जायचे. पाण्याच्या लोंढ्यात वाहून आलेले झाडांचे, वेलींचे तुकडे त्यांनी जमा केले. पाटील यांना प्रत्येक तुकड्यात एक सुंदर शिल्प दिसत होते.

त्यानुसार त्यांच्या अडगळीच्या खोलीतच त्यांनी एक छोटा कारखाना तयार केला. सुतार कामाची सर्व अवजारे त्यांनी आणली आणि लाकडाच्या प्रत्येक तुकड्यापासून एक सुंदर शिल्प आकार घेऊ लागले. तेव्हापासून त्यांनी ही कला जोपासली असून आज अनेक सुंदर शिल्पे त्यांच्याकडे तयार झाली आहेत.

एक शिल्प बनविण्यासाठी त्यांना साधारण दोन तास, दोन दिवस अथवा दोन महिने देखील लागतात. प्रत्येक शिल्पाच्या आकारानुसार ते बनविण्यासाठी कालावधी अवलंबून असतो. शिल्पासाठी आणलेल्या लाकडी वस्तूला कापून वेगळा आकार दिला जातो. त्यानंतर त्याला आवश्यकतेनुसार जोडणी करून पोलिश पेपरने गहराई केली जाते,त्यामुळे शिल्प गुळगुळीत होते. पोलिश पेपरचा लेप दिल्यानंतर ते अधिक आकर्षक बनते. आणि त्यातूनच निसर्गापासून एक सुंदर शिल्प जन्मास येते. एकदा बनविलेल्या शिल्पासारखे दुसरे शिल्प बनत नाही हि या कलेची खासियत आहे.

साप, नाग नागिणीची जोडी, गणपती, टेबल लँप, हरीण जोडी,डायनोसोर यासारखी अनेक शिल्प पाटील यांच्या संग्रहात आहेत. त्यांनी बनविलेल्या शिल्पांना आजही मागणी असून रेमंड कंपनीने देखील त्यांची शिल्प विकत घेतली आहेत. २००९ साली पाटील यांनी आपल्या काष्ठ शिल्पांचे प्रदर्शन भरवले होते. येणाऱ्या काळात हि आगळी वेगळी कला जोपासण्यासाठी पाटील प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

■ ■ ■

## मद्य व्यावसायिकावर छापा

■ नागपूर, दि. १४ :

महाराष्ट्राच्या तुलनेत शेजारील राज्य मध्य प्रदेश आणि छत्तीसगड येथे मद्याचे शुल्क कमी आहे. त्यामुळे तेथील स्वस्तातल्या मद्याचा साठा उपराजधानीत होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने रामदासपेठ येथील एका मद्य व्यावसायिकावर छापा टाकला व परराज्यातील मद्याचा साठा जप्त केला.

## मर्सिडीझ बेंझची जी क्लास डी लाँच



डियाची सर्वात आवडती लक्झरी कार निमार्ता कंपनी मर्सिडीज-बेंझने नवीन जी-क्लास ४५०डी लाँच केली, ज्यामध्ये मर्सिडीज-बेंझ पोर्टफोलिओमधील सर्वात शक्तिशाली डिझेल इंजिन आहे. G450d सह, मर्सिडीज - बेंझ आता भारतात आयकॉनिक जी-क्लास पोर्टफोलिओमध्ये डिझेल, पेट्रोल आणि इलेक्ट्रिक पॉवरट्रेन देते. G 450d मध्ये शक्तिशाली पण कार्यक्षम डिझेलचे परिपूर्ण संयोजन सादर केले आहे, जे भारतातील जी-क्लास श्रेणीतील पॉवरट्रेन विविधतेला अधोरेखित करते, ज्यामध्ये AMG आणि इलेक्ट्रिक आणि आता EIYG 450d ही ऑफ-रोड क्षमता, गतिमान कामगिरीआणि उत्पादका सोबत उत्कृष्ट लक्झरीचे एक शक्तिशाली संयोजन दर्शवते, जी टॉप-एंड लक्झरी SUVसेगमेंटमध्ये एक नवीन मानक स्थापित करते. तसेच कालातीत G - क्लास डिझाइन नीतिमत्तेशी प्रामाणिक राहते.

मर्सिडीज-बेंझ G - क्लास कामगिरी आणि लक्झरी दोन्ही उंचावणाऱ्या महत्त्वपूर्ण सुधारणांसह ऑटोमोटिव्ह आयकॉन म्हणून आपली स्थिती मजबूत करत आहे. ही नवीनतम पिढी G 450d सर्वपरिस्थितींमध्ये उत्कृष्ट आहे, ज्यामध्ये एक विद्युतीकृत ड्राइव्ह सिस्टम आहे जी एकूण कामगिरी सुधारते आणि वाढीव सुरक्षिततेसाठी आधुनिक ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टम आहे. मर्सिडीज-बेंझ G 450 d ही सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ऑफ-रोड वाहनांमध्ये वेगळी आहे, ज्यामध्ये 3.0L इनलाइन 6-सिलेंडर इंजिन आहे जे 270 kW आणि 750 Nm टॉर्क देते.

पूर्णपणे नवीन G 450d फक्त 5.8 सेकंदात 0 ते 100 किमी प्रतितास वेग वाढवते. नवीन जी-क्लासला ऑफ-रोड सेगमेंट्समधील ४५ वर्षांहून अधिक अनुभव आणि कौशल्याचा फायदा होतो.

■ ■ ■

## असा लागला शोध



प्रेशर कुकरचा शोध डेनिस पॅपिन यांनी १६७९ मध्ये लावला. त्यांनी वाफेचा दाब वापरून अन्न शिजवण्याची पद्धत शोधून काढली, ज्यामुळे स्वयंपाकाची वेळ कमी झाली. त्यांचे पहिले उपकरण 'स्टीम डायजेस्टर' होते. त्यानंतर १९व्या आणि २०व्या शतकात त्यात अनेक सुधारणा करण्यात आल्या, जसे की सुरक्षा वैशिष्ट्ये जोडणे आणि ॲल्युमिनियम व स्टेनलेस स्टीलचा वापर करणे. १६७९ मध्ये फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ आणि शोधक डेनिस पॅपिन यांनी कुकरचा शोध लावला. त्यांनी 'स्टीम डायजेस्टर' नावाचे एक उपकरण तयार केले, जे वाफेचा दाब वापरून अन्न जलद शिजवण्यासाठी मदत करत असे. १९व्या शतकात वाफेवर चालणारे कुकर सुधारित स्वरूपात आले. २०व्या शतकात, सुरक्षा वैशिष्ट्ये जोडलेल्या ॲल्युमिनियम आणि स्टेनलेस स्टीलच्या कुकरचा विकास झाला. १९९१ मध्ये पहिला इलेक्ट्रिक कुकर तयार करण्यात आला आणि त्यानंतरच्या दशकात त्यात अनेक प्रोग्राम करण्यायोग्य वैशिष्ट्ये जोडली गेली. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



महासागर
नागपूर वृत्तसागर
बुधवार, दि. १५, ऑक्टोबर २०२५

## संकलित चाचणी पेपर वाटपात केंद्र शाळांची गडबड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद पुणे द्वारा पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांची वर्षातून दोन वेळा संकलित चाचणी तर एक वेळा पायाभूत चाचणी घेण्यात येते. याकरिता पेपर पुणे येथून जिल्हा स्तरावरील शिक्षणाधिकारी यांना देण्यात येते.

त्यानंतर शिक्षणाधिकारी आपल्या अधिनस्त गटशिक्षणाधिकारी यांना ते पेपर देतात व त्यानंतर ते पेपर केंद्र शाळांना पोहोचविले जातात .केंद्र शाळांवर जबाबदारी असते की त्यांच्या अधिनस्त जेवढ्या शाळा असतील तेवढ्या शाळातील संचमान्यतेच्या संख्येनुसार त्यांना पेपर देण्यात यावे .

पण या ठिकाणी नागपूर शहरातील काही केंद्रशाळा मोठ्या प्रमाणात गडबडी करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

यानुसार असे निदर्शनास आले आहे केंद्र शाळा स्वतःच्या शाळेतील सध्या चालू असलेल्या शैक्षणिक वर्षातील संख्येप्रमाणे आपले पूर्ण पेपर बाजूला काढतात व त्यानंतर उरलेले पेपर त्यांच्या अधिनस्त शाळांना देण्यात येतात व बाकी शाळांना त्यामुळे खूप कमी पेपर पोहोचविले जातात व त्यांना नाहक त्रास होतो. यामुळे काही शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार सुद्धा केलेली आहे.

पण तरीसुद्धा त्याकडे शिक्षण विभागाने काहीच लक्ष दिलेले नाही. फक्त नावाकरिता देखरेखी करता एक व्यक्ती पाठविला जात असतो पण त्यांना त्याच्यातील काहीच ज्ञान नसते त्याच्यामुळे केंद्र शाळा आपले कार्य असे सुरू ठेवतात.

# दीक्षाभूमिवर अनुयायांचे अभिवादन!



दीक्षाभूमीवर भिक्खुसंघातर्फे बाबासाहेबांचा जयघोष



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

नागपूर येथील दीक्षाभूमीवर मंगळवारी भिक्खुसंघातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि धम्मसेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बुद्धवंदना सोहळ्यात मोठ्या संख्येने अनुयायी सहभागी झाले होते. यामुळे दीक्षाभूमी पुन्हा एकदा धम्ममय वातावरणात न्हाऊन निघाली.

स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत काशाय वस्त्रातील भिक्खु आणि भिक्खुनी संघ सकाळी दीक्षाभूमीवर पोहोचला.

भदंत ससाई यांनी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर उपस्थित अनुयायांनी त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करत बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांप्रती निष्ठा व्यक्त केली.

### भदंत ससाई यांच्या उपस्थितीत बुध्दवंदना संपन्न

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी याच दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करून बौद्ध धर्म स्वीकारला होता. या ऐतिहासिक धम्मदीक्षेच्या स्मृतीमुळे ही भूमी आजही तेजोमय आहे. दरवर्षी या दिवशी भदंत ससाई यांच्या उपस्थितीत बुद्धवंदना आयोजित केली जाते, जो सामाजिक परिवर्तन, समानता आणि बंधुत्वाचा संदेश देतो.

याप्रसंगी भंते नागसेन, भंते धम्मविजय, भंते नागानंद, भंते नागवंश, भंते महानागा, भंते कश्यप, भंते अश्वजित, भंते बुध्दघोष, भंते धम्मप्रकाश, भंते संघ, भंते शांतीनागा, तसेच भिक्खुनी कुंडलिका, अनोमा, चित्ताबोधी, धम्मानंद, सुमेधा, बोधीआर्या, सुपवासा, करुणादीप, शीलानंद आणि विशाखा यांनीही उपस्थित राहून धम्मकार्याची अखंड परंपरा पुढे नेली.

तत्पूर्वी, भिक्खुसंघाने इंदोरा बुद्धविहार येथील बाबासाहेबांच्या पुतळ्याला तसेच संविधान चौक आणि विमानतळ परिसरातील पूर्णाकृती पुतळ्यांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.

## बूट फेकणाऱ्या वकिलाविरोधात सरन्यायाधीश गवईंनी तक्रार का केली नाही?



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

देशाचे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर आज सर्वोच्च न्यायालयात बूट फेकण्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. सर्वोच्च न्यायालयातील राकेश किशोर नावाच्या वकिलाने हे धक्कादायक कृत्य केले होते. यावर सामाजिक आणि राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. यावेळी खासदार आणि आझाद समाज पक्षाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद यांनी गंभीर प्रतिक्रिया दिली आहे.

आझाद समाज पक्षाच्या वतीने सुरेश भट सभागृहात प्रबुद्ध जन संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आझाद म्हणाले की, पहिल्यांदा एक बौद्ध व्यक्ती या देशाचे सरन्यायाधीश झाले. मात्र, त्यांच्यावर फेकण्यात आलेला जुता हा केवळ त्यांच्यावर नाही तर आपल्यासारख्या प्रत्येकाच्या अंगावर फेकण्यात आला होता. सरन्यायाधीश गवई हे बुद्ध विचारांचे असल्यामुळे त्यांनी आरोपीला क्षमा केली. मात्र, पोलिसांनी अशा आरोपीला सोडायला नको होते. त्यांच्यावर प्रशासनाने कारवाई करायला हवी होती, असेही आझाद म्हणाले. संघ आणि भाजप सत्तेत असूनही त्यांचा विचाराचा प्रचार करण्यासाठी प्रयत्न करतात. मात्र, आपल्या समाजाची स्थिती बिकट असतानाही आमचा समाज थंड बसला आहे. आपल्यासाठी लढणारे दुसरे बाबासाहेब आता होणे कधीच शक्य नाही. महाराष्ट्र ही क्रांतीची भूमी आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरातून संघर्षाची मशाल पेटणे आवश्यक आहे. आपली राजकीय शक्ती दाखवून महाराष्ट्रात सत्ता निर्माण केल्याशिवाय स्वस्त बसू नका, असे आवाहन खासदार आणि आझाद समाज पक्षाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद यांनी केले.

आझाद म्हणाले, उत्तर प्रदेशपासून महाराष्ट्रापर्यंत आपल्या लोकांची समस्या आजही एकच आहे. त्यामुळे आपली राजकीय शक्ती उभी करून सत्ताधारी जमात निर्माण केल्याशिवाय आपल्या लोकांच्या घरात आनंदाचे दिवस येऊ शकत नाही.

## प्रेयसीकडून ब्लॅकमेलिंग
## तरुणाने संपवले जीवन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

प्रेयसीकडून वारंवार ब्लॅकमेलिंग आणि लग्नासाठीच्या दबावाला कंटाळून नागपुरात एका विवाहित कृषी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ईश्वरलाल चौधरी (वय 21) असे या मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. आत्महत्येपूर्वी ईश्वरलालने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कृषिमंत्र्यांना पत्र लिहून न्यायाची मागणी केली आहे.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, काचीपुरा चौकातील मुलांच्या वसतिगृहात राहणारा ईश्वरलाल विवाहित असून तो कृषी अभ्यासक्रमाच्या सातव्या सेमिस्टरला शिकत होता. ईश्वरलालचे गुंजन नावाच्या तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. दरम्यान, गेल्या सहा महिन्यांपासून गुंजन त्याला पैशांसाठी ब्लॅकमेल करून लग्नासाठी दबाव टाकू लागली. तसेच त्याला गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊ लागली. त्यामुळे ईश्वर तणावात होता या सततच्या छळामुळे आणि धमक्यांमुळे ईश्वर तणावाखाली होता.

अखेर 1 ऑक्टोबर रोजी त्याने वसतिगृहातील खोलीत दोरीने गळफास घेऊन जीवन संपवले. याप्रकरणी पोलिसांनी ईश्वरच्या पत्नीचा जबाब नोंदवला. तिने पोलिसांना सांगितले की, "ती तरुणी ईश्वरवर लग्नासाठी दबाव टाकत होती आणि त्याचा मानसिक छळ करत होती. तसेच, 'मी मुलगी आहे, तुझे कोणी ऐकणार नाही, न्यायव्यवस्था माज्या बाजूने आहे,' अशी धमकी ती सातत्याने देत होती."

त्यानंतर बजाजनगर पोलिसांनी पोलिसांनी गुंजनविरुद्ध ब्लॅकमेल व आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### चिठ्ठीतून पंतप्रधानांना विनंती

पोलिसांनी ईश्वरने आत्महत्येपूर्वी लिहिलेली दोन पानी चिठ्ठी आणि त्याचा मोबाईल जप्त केला आहे. या चिठ्ठीत त्याने पंतप्रधान आणि कृषिमंत्र्यांना कळकळीची विनंती केली आहे. भारतात सर्वांसाठी कायदा सारखाच असायला हवा. मुली कायद्याचा गैरफायदा घेत आहेत. माज्यासोबत ज्यांनी चुकीचे केले, त्यांना शिक्षा व्हायलाच हवी. न्यायालयावर माझा विश्वास आहे, अशी न्यायाची मागणी ईश्वरने पंतप्रधान आणि कृषि मंत्र्यांकडे केली आहे. तसेच मी ज्यांना मदत केली त्यांनी माज्या आई-वडिलांना मदत करा, माझी कमतरता भासू देऊ नका. मी आत्महत्या केल्यानंतर माझे सॅड स्टेटस ठेऊ नका. त्याने काहीही होणार नाही. मी एकुलता एक मुलगा आहे. मी हरलो आहे. मी चुकीचे पाऊल उचलत आहे. याची शिक्षा माज्या नातेवाइकांना भोगावी लागेल, असेही ईश्वरने मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटले आहे.

## मनपाची यंत्रणा दीक्षाभूमी परिसराच्या स्वच्छतेसाठी कार्यरत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मंगळवारी (ता.१४) दीक्षाभूमी येथे आलेल्या हजारो अनुयायांच्या सेवेसह संपूर्ण परिसराच्या स्वच्छतेसाठी मनपाची यंत्रणा कार्यरत होती.

मनपाचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वात व अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त तथा सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या मार्गदर्शनात स्वच्छतेच्या निगडित विविध कार्य करण्यात आली.



मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचारी आघाडी सांभाळून साफसफाई करण्यास सुरूवात केली. मनपातर्फे नळाद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात आली, तसेच तीन मोबाईल प्रसाधनगृह सुविधासह, मनपाचे आरोग्य पथक आणि अँब्युलन्स सेवा या नागरी सुविधांची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय परिसरात अग्निशमन गाड्या आणि जवान दीक्षाभूमीवर तैनात होते.

त्याकरिता एजी इंनव्हायरो एजंसी सह सफाई कर्मचारी यांनी नियुक्ती करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या मदतीला सफाई करण्याकरिता लहान मोठ्या अशा १० गाड्या लावण्यात आल्या. याशिवाय दीक्षाभूमी येथे आलेल्या अनुयायांना रीतसर कचरा पेटीत कचरा टाकण्यात यावा याकरिता कचऱ्याच्या पेट्यांची व्यवस्था केली गेली. पोलिस प्रशासन आणि मनपाचे कर्मचारी उपद्रव शोध पथक अनुयायांना मार्गदर्शन केले.

## खाजगी ट्रॅव्हलचे वाढले प्रवास भाडे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

दिवाळीच्या सुट्टीत आपआपल्या गावी जाण्यासाठी प्रवाशांची संख्या वाढल्याने विमान कंपण्यांनी तिकीट दर वाढविले आहे. याशिवाय लांब पल्ल्याच्या मार्गावरील खाजगी ट्रॅव्हलचे दर वाढल्याने प्रवाशांना फटका बसला आहे. निमित्त्याने आपल्या गावी जाण्यासाठी अनेकांनी रेल्वेचे आरक्षण काढल्यामुळे त्यांचा प्रवास आरामदायक होईल, अशी अपेक्षा होती. मात्र वेळेवर तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी असल्याने रेल्वेतील अवस्था गंभीर झाली आहे. मुख्यतः दिवाळीच्या दहा दिवसातील सर्व विमान कंपण्यांची तिकीट उपलब्ध नसल्याने काही विमान कंपन्यांनी प्रवाशांचे दिवाळे आहे. पुणे, मुंबई,दिल्ली या देशांतर्गत विमान सेवा पुढील दहा दिवसांसाठी महागली आहे. येत्या शनिवारपासूनच दिवाळी सणाला सुरुवात होत असल्याने मुंबई, पुणे, दिल्ली,लखनऊ, पाटणा आदी प्रमुख शहराचे विमान भाडे वाढले आहे. विदेशातील तिकीटांच्या बरोबरीचे प्रवास भाडे देशांतर्गत विमान सेवेचे झाले आहे. एकीकडे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर खाजगी ट्रॅव्हल आणि भाडे वाढल्याने आर्थिक फटका तर दुसरीकडे आरक्षण तिकीट उपलब्ध असताना रेल्वेतील प्रवास गर्दीतून करावा लागत आहे.

## आजपासून गुलाबी रोषणाईने उजळणार शहर
### जागतिक स्तन कर्करोग जनजागृती अंतर्गत विशेष उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जागतिक स्तन कर्करोग जनजागृती दिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मेगा जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत बुधवार १५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान शहरातील विविध ठिकाणे, प्रमुख चौक गुलाबी रंगाच्या रोषणाई उजळविण्यात येणार आहे.

दरवर्षी १६ ऑक्टोबर हा दिवस जागतिक स्तन कर्करोग जनजागृती दिन म्हणून साजरा केला जातो, याच दिनाचे औचित्य साधून १५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासन डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या स्तनाच्या कर्क रोगाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून शहरातील मुख्य बारा चौकांमध्ये गुलाबी रंगाची रोषणाई केली जाणार आहे.

मनपाच्या विद्युत विभागाद्वारे सिव्हिल लाइन्स स्थित मनपा मुख्यालय इमारत, सीताबर्डी व्हेरायटी चौक, सदर उड्डाणपूल, सक्करदरा उड्डाणपूल, शंकर नगर उद्यान, धरमपेठ झोन कार्यालय राम झुला उड्डाणपूल अजनी मेट्रो स्टेशन, एअरपोर्ट मेट्रो स्टेशन, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमान नगर झोन कार्यालय, आंबेडकर उद्यान, आदी विविध ठिकाणावर गुलाबी रोषणाई केली जाणार आहे.


नागरिकांनी देखील येत्या १६ ऑक्टोबर रोजी गुलाबी रंगाचे कपडे परिधान करून, जनजागृतीपर संदेश शेअर करावे, आपली घरे व कार्यस्थळे गुलाबी रंगात उजळवावीत असे आवाहन रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थचे अध्यक्ष रोटेरियन विनय दारा यांनी केले आहे.

## चनकापूर वसाहतीत योगींचा 'बुलडोजर पॅटर्न'

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुंडाराज संपवण्यासाठी ज्या 'बुलडोजर पॅटर्न'चा यशस्वी वापर केला, त्याचीच प्रचिती आता चनकापूर वसाहतीत येत आहे. आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्या अथक प्रयत्नांना यश आले असून गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांचे आश्रयस्थान ठरलेल्या वेकोलीच्या जीर्ण इमारतींवर अखेर बुलडोजर फिरला आहे.





### आमदार डॉ. आशिष देशमुखांच्या प्रयत्नांना यश

या कारवाईमुळे चनकापूर, बलनी, सिल्लेवाडा परिसरातील गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांना कायमस्वरूपी लगाम बसण्याची शक्यता वर्तविण्यात आहे. चनकापूर वसाहतीत एका महिन्यांपूर्वी अकरा वर्षीय शाळकरी विद्यार्थी जीत सोनेकर याची क्रूर हत्या झाली होती या घटनेनंतर चनकापूर येथील वेकोलीच्या जीर्ण इमारती गुन्हेगारांचे सुरक्षित आश्रयस्थान असल्याचे उघड झाले होते वेकोली वसाहतीत चरस, गांजा, एमडी सारख्या अमली पदार्थांची खुलेआम विक्री होत आहे शिवायक देशी कट्टे, माऊझर, बंदुका सारख्या अग्निशास्त्रांची खरेदी विक्री केल्या जात आहे गुन्हेगारांसाठी वेकोली वसाहत हक्काचे ठिकाण बनले होते.

या गंभीर मुद्द्याची दखल घेत सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी गुन्हेगारी अड्ड्यांवर बुलडोजर चालवण्याचा शब्द दिला होता.

डॉ. आशिष देशमुख यांनी या विषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वेकोली प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला त्यांच्या प्रयत्नांना यश आले १४ ऑक्टोबर रविवारपासून वेकोलीच्या जीर्ण झालेल्या इमारतीवर बुलडोजर चालविण्यात आला असून, इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत.

वेकोली वसाहतीत मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा नायनाट करण्यासाठी 'ऑपरेशन थंडर २०२५' अंतर्गत विशेष मोहीम राबविली जात आहे. या कारवाईमुळे केवळ गुन्हेगारीवरच नव्हे तर परिसरातील अंमली पदार्थांचे जाळे आणि अवैध शस्त्रास्त्र विक्रीवरही मोठा आळा बसणार आहे. त्यामूळे वेकोली परिसरातील नागरिकांना शांतता आणि सुरक्षितता लाभेल असा विश्वास आमदार डॉ. देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

### अतिक्रमणाचा मुद्दा अजूनही ऐरणीवर

वेकोली वसाहतीत अनेक इमारती जीर्ण झाल्या आहेत रविवारला एक इमारत जमीनदोस्त करण्यात आली. मात्र वसाहतीत अनेकांनी एकाच वेळी तीन-तीन गाळ्यांवर अतिक्रमण केल्याची माहिती मिळाली आहे त्यामुळे गुन्हेगारीसोबतच अतिक्रमण दूर करणे ही काळाची गरज असून वेकोली प्रशासनाला यावर कठोर पाऊले उचलणे आवश्यक आहे.

## धम्मसंध्या कार्यक्रमाला लोटला धम्मसागर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई मार्फत धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या धम्मसंध्या या सांस्कृतिक कार्यक्रमाला धम्मसोगर लोटला. माजी आमदार डॉ. मिलिंद माने, माजी नगरसेवक मनोज सांगोळे व इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महामानवांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कडूबाई खरात यांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून धम्म संदेश दिला व बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली त्यांनी आपल्या सुमधुर आवाजातून विविध समाजप्रबोधनात्मक गीते गायली. याप्रसंगी फार मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते. प्रचंड टाळ्यांच्या गजरात कलावंतांना प्रतिसाद दिला. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून, तसेच, सांस्कृतिक विभागाचे सचिव डॉ. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात व विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनात हा कार्यक्रम पार पडला. सांस्कृतिक कार्य विभाग नागपूरचे सहाय्यक संचालक संदीप शेंडे यांनी कलावंताचे कौतुक केले व प्रतिसादाबद्दल जनतेचे आभार मानले. याप्रसंगी कुलदीप कोवे, वसंता खडसे आदि. मान्यवर उपस्थित होते.

# जनतेच्या विश्वासाला तडा जावू देणार नाही : ॲड. आशिष जयस्वाल

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १४ :



रामटेक लोकसभा निवडणुकीतील पराभव विसरून शिवसेना कार्यकर्त्यांनी आगामी होणाऱ्या निवडणुकीत अंग झटकून कामाला लागावे आणि विरोधकांचे फेक नरेटीव्ह खोडून काढून आपल्या केंद्र व राज्य सरकारने जनकल्याणासाठी राबविलेल्या सोयीसुविधा, सवलती, जन कल्याणकारी योजना शिवसैनिकांनी प्रत्येकांच्या घरोघरी जावून जनतेपर्यंत जाऊन सांगाव्यात, जनतेने माज्यावर टाकलेल्या विश्वासाला मी तडा जावू देणार नाही, असे आवाहन राज्याचे राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी येथे बोलतांना केले.

जशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आहे, तशी मुख्यमंत्री माझी सुरक्षित बहीण योजनादेखील आमची आहे. ज्या लोकांनी लेकीबाळी, बहिणीशी पंगा घेण्याचे काम केले; त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केला, त्यांना पण सोडणार नाही राज्यातील महायुतीची सरकार स्वस्थ बसणार नाही, म्हणून यंदाच्या होणाऱ्या निवडणूकीत शिवसेना कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील संपूर्ण जागा महायुतीच्या पारड्यात येण्यासाठी परिश्रमाची पराकाष्टा करून विजयश्री खेचून आणावी, असे आवाहनही केले.

हिंदूहृयसम्राट वंदनीय बाळसाहेब ठाकरे यांचे ज्वलंत हिंदूत्वाचे विचार घराघरात पोहोचले पाहिजे यासाठी व आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यानीं सक्रिय व्हावे हे बिंद्र समोर ठेऊन राज्याचे राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत मौद्यात रविवार 12 ऑक्टोबर ला सायंकाळी 4 वाजता शिवप्रतिक सेलिब्रेशन लॉन येथे शिवसेनेचा संघटन अभियान कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यात उपस्थित म्हणून जिल्हा संघटिका करूना आष्टनकर, माजी जि.प. सभापती हर्षवर्धन निकोसे, न.पं.पारशिवणी गटनेता दीपक शिवणकर, शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत भुरे, माजी जि.प. सभापती नंदात लोहाबरे, नागपूर ग्रामीण तालुका प्रमुख रंजीत लाडस्कर, तालुका संघटिका रंजना पिसे, माजी तालुका प्रमुख सदुकर हटवार, युवासेना तालुका प्रमुख रुषभ बावणे, युवासेना तालुका प्रमुख शुभम गभने, माजी पं.स.सभापती मनोज कोठे, माजी उपसभापती महेश मोटघरे, माजी उपसभापती रक्षा थोटे, श्रीहरी थोटे, रामपाल किरपान, मनोज गहेरवार, पुंडलिक गिरेपुंजे, महेंद्र चकोले, बंडु सार्वे, अरविंद तांबुलकर, महेंद्र शेंडे, विकास झाडे, स्वप्नील भोयर, शहर संघटिका वंदना बुरडे, शहर प्रमुख पिंटू धनजोडे, अभी बडे व तालुक्यातील आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलतांना ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले की रामटेक विधानसभेतील काही भाग हा मौदा तालुक्यातील येत असताना येथील मतदारांनी दिलेल्या समर्थ साथीमुळेच आज मी राज्याचा राज्य मंत्री पदापर्यंत पोहचलो. माय बाप जनतेने माज्यावर टाकलेल्या विश्वासाला मी तडा जावू देणार नाही, या मतदार संघाकरीता भरीव असा विकासात्मक कामांकरीता निधी कधीही कमी पडू देणार नाही. मंत्री पदाचा वापर हा मतदार संघापुरताच नव्हेतर विदर्भासह संपूर्ण राज्यामध्ये आपल्याला काम करण्याची संधी पक्षाने दिली आहे. या संधीचे सोने केल्याशिवाय राहणार नाही, शिवसेना कार्यकर्त्यांनी आतापासून कामाला लागावे.

प्रत्येक गावात शिवसेनेची एक शाखा उघडून. प्रत्येक व्यतीची सदस्य नोंदणी करून घ्यावी. माज्याकडून जे काही मदत लागत असेल ते मी पूर्ण करायला तयार असल्याचेही त्यांनी बोलतांना व्यक्त केले. या संघटन अभियान व कार्यकर्ता मेळाव्यात तालुक्यातून शेकडो महिला व पुरुष कार्यकर्ते यात सहभागी झाले होते,

### जयस्वाल' हे अजिंक्ययोध्दा मंत्री....वांगे

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी बोलतांना म्हटले की आगामी होणाऱ्या निवडणुकीत आम्ही शिवसेनेच्या वतीने रणशिंग फुंकले जाणार आहे. त्या अगोदर कार्यकर्त्यांचे मनोमिलन झाले पाहिजे, यासाठी या संघटन अभियान व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यानंतरही तालुक्यात दोन ते तीन मेळावे होणार आहे. अशा बैठकांमुळे तालुक्यात एक वेगळे बळ निर्माण होईल. राज्याचे राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणजे एक अजिंक्य योध्दा आहेत. त्यांनी रामटेक आणि मौदासह विदभार्तील सहा जिल्ह्याचा विकास केला असून, आपले आस्तित्व निर्माण केले आहे. विकासाच्या जोरावरच ते सर्वात जास्त मतांनी निवडून सुद्धा आले आहेत, इतर विकासकामेही त्यांनी केलेली आहे. असे असले तरी आपल्याला शिसेनेच्या माध्यमातून घराघरात पोहाचावे लागणार असून, लोकांना योजनांसह विकासकामे सांगावी लागणार आहे. आमच्याविषयी लोक काहीही बोलतात.

## जि.प. सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची पेन्शन रखडली

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

जिल्हा परिषदेच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांची माहे सप्टेंबर पेड इन ऑक्टोबरची नियमित पेन्शन आजपर्यंत मिळालेली नाही. त्यामुळे सेवानिवृत प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुखांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त करण्यात येत आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर पेन्शन वेळेवर मिळत नसल्याने सेवानिवृत्त शिक्षकांना आर्थिक अडीअडचणींचा सामना करावा लागतो. शासनाने दरमहा एक तारखेला पेन्शन देण्याचे निर्देश असूनही जिल्हा परिषद नागपूर येथील सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना आपल्या पेन्शनची चातकाप्रमाणे वाट पाहावी लागते. शासन प्रशासनाने पेन्शन दरमहा एक तारखेला नियमितपणे वितरीत करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेत्तर सेने तर्फे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर, देविदास काळने, प्रवीण मेश्राम, दिलीप शेंडे, मोरेश्वर डहाके, उमेश कावळे, राजू कुंभारे, रमेश सोनवाने, ज्ञानेश्वर डहाके, विनोद शिरपूरे आदींनी केली आहे.

# ओमप्रकाश पांडे यांना ग्रामगीताचार्य पदवी प्रदान

■ महासागर प्रतिनिधी, बेला, दि. १४ :



जवळच्या बरबडी येथील राष्ट्रीय महामार्गावरील आदिनाथ गुरुमाऊली सेवाश्रमाचे संस्थापक तथा प्रसिद्ध सद्गुरु ब्रम्हमुर्ती शेषानंद महाराज यांचे पुत्र ओमप्रकाश पांडे यांना गुरुकुंज मोझरी आश्रमाकडून नुकतीच 'ग्रामगीताचार्य' पदवी प्रदान करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवा मंडल गुरूकुंज आश्रम,मोझरी यांच्या वतीने दरवर्षी ग्रामगीता जीवन विकास परीक्षा घेतल्या जाते. त्यामध्ये यंदाचे परीक्षेत ओमप्रकाश पांडे यांनी महाराष्ट्रातून सर्वाधिक गुण मिळवून पहिला नंबर पटकावला. सोबतच प्रबंध व्याख्यानात सुद्धा त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. मोझरी आश्रमाचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे, संचालक मंडळाच्या अध्यक्ष पुष्पाताई बोंडे परीक्षा विभागाचे अध्यक्ष गुलाबराव खवसे सचिव गोपालदादा कडु व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओमप्रकाश पांडे यांना सन्मानपत्र मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन ग्रामगीताचार्य पदवी प्रदान करण्यात आली.सदर परीक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समग्र वाडमय व ग्रामगीतेवर आधारित असते. पांडे यांना आध्यात्मिक वारसा असल्यामुळे त्यामध्ये त्यांना सुलभरीत्या यश मिळवता आले.त्यांनी आपल्या यशाचे श्रेय वडील गुरुवर्य शेषानंदबाबा,गुरुआई, कुटुंबीय व मार्गदर्शक ग्रामगिताचार्य राधेश्यामजी निमजे ,नागपुर यांना दिले.

यशस्वीतेबद्दल ग्रामगीताचार्य बेबीताई पिंपळशेन्डे,रविन्द्र गाडगे, पुजाराम खिरटकर बुटीबोरी रविन्द्र विवेक नान्हे सोनेगाव, प्रभु दोडके, चिंधीचक विशाल गांवडे, गुणवंत कुत्तरमारे, ममता पांडे, भद्रावती राजु मेघरे, हिंगणघाट,प्रकाश घवघवे, सिंदी रेल्वे कौशिक ठाकरे, वर्धा दिनेशराव वाल्दे, अमरावती देवराव किंगरे, चंद्रपुर देवकाताई कुकडे,नेर संतोष वैरागडे,शिरूळ मंगेश रेवाडे,वाकेश्वर गणेश ठाकरे,गणेश ठाकरे,डोंगरगांव अनिल खामनकर ,चिचांळा राज गुमनार, कांढळी, गजानन कुमरे,बरोरा शुभम धानोरकर, चिचांळा लक्ष्मन वांढरे, रागंना गणेश पांगुळ ,दापोरा ईश्वर पाटिल,पाचंगाव मनोहर भिंगारे,डोरली आदींनी ओमप्रकाश पांडे यांचे अभिनंदन केले.

## एमकेएम खो-खो प्रिमियर लीगचा सोहळा संपन्न

नागपूर : एमकेएम खो-खो प्रिमियर लीग 2025 च्या लोगो लॉंचिंगच्या अप्रतिम सोहळ्यानंतर, महाराष्ट्र क्रीडा मंडळ, नागपूर द्वारा आयोजित स्पर्धेत भाग घेणाऱ्या चमूचे ऑक्शन सोहळा रविवारी दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाला झुलेलाल शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष जय सहजरामानी, एमेनेट डिझाईनचे संचालक व आर्किटेक्ट लोकेश कडू, गडकरी कोचिंग क्लासेसचे संचालक किरण गडकरी, आणि महाराष्ट्र क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सुमंत चितळे उपस्थित होते.

निवड झालेल्या 72 खेळाडूंना आपल्या संघात सामील करण्यासाठी सर्व चमूचे प्रशिक्षक, सहा.प्रशिक्षक, मेंटॉर तसेच संबंधित संघाचे मालक उपस्थित होते. प्रसिध्द आर.जे. आमोद यांनी लिलावाची सूत्रे उत्तम प्रकारे सांभाळून कार्यक्रमात रंगत आणली. संपूर्ण ऑक्शनमध्ये सहा संघात खेळाडूंचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले.

# ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तनदिनी विविध संघटनांकडून बाबासाहेबांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १४ :

परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी14 ऑक्टोंबर 1956 ला नागपुरच्या पवित्र दीक्षा भूमीवर करोडो अनुयायीसह बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. त्या घटनेला आज 69 वर्ष झाली, त्या अनुषंगाने काटोल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती न.प. काटोल बहूजन वंचित क्रांति सेना दुर्वा ट्रेनिंग सेंटर यांच्या वतीने माल्यारपण करुण तसेच स्मारक समितीचे अध्यक्ष न.प. काटोलचे माजी सभापती दिगांबर डोंगरे व मुख्याधिकारी धनंजय बोरीकर यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन व माल्यारपण करुण पंचशील त्रीसरण ग्रहण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी बोरीकर व दिगांबर डोंगरे यांनी बाबासाहेबांच्या धम्मक्रांतिवीर विचार सांगीतले. यावेळी उपमुख्याधिकारी नेमाडे कळंबे अभियंता राजेंद्र काळे तन्मय वाळके, अविनाश बरसे, राजु सावरकर यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा डोंगरे, सुरेंद्र लोही, सुनिल नारनवरे, दिनेश निंभाळकर, रवि दलाल, धीरज ढोके, सुरेशराव देशभ्रतार, आकाश मेश्राम, बंडु गजभिये, विकास सोमकुवर, रवि सोमकुवर, बाबा तागडे, दिगांबरराव भगत, अनिल लोखंडे, गुलाबराव तागडे तसेच नगरपरिषदेचे शिक्षक कर्मचारी यांच्यासह मोठया प्रमाणात बौध्द बांधव उपस्थित होते.

# पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज

## जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात कार्यशाळा




■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १४ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व इन्व्हरमेंट सायन्स सेल यांच्या संयुक्त विद्यमानाने पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणात आपली भूमिका या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेचे व बॉटनिकल सोसायटीचे उद्घाटन कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सिंधू महाविद्यालयाच्या वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजकुमार खापेकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय टेकाडे होते. डॉ. खापेकर यांनी पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणात व्यक्तीची भूमिका यावर चर्चा करण्यात आली.

हवामान बदल, प्रदूषण आणि जैवविविधतेतील घट यांसारख्या गंभीर पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्यासाठी शिक्षण आणि जागरूकता किती आवश्यक आहे. यावर वक्त्यांनी भर दिला. कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना पर्यावरण संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्य प्रदान करण्यात आले. याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ. नरेंद्र घारड, कार्यक्रमाचे संयोजक डॉ. नभा कांबळे, डॉ. मनीषा भातकुलकर व डॉ. काशिनाथ मानमोडे, वनस्पती शास्त्र विभागाचे डॉ. मयुरी देशमुख, वैभव मेंगरे , डॉ. रेश्मा हिवसे उपस्थित होते. संचालन हुमेरा खान यांनी तर आभार तनुश्री दाभेकर यांनी मानले. यावेळी डॉ. गजानन झाडे, डॉ. नितीन कोंगरे, प्रा.अक्षय पाटील, प्रा. सिद्धार्थ लोणारे, प्रा.अश्विनी शेंडे, प्रा. आकांक्षा बांगर, प्रा. शितल बोंडे, प्रा.धनराज राठोड , रितेश डाहारे आणि इतर प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रसंताच्या पुण्यतिथीनिमित्त अमृता कडूकर यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १४ :



वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी मध्ये अमृता भुषण कडूकर,रा. नगरधन यांचा अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ मोझरी च्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे यांच्या हस्ते व प्रचारप्रमुख प्रकाश महाराज वाघ, बाबाराव पाटील आणि इतरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

अमृता भूषण कडुकर यांनी सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी वडील रामभाऊ धाकूलकर, भूषण कडूकर, ओम व गुंजन कडूकर, भांडारकर आणि इतर असंख्य गुरुदेव प्रेमी हजर होते. सर्व नगरधन वाशीयांनी त्यांचे स्वागत व अभिनंदन केले.

# रेल्वे फूट ओव्हर ब्रिज गर्डर लाँचिंगसाठी दहेगाव रोडवरील वाहतूक बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

प्रवाशांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने मध्य रेल्वे, नागपूर विभागांतर्गत वर्धा जिल्ह्यातील तुलजापूर स्टेशन येथे रेल्वे फूट ओव्हर ब्रिज बांधकामाचे काम सुरू आहे. या कामाच्या अंतर्गत गर्डर लॉंचिंगचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे.

या संदर्भात संबंधित विभाग, स्थानिक प्रशासन व नागरिकांना कळविण्यात येते की चौथ्या लाईनलगत असलेला दहेगाव रोड गर्डर लॉंचिंगच्या कामादरम्यान 15 ऑक्टोबर 2025 रोजी रात्री 21.00 वाजेपासून ते 16 ऑक्टोबर 2025 रोजी रात्री 20.00 वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूर्णपणे बंद राहील.

या कालावधीत रेल्वे सुरक्षा मानकांनुसार काम केले जाईल. कार्यस्थळी आवश्यक यंत्रसामग्री, क्रेन आणि अभियांत्रिकी साहित्याची ये-जा सुरू राहील. त्यामुळे या परिसरात जड वाहनांची वाहतूक व सर्वसामान्य नागरिकांची हालचाल धोकादायक ठरू शकते. म्हणूनच प्रवासी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

मध्य रेल्वे, नागपूर विभाग नागरिक व स्थानिक रहिवाशांना विनंती करतो की सदर कालावधीत दहेगाव रोडचा वापर टाळावा आणि प्रशासनाने सुचविलेल्या पर्यायी मार्गांचा अवलंब करावा.

या काळात होणाऱ्या कोणत्याही गैरसोयीबद्दल रेल्वे तर्फे खेद व्यक्त करण्यात येतो.

# जागतिक बेघर दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर आयोजित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



नागपूर महानगरपालिका नागपूर व समाज विकास विभाग म.न.पा नागपुर, दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, द्वारा संचालित आपुलकी शहरी बेघर निवारा आणी बोधिसत्व शहरी बेघर निवारा येथे जागतिक बेघर दिनाचा कार्यक्रम अभिजित चौधरी आयुक्त म.न.पा वैष्णवी बी. अति. आयुक्त, डॉ. रंजना लाडे उपायुक्त समाज विकास विभाग यांच्या मार्गदर्शनानुसार आणि सहकार्याने संपन्न झाला.जागतिक बेघर दिनाच्या निमित्ताने आरोग्य तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले.

या वेळी कार्यक्रमाचे उदघाटक ममता महेश शहारे माजी नगरसेविका, अमिता खापर्डे (आरोग्य प्रतिनिधी), तसेच बोधिसत्व शहरी बेघर निवाऱ्याचे संचालक भास्कर पराते आणी आपुलकी शहरी बेघर निवाऱ्याचे संचालक देवेंद्र गाडे, प्रमोद खोब्रागडे, मोनिका फुलमाळी, रवींद्र तेलगोटे, ॲड. आशिष उके, सार्थक बैसवारे (निवारा व्यवस्थापक), वसंत रंगारी, नरेंद्र शरणागत, सेख फरहाद अल्ली (समाज सेवक), प्रीती इंदुरकर, प्रशांत उके, इत्यादी मान्यवरांची जागतिक बेघर दिनाकार्यक्रमात उपस्थिती होती व त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# अपंग व्यक्तींसाठी सुलभता आणि सुविधांवरील प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :




भारतीय रेल्वेने अपंग आणि हालचाल विकार असलेल्या प्रवाशांसाठी रेल्वे स्थानकांवरील सुविधांमध्ये सुधारणा केली आहे.

जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागात फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांसाठी एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आयोजित केले होते. या प्रशिक्षणाचे पहिले सत्र १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ०९:३० वाजता नागपूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित केले जाईल. हे सभागृहात आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये नागपूर विभागाशी संबंधित सर्व स्थानकांमधील आघाडीच्या कर्मचाऱ्यांनी भाग घेतला होता.

हा प्रशिक्षण कार्यक्रम "कौशल्य विकास, पुनर्वसन आणि अपंगत्व केंद्र" येथे असलेल्या "संयुक्त प्रदेशिक केंद्र (सीआरसी) नागपूर" येथे आयोजित केला जात आहे.

सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या संस्थेचे संचालक प्रफुल्ल शिंदे आणि सहाय्यक प्राध्यापक श्रीमती अनुरुपा शिंदे यांच्या सहकार्याने नागपूरमधील फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांसाठी सीआरसी नागपूर येथील तज्ञ आणि पुनर्वसन व्यावसायिकांनी प्रशिक्षण सत्रे आयोजित केली. त्यांना प्रशिक्षण देण्यात आले ज्यामध्ये त्यांना भारत सरकारकडून अपंगांना उपलब्ध असलेल्या विविध मदतीबद्दल सांगण्यात आले. याशिवाय रेल्वेकडून मिळणाऱ्या सुविधांवरही चर्चा करण्यात आली. सर्वांनी जाऊन आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे आघाडीच्या कर्मचाऱ्यांना अपंगत्व आणि हालचाल विकार असलेल्या प्रवाशांना मदत करण्यास सक्षम करणे.

रेल्वे स्थानकांवर कोणत्याही प्रकारच्या समस्येचा सामना करण्यासाठी त्यांना संवेदनशीलता आणि तत्परतेने सेवा देण्याचे प्रशिक्षण देणे हा यामागचा उद्देश होता. कोणत्याही गैरसोयीचा सामना करू नका. नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता आणि वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर विभागाच्या नेतृत्वाखाली, येत्या काळात इतर स्थानकांवरही टप्प्याटप्प्याने हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला जाईल. या उपक्रमामुळे नागपूर विभागातील रेल्वे स्थानकांवर दिव्यांगांसाठी अधिक सुलभ, सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.

## नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात दान महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

सृजन लोक विकास संस्था, अन्विती टीम आणि हिल टॉप दुर्गा माता मंदिर सेवा समिती यांच्याद्वारा दान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.नागरिकांचा प्रतिसाद प्रचंड होता. स्वयंसेवकांमध्ये सेवाराम हेडाऊ, प्रज्ञा बल्लाळ, दीप्ती बिष्ट, डॉ. शालिनी हेडाऊ, शेफाली दुधबडे आणि मनोहर पठाणानी यांचा समावेश होता. सकाळी ८ ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत. हा कार्यक्रम सुर होता.

उपलब्ध साहित्य ई-कचरा पुनर्वापर कंपन्या, विविध अनाथाश्रम आणि पुनर्वापर संयंत्रांना पाठविल्या जाणार आहे.यावेळी डॉ शालिनी हेडाऊ यांना रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नयन संस्थेच्या सचिव नमिता चोपकर उपस्थित होत्या.

## विरांगणा राणी दुर्गावती मार्शल आर्ट अकादमीच्या खेळाडूंची अस्मिता गेम्स इंडिया वूशू लीगमध्ये चमकदार कामगिरी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

अस्मिता गेम्स इंडिया वूशू विमेन्स सिटी लीग स्पर्धा नुकतीच नागपूर येथील वीरांगना राणी अवंतिबाई तालुका क्रीडा संकुल, कोराडी येथे पार पडली. या स्पर्धेत वीरांगना राणी दुर्गावती मार्शल आर्ट अकादमीच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करत 2 सुवर्ण, 2 रौप्य आणि 2 कांस्य पदक पटकावले असून त्यांची निवड झोनल वूशू स्पर्धेसाठी झाली आहे.

विजेत्या खेळाडूंमध्ये शर्वरी चानोरे आणि लक्षिता निरमलकल यांनी सुवर्ण पदक जिंकले, तर नीता वर्मा आणि पूर्वी नागदवने यांनी रौप्य पदक मिळवले. अस्मिता सोनकुसरे आणि अक्षरा उरकुडे यांनी कांस्य पदक पटकावले. सर्व विजेत्या खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय सुनील बॅनर्जी , संजय पेंदाम, रोशन मडावी, नितीन धुरिया, दीपक बिसेन तसेच मुख्य प्रशिक्षक सुमित नागदवने, सीमा नागदवने, अपेक्षा डोंगरे, राहुल बारमाटे आणि पालकवर्ग यांना दिले.

# अंडर-१७ फुटसल राज्य संघाची कर्णधार नागपूरची मानसी डोलके



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

भारतीय फुटसल संघ यांच्या वतीने नाशिक येथे १० ते १३ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या तिसऱ्या अंडर-17 फुटसल राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी नागपूर जिल्हा संघाची घोषणा करण्यात आली असून, सेंटर पॉईंट स्कूलची विद्यार्थिनी मानसी डोलके हिची कर्णधारपदी निवड झाली आहे.अवघ्या अल्पवयात मिळालेल्या या जबाबदारीमुळे नागपूरकरांसाठी ही एक अभिमानाची बाब ठरली आहे.

मानसीने नुकतीच छत्तीसगडमधील कोरबा येथे झालेल्या ४४व्या वरिष्ठ राष्ट्रीय महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत नागपूरचे प्रतिनिधित्व ओपन गटात केलं होतं, ही तिच्या कारकिर्दीतील एक मोठी उपलब्धी आहे.संघाचे प्रशिक्षक वीरेंद्रसिंह बघेल यांनी सांगितले की, मानसीचा खेळ, तिचा शिस्तबद्धपणा आणि नेतृत्वगुण लक्षात घेऊनच तिला संघाच्या कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. नागपूरचा संघ या स्पर्धेत निश्चितच उजवा ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे.

मानसीच्या निवडीबद्दल प्राचार्या कांचन उके, उपप्राचार्या दीपा चक्रवती, जयती चक्रवती, क्रीडा प्रमुख रोशन चौधरी, तसेच मनोज रक्षक, प्रीतीन रंगारी, खुशाल बालबुधे, निशांत श्रीवास्तव, धीरज यादव, स्वप्निल समर्थ, विनोद डहारे, मिलिंद उपाध्याय, रश्मी बैस, तृप्ती खापर्डे आदी शिक्षक व मार्गदर्शकांनी तिचं अभिनंदन केलं आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवात निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सत्कार




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 57 व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्री गुरुदेव प्रचार विभागाच्या वतीने राष्ट्रसंतांच्या साहित्यांचा विविध क्षेत्रांमध्ये ग्राम गीतेच्या तत्त्वानुसार प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आलेला आहे. नागपूर जिल्ह्यातील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ प्रचार समितीचे सचिव भैयालाल माकडे खसाळा, नरखेड तालुक्यातील डॉ.अर्चनाताई कळंबे, रामटेक तालुक्यातील अमृताताई कडूकर हे जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्यकर्ते ठरले. गुरुदेव सेवा मंडळ सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.

वंदनीय राष्ट्रसंतांच्या ग्रामगीता जीवन परिक्षेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी शिक्षकांना साहित्य पुरविण्यात या कार्यकर्त्यांचा फार मोलाचा वाटा आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत व राष्ट्रसंतांचे साहित्य वाङमय परीक्षा आयोजित करून प्रचारक घडविण्याचे कार्य या कार्यकर्त्यांनी केलेली आहे.

# वाडीत धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

येथील अमरावती महामार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव तथा स्मारक समितीद्वारे पुतळा प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, माजी नगरसेवक प्रमोद भोयर, माजी ग्रा.पं. सदस्य कंठीराम तागडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर,तथागत बुद्ध,सम्राट अशोक यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली.संचालन समितीचे पदाधिकारी राजेश जंगले यांनी तर आभार प्रेम ठवरे यांनी मानले. यावेळी अनिल पुंड, विश्वनाथ कुकसे, ईश्वर उके, प्रेम ठवरे, भीमराव शेंडे,भगवान मेश्राम,अशोक गडलिंगे, मनोज भांगे, अजय हुमणे, किशोर इंगळे, मधुकर शेंडे, प्रकाश रामटेके, वसंता मेश्राम,प्रवीण तायडे,मिलिंद कांबळे, भीमराव नवाडे,वाघमारे, खोब्रागडे उपस्थित होते.

# माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते यश काळबांडेचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, सावरगाव, दि. १४ :

सावरगांव येथे चालत्या बसमध्ये कॉलेजला जाणाऱ्या तरुणीवर एकतर्फी प्रेमातून धारदार शस्त्राने हल्ला झाल्याच्या घटनेत प्रसंगावधान दाखवून तिचा जीव वाचवणाऱ्या यश काळबांडे (वय १९, सावरगांव) या धाडसी तरुणाचा राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गत आठवड्यात सिंदी (उमरी) येथील कॉलेजला जाणाऱ्या १९ वर्षीय तरुणीवर आरोपी नितीन सोपीनाथ तागडे (रा. जुनोना (फुके), ता. नरखेड) याने चालत्या बसमध्ये जीवघेणा हल्ला केला होता. त्या वेळी बसमध्ये उपस्थित असलेल्या यश काळबांडे यांनी तत्परता दाखवत आरोपीचा धारदार शस्त्र असलेला हात पकडून तरुणीचा जीव वाचवला. या झटापटीत यश किरकोळ जखमी झाला होता. आरोपी नंतर फरार झाला, मात्र



पोलिसांनी काही दिवसांपूर्वी त्याला नागपूर अंबाझरी परिसरातून अटक केली. या धाडसी कृतीबद्दल माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज यशचा गौरव केला.देशमुख म्हणाले, यशसारखे तरुण समाजातील खरी प्रेरणा आहेत. संकटसमयी धैर्य दाखवणं हीच खरी देशसेवा आहे. यावेळी नंदलाल मोवाडे, पुरुषोत्तम बोडखे,राहुल रेवतकर, अनिल गोतमारे, संजय कामडी राजु राऊत,नरेश सावंत,रवी रेवतकर,समीर गोडबोले आदि स्थानिक कार्यकर्ते, यशचे पालक व गावकरी उपस्थित होते.

# समर्थ गजानन महाराज मंदिर परिसरात स्वच्छता अभियान

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

समाजप्रबोधनाचे कार्य करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त समर्थ गजानन महाराज मंदिर परिसरात स्वच्छता व श्रमदान अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात परिसरातील तरुण व महिला नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. मंदिर परिसर तसेच आजूबाजूच्या परिसरात साफसफाई करून प्लास्टिक कचरा व घाण दूर करण्यात आली. समाजात स्वच्छतेबाबत जागृती निर्माण व्हावी, तसेच संत तुकडोजी महाराजांनी दिलेल्या स्वच्छतेचे आणि सेवाभावाचे संदेश आचरणात आणावेत. या श्रमदानात निलेश पागरूत, गपि झा, विजय पांडे, स्वप्निल करंडे, विजय रहांगडाले, पप्पू पटले, गजानन रहांगडाले यांच्यासह अनेक युवक व महिला सहभागी झाले.

# संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी मेघे फाऊंडेशनकडून अर्थसहाय्य



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

राज्यात या वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. या आसमानी संकटातून शेतकऱ्यास आर्थिक बळ देण्याचे धोरण शासनाने जाहीर केले आहे. शासनाच्या या मदत दत्ता मेघे फाऊंडेशन कडून २१ लक्ष रुपयाचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांचेकडे दिला. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, पंकज भोयर, माजी आमदार सागर मेघे, समीर मेघे उपस्थित होते.

# धनगर समाजाची विदर्भस्तरीय बैठक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

सकल धनगर समाज, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एस.टी. आरक्षणासंदर्भात विदर्भस्तरीय चर्चासत्र संत गजानन महाराज मंदिर सभागृह, बालाजी नगर येथे पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आमदार हरिभाऊ भदे यांनी भूषविले. मंचावर पुरुषोत्तम डाखोळे, रमेश पाटील, अनिल ढोले, पांडुरंग खांदवे, वसंतराव आस्कर, रामकृष्ण आस्कर, प्रकाश नवरी, वसंतराव ढोके आणि अशोक पातोंड यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी मनरेगाचे योगदान

## ग्रामीण भागात मागेल त्याला रोजगार व विकासाला चालना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून, ग्रामीण भागातील काम मागणाऱ्या लोकांना अकुशल रोजगाराची हमी देणारी ही योजना राज्यात प्रभावीपणे राबविली जात आहे. वर्षभर ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांना रोजगाराची हमी देण्याबरोबरच उत्पादक मत्ता निर्माण करण्यावरही या योजनेचा भर आहे. मनरेगा योजनेंतर्गत राज्यात आजवर 36 लाख 63 हजार 630 वैयक्तिक आणि सार्वजनिक कामे पूर्ण झाली आहेत. केंद्र शासनाने आर्थिक वर्ष 2025-26 या वर्षासाठी 13 कोटी मनुष्यदिवस निर्मितीचे लेबर बजेट मंजूर केले आहे. या वर्षी राज्यात 27 लाख 22 हजार कुटुंबांतील 46 लाख मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याद्वारे 9 कोटी 28 लाख मनुष्यदिवस निर्माण झाले असून, त्यात 21 लाख 20 हजार महिला मजुरांनी सहभाग नोंदविला आहे.

शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासासाठी योजनेअंतर्गत सिंचन विहिरी, फळबाग, गोठे, शेळीपालन व कुक्कुटपालन शेड यासारख्या वैयक्तिक लाभाच्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. मनरेगा अंतर्गत आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 3 लाख 65 हजार 334 वैयक्तिक लाभाची कामे पूर्ण झाली असून 11 लाख 61 हजार कामे प्रगतीपथावर आहेत. राज्यातील कोरडवाहू शेती सिंचित करण्यासाठी मनरेगाच्या माध्यमातून आतापर्यंत 2 लाख 89 हजार 970 सिंचन विहिरी पूर्ण, तर चालू आर्थिक वर्षात 25 हजार 453 विहिरींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. यामुळे विकेंद्रित जलसिंचनाचे स्रोत निर्माण होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न व रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होत आहे.

व्यवस्थापनासाठी विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या 266 प्रकारच्या कामांपैकी 182 कामे नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाशी संबंधित असून यात दगडी बांध, सिमेंट बांध, चेक डॅम, मातीचे बांध, शोष खड्डे, रूफटॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग व पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जमीन सुधार कामांचा समावेश आहे.

मनरेगा योजनेंतर्गत पारदर्शकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असून ई-मस्टर, ई-एमबी, मोबाईल ॲप व जिओ- मनरेगा प्रणालीद्वारे मजुरांची उपस्थिती, कामाचे मोजमाप आणि कामांचे छायाचित्र नोंदविण्यात येते. एएउवफए प्रणालीद्वारे अंदाजपत्रक व मंजुरी प्रक्रिया पूर्ण केली जाते. निधी व्यवस्थापन अधिक पारदर्शक व उत्तरदायी करण्यासाठी प्रणाली लागू करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून मिळणारा निधी थेट रठअ खात्यात जमा होणार आहे आणि PFMS प्रणालीद्वारे जिल्हा व ग्रामपंचायतींना वितरित केला जाणार आहे. या प्रणालीमुळे निधीचा प्रवाह डिजिटल, ट्रॅकेबल आणि कार्यक्षम झाला आहे. राज्यात मनरेगा योजनेंतर्गत 2024-25 मध्ये 5973.21 कोटी रुपये खर्च झाले असून त्यापैकी 4357.55 कोटी रुपये मजूरीवर खर्च झाले. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत 4654.37 कोटी रुपये खर्च झाले असून त्यात 2948.70 कोटी मजूरीवर आणि 1619.19 कोटी साहित्यावर खर्च झाले आहेत.

पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून ही योजना अधिक सक्षम होत असून, समृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरत आहे.

# रामटेक दिवाणी व फौजदारी न्यायालयात जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १४ :

रामटेक दिवाणी व फौजदारी न्यायालय येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त योगीराज हॉस्पिटल च्या वतीने रोग निदान शिबिर व रक्तदानाचे आयोजन करण्यात आले. जागतिक मानसिक आरोग्य दिन हा दरवर्षी दि. १० ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणारा एक महत्त्वाचा आरोग्य जागरूकता कार्यक्रम आहे जो एखाद्याच्या जीवनात आणि समाजात मानसिक आरोग्याचे महत्त्व जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो.या दिवसाचा उद्देश लोकांना मानसिक आजाराच्या त्रासाबद्दल शिक्षित करणे आणि जगभरातील लोकांना या कारणाचे समर्थन करण्यास प्रोत्साहित करणे आणि मानसिक आरोग्याला समर्थन देण्यासाठी जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये निरोगी वातावरण स्थापित करणे आहे.




यावेळी दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश संदीप सरोदे यांनी आपले मत व्यक्त करतांना जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे महत्त्व, निरोगी समाज आणि राष्ट्र घडवण्यात व्यक्तीचे मानसिक आरोग्य महत्त्वाची भूमिका बजावते.चांगले आणि संतुलित जीवन जगण्यासाठी मानसिक आणि शारीरिक आरोग्य असणे अत्यावश्यक आहे. कोविड महामारी आणि युद्धांसारख्या अलीकडील अभूतपूर्व जागतिक घटनांमुळे मानसिक आरोग्यासाठी जागतिक संकट निर्माण झाले आहे, ज्यामुळे जगभरातील लाखो लोक प्रभावित झाले आहेत, ज्यासाठी जगभरातील संघटना आणि धोरणकर्त्यांचे लक्ष आणि सक्रिय सहभाग आवश्यक आहे जेणेकरून मानसिक आरोग्याला आधार देण्यासाठी आवश्यक असलेल्या उपचारांच्या तफावती आणि सुविधांविरुद्ध लढण्यास मदत होईल.

# स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी महोत्सव साजरा



■ महासागर प्रतिनिधी
वानाडोंगरी, दि. १४ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ डिगडोह मंडळाने शताब्दी वर्षानिमित्त १२ ऑक्टोबर रोजी विजयादशमी महोत्सव साजरा केला. हिंगणा तालुक्यातील इसासनी येथील राय डाऊन - २ येथून स्वयंसेवकांनी सायंकाळी ५ वाजता संचलन सुरू केले आणि परिसरातील वस्त्यांमधून पथसंचलन करत मुख्य रस्त्यांमार्गे सुमारे ५.३० वाजता कार्यक्रमस्थळी पोहोचले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राजा जगताप (हिंगणा खंड संघ चालक) आणि प्रमुख अतिथी राम सेनेचे अध्यक्ष कमलेश सिंग ठाकूर उपस्थित होते. या कार्यक्रमापूर्वी अमृत वचन व एकल गीत सादर करण्यात आले होते.

हा कार्यक्रम संघाच्या 100 वर्षपूर्तीच्या निमित्ताने जनतेपर्यंत संघाची भावना आणि राष्ट्रीय चेतना पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता. शहरासोबतच ग्रामीण भागातही पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्वयंसेवकांनी पथसंचलनाच्या माध्यमातून एकता, शिस्त आणि सामाजिक समरसतेचा संदेश दिला. संघाच्या केंद्रीय कार्यालयाचे सचिव समीर क्षीरसागर यांनी आपल्या भाषणात शाखेचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमात योगासन, व्यायाम व योग प्रात्यक्षिक सादर करण्यात आले आणि जयघोषासह समारोप गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन मंडळ कार्यवाहक संदीप काळमेघ यांनी केले. इसासनी व परिसरातील अनेक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इच्छुकांच्या भाऊगर्दीमध्ये कोण ठरणार मौद्याचा बाहुबली ?

**मौदा तालुका वार्तापत्र**
**शैलेश रोशनखेडे**

मौदा नगरपंचायत निवडणूक २०२५ निवडणुकीसाठी आता थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडले जाणार असून मौदा नगर पंचायतचे नगराध्यक्षपद यंदा सर्वसाधारण प्रवर्गासाठी निश्चित झाले आहे. ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या आरक्षण सोडतीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मौदा शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ही निवडणूक महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे माजी आमदार टेकचंद सावरकर, कॉंग्रेस नेते सुनील केदार व सुरेश भोयर यांच्यासाठी ही प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे दिसून येत आहे.

या निवडणुकीला आता काही कालावधी बाकी असला तरीही महायुती आणि महाविकास आघाडी व इतर पक्षांतील कार्यकर्त्यांनी चांगली कंबर कसली आहे. मात्र, या निवडणुकीत उमेदवारांची खरी कसोटी लागणार आहे. हा गड कोण सर करणार याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मौदा नगर पंचायत नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुलं झाल्याने अनेकांना चांगलीच संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विविध सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तींनी या पदासाठी रस दाखविला आहे. माजी नगरसेवक तसेच नवे चेहरेही इच्छुकांच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. दरम्यान, मौदा येथे नगरपंचायतीच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामांचा आणि नागरिकांच्या अपेक्षांचा मुद्दा या निवडणुकीत महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

जनतेकडून पारदर्शक प्रशासन आणि मूलभूत सुविधा याबाबतीत अपेक्षा वाढल्या आहेत. राजकीय चर्चांमधून पुढील काही दिवसांत संभाव्य उमेदवारांची नावे अधिक स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर भाजपा कडून राजू सोमनाथे, मोरेश्वर सोरते, यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून कॉंग्रेस कडून राजेश निनावे. शुभम तिघरे, किशोर सांडेल, यांचे नावे आघाडीवर असले तरी खरी लढत पहायची झाल्यास माजी नगराध्यक्ष उमेश गभने हे कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढतात याकडे सुद्धा शहर वासियांचे लक्ष लागले आहे. उमेश गभणे यांनी जर शिवसेना शिंदे गट यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवली तर यात भाजपा आणि कॉंग्रेस ला मोठी अडचण निर्माण होणार आहे व दोन्ही पक्षांची मोठी डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा सध्या मौदा शहरात सुरू आहे. या निवडणुकीत मौदा नगर पंचायत साठी महायुती व महाविकास आघाडी मधील खरी लढाई पहायला मिळणार आहे, तर शहरात इतर पक्षातील इच्छुकांनी आतापासून निवडणुकीच्या मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. यात सध्या माजी नगराध्यक्ष भारती सोमनाथे यांचे पती राजू सोमनाथे यांचे नाव चर्चेत आहे. यात सोमनाथे यांचा मोठा राजकीय वारसा नसला तरी ही निवडणूक महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासाठी महत्वपूर्ण ठरणार असल्याचे बोलल्या जात आहे.

तर कॉंग्रेस कडून राजेश निनावे, शुभम तिघरे, किशोर सांडेल यांचे नाव जरी चर्चेत असले तरी समोर दोन्ही पक्षाकडून तिकीट साठी रांगा लागणार असल्याचेही दिसून येत आहे, यासाठी भाजपा कडून अनेक कार्यकर्त्यांची नावे सुद्धा नगराध्यक्ष पदासाठी समोर येण्याचे चित्र दिसून येणार आहेत, तर माजी नगराध्यक्षा भारती सोमनाथे यांनी मागील पाच वर्षात नगराध्यक्षा असताना मौदा शहरात स्वच्छ शहर, सुंदर शहर, व प्रभागामध्ये स्वच्छ प्रभाग, सुंदर प्रभाग ही संकल्पना राबविली. त्यामुळे त्यांचे पती राजू सोमनाथे यांना तिकीट मिळाल्यास ते समोरच्या व्यक्तीला तगडे आव्हान देणार का? अशाही चर्चा सुरू आहेत.

या नगर पंचायतची शेवटची सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये पार पडली होती. राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस हे दोन महत्त्वाचे पक्ष फुटल्याने पक्षांच्या स्थानिक नेते,पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्येही विभागणी झाली आहे.

**संभाव्य उमेदवार...!!!**

नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत संभाव्य उमेदवारांचा विचार केल्यास भाजपकडून राजू सोमनाथे, मोरेश्वर सोरते,, तर कॉंग्रेसकडून राजेश निनावे, शुभम तिघरे,, किशोर सांडेल यांची नावे आघाडीवर आहेत. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून एकही नाव पुढे आले नसले तरी माजी नगराध्यक्ष उमेश गभणे यांच्या भूमिका आणि निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**भाजपला अपक्षांचा आधार...!!!!!**

२०१८ च्या निवडणुकीत भाजपने एकुण १७ पैकी आठ जागा जिंकल्या होत्या, तर कॉंग्रेसने पाच, शिवसेनेने दोन जागांवर विजय संपादन केला होता. दोन जागांवर अपक्षांनी बाजी मारली होती. त्यावेळी भाजपने यात दोन अपक्ष नगरसेवकांची मदत घेतली होती. परिणामी, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत कॉंग्रेसच्या रोशनी राजेश निनावे यांना १२८ मतांनी पराभव पत्करावा लागला होता. भाजपच्या भारती राजू सोमनाथे यांनी त्यांना पराभूत केले होते.

**मौदा शहर रक्ताला जागृत ठेवून मतदान करणार !**

सध्या इच्छुक असलेल्यांपैकी अनेकजण निवडणूक लढवू शकतील. पण खरी लढाई महाविकास आघाडी व महायुती यांच्यात होईल. या निवडणुकीत भाजपा एमआयएमला कितपत खेळविल, यावर महाविकास आघाडीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. गेल्या निवडणुकीतील अनुभव पाहता यावेळी मौदा शहर मात्र आपल्या चळवळी रक्ताला या निवडणुकीत जागृत ठेवूनच मतदान करतील. सर्वसाधारण प्रवर्गासाठी हे आरक्षण पडल्याने अनेक आजी-माजी नेते, कार्यकर्ते आपल्या आज कुटुंबातील पुरुषाला व तरुणाला निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यासाठी तयारीला लागल्याचे दिसून येत आहे.

# आता हिंगणा मतदारसंघातही मतचोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीचे प्रकरण उघडकीस आणल्यानंतर आता वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघातून असेच प्रकार उघडकीस येऊ लागले आहेत. महाराष्ट्रातील राजुरा विधानसभा मतदारसंघातील प्रकरण ताजे असतानाच आता नागपूर जिल्ह्यातील हिंगणा विधानसभा मतदार मतदारसंघातही मतचोरीचे प्रकरण समोर आले आहे.

राहुल गांधी यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रातील दोन प्रकरणे अलिकडे उघडकीस आणले होते. काही मतदारसंघात मतदार वाढवण्यात येतात तर काही ठिकाणी भाजपला नको असलेले मतदारांचे नावे गहाळ केली जातात आणि या प्रकरणाला भारताचे निवडणूक आयोग सहकार्य करत असल्याचा आरोप केला होता.

राजुरा विधानसभा मतदारसंघात सहा हजारांहून अधिक मतदार गहाळ करण्यात आले होते. हिंगणा विधानसभा मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत प्रचंड गोंधळ उघड झाला आहे.

बोगस नावे, अवास्तव नोंदी आणि संशयास्पद पत्त्यांमुळे मतदार यादीची विश्वासार्हता धोक्यात आली असून, या प्रकारामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

वानाडोंगरीतील राजीव नगर प्रभाग क्रमांक ५ मधील घर क्रमांक १ व ०१ वर तब्बल २०० पेक्षा अधिक मतदार नोंदले गेले असल्याचे समोर आले आहे. ही बाब केवळ विसंगतच नव्हे, तर निवडणूक यंत्रणेकडून गंभीर दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट करणारी आहे. विशेष म्हणजे, याच भागातील झोपडपट्टीत

## एकाच घरात २०० मतदार

सत्ताधारी पक्षाच्या संबंधित मेघे कुटुंबातील तब्बल २७ सदस्यांची नावे यादीत आहेत.

ही बाब केवळ एका भागापुरती मर्यादित नसून, बुटीबोरी, वाडी, डिगडोह (देवी), नीलडोह, हिंगणा, गोधनी रेल्वे अशा विविध नगर परिषद व जिल्हा परिषद गटांमध्ये हजारो संशयास्पद नावे आढळून आली आहेत. काही प्रकरणांत नागपूर जिल्ह्याबाहेरील विद्यार्थी देखील त्यांच्या होस्टेलच्या पत्त्यावरून मतदार म्हणून नोंदले गेले आहेत, ही बाब देखील अनेक शंका निर्माण करणारी आहे.

या सर्व प्रकारामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये निष्पक्षता टिकेल का, असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी बोगस मतदारांच्या आधारावर निवडणुका लढवल्या गेल्यास सामान्य माणसाला निवडणुकीत उतरायची हिंमत राहणार नाही, अशी प्रतिक्रिया दिली.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी गटनेते दिनेश बंग म्हणाले, देशातील व राज्यातील सत्ताधारी बोगस मतांवर निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षा ठेवणे व्यर्थ आहे.

पण राज्य निवडणूक आयोगाने जर विधानसभेतील कलंक पुसायचा असेल, तर तातडीने चौकशी करून घरोघरी सर्वे मोहीम राबवावी आणि बोगस नावे वगळावीत. अन्यथा या निवडणुकीतही लोकशाहीचा हत्या होईल, असे बंग यांनी स्पष्ट केले.

# बिलासपूर- इतवारी एक्स्प्रेसमधून ३ कोटी ३७ लाख किंमतीचे सोने-चांदी जप्त





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने बिलासपूर- इतवारी इंटरसिटी एक्स्प्रेस (गाडी क्र. 12855) मधून अवैधरीत्या वाहतूक होत असलेले सुमारे ३ कोटी ३७ लाख ८४ हजार ५०० रुपयांचे सोने-चांदी जप्त केले. ही कारवाई ११ ऑक्टोबर २०२५ रोजी आमगावझगोंदिया दरम्यान करण्यात आली.

दिवाळी सणासुदीचा काळ तसेच बिहार विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रेल्वेमार्गे ज्वलनशील पदार्थ, मौल्यवान धातु, मादक द्रव्ये आदींच्या अवैध वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी मंडल सुरक्षा आयुक्त दीप चंद्र आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष टास्क फोर्स गठीत करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत नियमित तपासण्या सुरू असून त्याचाच भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली.

विशेष टास्क टीमचे प्रभारी सहाय्यक उपनिरीक्षक के. के. निकोडे व आरक्षक व्ही. के. कुशवाहा यांनी तपासणीदरम्यान एस-०६ स्लीपर कोचमध्ये संशयास्पद अवस्थेत एक प्रवासी मौल्यवान धातूसदृश्य वस्तूसह आढळून आला. त्याची माहिती तात्काळ गोंदिया पोस्ट प्रभारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. गाडी गोंदिया स्थानकावर पोहोचल्यावर सी.आय.बी. निरीक्षक कुलवंत सिंह आणि गोंदिया पोस्ट निरीक्षक एन. पी. पांडे उपस्थित राहून प्रवाशासह त्याचे सामान नियमानुसार ताब्यात घेण्यात आले.

तपासणीत त्या प्रवाशाने आपले नाव नरेश पंजवानी (वय ५५, रा. श्रीनगर बंबा भवनजवळ, गोंदिया) असे सांगितले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली त्याच्याकडील पिशव्यांची तपासणी केल्यावर खालील प्रमाणे माल आढळला.

सोने : एकूण वजन २ किलो ६८३ ग्रॅम, किंमत ३,२७,३७,५००/- चांदी : एकूण वजन ७ किलो ४४० ग्रॅम, किंमत १०,४७,०००/-एकूण जप्त मालाची किंमत ३,३७,८४,५००/- एवढी आहे. हा माल पंचासमक्ष जप्त करून नरेश पंजवानी यासह डीआरआय (डायरेक्टरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स), नागपूर यांच्या स्वाधीन करण्यात आला.

रेल्वे सुरक्षा बल, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभाग प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सतत कार्यरत आहे. प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, रेल्वे परिसरात किंवा गाड्यांमध्ये कोणतीही संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल दिसल्यास तात्काळ नजीकच्या रेल्वे सुरक्षा बल, सरकारी रेल्वे पोलिस किंवा कार्यरत रेल्वे कर्मचाऱ्यांना माहिती द्यावी किंवा रेल मदत टोल-फ्री क्रमांक १३९ वर संपर्क साधावा, जेणेकरून तातडीने कार्यवाही करता येईल व आपली यात्रा सुरक्षित राहील.

# मच्छीमार समुदायाची राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाचे सदस्य बाथम यांच्याशी भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाच्या नियामक मंडळाचे अनधिकृत सदस्य आणि मध्य प्रदेश मच्छीमार कल्याण मंडळाचे अध्यक्ष सीताराम बाथम यांनी अलीकडेच नागपूरमधील मच्छीमार, ढीवर आणि भोई समुदायाच्या प्रतिनिधींची आणि विविध संघटनांच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सीताराम बाथम हे राष्ट्रीय दौऱ्यावर आहेत, भोई मच्छीमार समुदायाच्या समस्या ऐकण्यासाठी विविध शहरे आणि राज्यांना भेट देत आहेत आणि त्या केंद्र आणि राज्य सरकारांना मांडतील आणि त्या सोडवतील. या संदर्भात बाथम नागपुरात आले.

या भेटीदरम्यान, विविध संघटनांच्या अधिकाऱ्यांनी आमदारांच्या निवासस्थानी बाथम यांची भेट घेतली आणि त्यांना त्यांच्या समुदायाच्या समस्यांबद्दल माहिती दिली.भोई समाजाचे अध्यक्ष गौर यांच्यासह, प्रभाकर मांडरे, सुरेश शिवेरकर, वासुदेव सुरजुसे आणि मनोज नागरे यांच्यासह विविध संघटनांच्या अधिकाऱ्यांनी सीताराम बाथम यांच्यासमोर समुदायाच्या समस्या मांडल्या. कंत्राटदार तलाव आणि जलाशयांवर अतिक्रमण कसे करत आहेत, ज्यामुळे मच्छीमार, ढीवर्स आणि भोई समाजातील सदस्यांवर अन्याय होत आहे आणि त्यांच्या उपजीविकेवर कसा परिणाम होत आहे हे स्पष्ट केले. नाग नदीतील दूषित पाणी गोसे प्रकल्पात कसे वाहत आहे याकडेही समुदायाच्या प्रतिनिधींनी बाथम यांचे लक्ष वेधले,ज्यामुळे केवळ मत्स्य उत्पादनावरच परिणाम होत नाही तर मासे खाण्यासही अयोग्य होत आहेत. बाथम यांनी समुदायाला विमा पॉलिसी, महाराष्ट्रातील अनुसूचित जाती/जमाती आरक्षण आणि केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचे फायदे मिळावेत.

## आम आदमी पार्टी तर्फे मूक आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सी.जे.आय.भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आम आदमी पार्टी, नागपूर यांच्या वतीने 14 ऑक्टोबरला संविधान चौक, नागपूर येथे मूक आंदोलन करण्यात आले. हल्ल्याचा निषेध व्यक्त करून लोकशाही व संविधानाच्या संरक्षणाचा संदेश देण्यात आला.





नागपूर : दिवाळीचा सण आठवड्यावर आला असून, बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. दिवाळीनिमित्त पूजा आणि सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी ग्राहकांची बाजारात प्रचंड गर्दी झाली आहे. एक आठवडापूर्वीच आज मंगळवारी बाजारात सजावट साहित्य, लक्ष्मी मूर्ती खरेदी करण्यासाठी दुकांनावर झुंबड दिसून आली.

# छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी दुर्गोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

युनेस्को ने जागतिक वारसा यादीत समावेश केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 12 दुर्गांना मानवंदना देण्यासाठी संपूर्ण राज्यात दुर्गोत्सव हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा करण्याचे निर्देश माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. या उपक्रमातून शिवछत्रपतींच्या दुर्गांना मानवंदनेतून विश्वविक्रम प्रस्थापित केला जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी(अमृत) संस्थेच्या मार्फत राज्यातील सर्व जनतेला आवाहन करण्यात आले आहे की, त्यांना अगदी जमेल तेथे या वैश्विक ख्याती प्राप्त असलेल्या व युनेस्को ने जागतिक वारसा स्थळाची यादीत समावेश केलेल्या 12 दुर्गांची हुबेहूब प्रतिकृती तयार करावी. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेर दुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड व पद्मदुर्ग किल्ल्याचे समावेश करण्यात आले आहे. राज्यातील नागरिकांनी घरातील आंगण, गृहसंकुलातील सार्वजनिक जागा, बागेत, बाल्कनीत परिवारातील सदस्यांसोबत वरीलपैकी कोणत्याही एक दुर्गाची उत्तम सजावटीसह प्रतिकृती बनवणे अपेक्षित आहे. तसेच यासोबत सेल्फी काढून पोस्ट करायची आहे. या दुर्गोत्सवात सहभागी होण्याकरिता दि. 12 ते 25 ऑक्टोबर 2025 या कालावधीत डिजीटल प्लॅटफॉर्मवर नाव व इतर तपशीलाचा फॉर्म भरून नोंदणी करावयाची आहे. त्यानंतर दुर्गोत्सवाच्या अनुषंगाने आपण बनविलेल्या 12 पैकी एका दुर्गासोबतचे सेल्फी छायाचित्र काढून याच डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड करावयाचे आहे. या छायाचित्राची अमृत संस्थेमार्फत वैधता पडताळणी सिध्द झाल्यानंतर भाग घेणा-या प्रत्येकास शासनाच्या वतीने मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र डिजीटल स्वरूपात प्रदान केले जाणार आहे. त्याचप्रमाणे शिवचरित्रातून आज घ्यावयाचे धडे या विषयावरील उत्कृष्ट असे ऑडिओ आणि व्हिडीओ स्वरूपातील गोष्टींचे संकलनही निःशुल्क उपलब्ध होणार आहे. मनपातर्फे नागपूर शहरातील नागरिकांना या उपक्रमात भाग घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## श्रीजीचे चिक्की डे स्टोअर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

खरी, दर्जेदार आणि अस्सल चिक्की ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने श्रीजी चिक्कीची स्थापना २००१ मध्ये महेश कारिया, राजेश कारिया आणि विजय कारिया या तीन भावांनी केवळ २० कर्मचाऱ्यांसह एका छोट्याशा शेडमध्ये केली. ग्राहकांना सर्व उत्पादने एकाच ठिकाणी अनुभवता यावीत यासाठी कंपनीने 'चिक्की डे स्टोअर' सुमारे ४५० चौरस फूट जागेत सुरू केले आहे. एकेकाळी केवळ शेंगदाणा चिक्की या एका प्रकाराने सुरू झालेला हा प्रवास आज १५ हून अधिक प्रकारच्या चिक्की, तसेच ४० पेक्षा अधिक माउथ फ्रेशनर्स, सोनपापडी, सोअन रोल्स, मावा मलाई आणि विविध नमकीन स्नॅक्स यांच्या समृद्ध श्रेणीपर्यंत पोहोचला आहे.

श्रीजी चिक्कीचे आधुनिक उत्पादन केंद्र लिहिगाव येथे सहा एकर परिसरात आहे.

# जरीपटका मार्केट रोडवरील गिट्टीचा ढिगारा

■ प्रमोद जांभूळकर
नागपूर, दि. १४ :



प्रभाग क्र. ७ इंदोरा परिसरातील जरीपटका मार्केट रोडवर मोठ्या प्रमाणात गिट्टी आणि चुरीचा ढिगारा पडलेला असून, त्यामुळे नागरिक, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या ठिकाणी जवळच जरीपटका मार्केट बस स्टॉप, मनपाचा दवाखाना, भाजी मार्केट, शाळा आणि कॉलेज असल्याने नागरिकांची वर्दळ सतत सुरू असते. रस्त्याच्या मधोमध पडलेला हा ढिगारा वाहतुकीत अडथळा निर्माण करीत असून, अपघाताची शक्यता वाढली आहे. उत्तर नागपूरातील ही मोठी बाजारपेठ असल्याने दररोज हजारो लोक येथे ये-जा करतात. रस्त्यावर पडलेल्या गिट्टीमुळे पादचारी घसरतात, तर दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. या संदर्भात संजय राऊत, शैलेंद्र बेहेरे, प्रवीण शेंडे, मनोहर राऊत, अभय शेंडे, सत्यजीत लांजेवार, अतुल नेवारे, देवानंद पानतावणे, दिनेश कांबळे, सुधीर खोब्रागडे आणि युवराज सोनारे यांनी मनपा प्रशासनाकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, मनपा प्रशासनाने त्वरित गिट्टीझचुरीचा ढिगारा हटवून रस्ता स्वच्छ करावा, जेणेकरून या भागातील लोकांना दिलासा मिळेल.

महासागर
प्रभाग वार्ता

# बनावट गुडनाइट उत्पादने बनवणाऱ्या बेकायदेशीर कारखान्यावर पोलिसांचा छापा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :





भारतातील आघाडीचा घरगुती कीटकनाशक ब्रँड गुडनाइटची निर्मिती करणाऱ्या गोदरेज कंज्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड (जीसीपीएल) आणि महाराष्ट्र पोलिसांनी नागपूरमधील बनावट गुडनाइट उत्पादने तयार करणाऱ्यांचा शोध लावला. जीसीपीएलच्या तपास यंत्रणेच्या मदतीने टाकण्यात आलेला हा छापा म्हणजे मुंबई, पुण्यासारख्या प्रमुख शहरी बाजारपेठांसह महाराष्ट्रात बनावट डास प्रतिबंधक उत्पादनांच्या प्रसाराला आळा घालण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

कारवाई करता येईल अशी गुप्त माहिती मिळाल्यानंतर, स्थानिक पोलीस आणि तपास पथकांनी नागपूरमधील बेकायदेशीर कारखान्यावर धाड टाकली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात बनावट गुडनाइटचे साहित्य जप्त करण्यात आले. बनावट उत्पादनांची निर्मिती आणि सुव्यवस्थित वितरणाची तयारी यामुळे समोर आली. घटनास्थळावरून जप्त केलेल्या वस्तूंमध्ये 10,937 रिकामे गुडनाइट बॉक्स, 2,641 बनावट स्टिकर्स, 7 रिकामे कार्टन आणि 2 तयार बनावट गुडनाइट उत्पादनांचा समावेश आहे.

या प्रकरणातील आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कायदा 2023 च्या कलम 318 (4) अंतर्गत एफआयआर (प्राथमिक माहिती अहवाल) दाखल करण्यात आला आहे. ग्राहकांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबई आणि पुण्यासारख्या प्रमुख शहरांसह राज्यभरात अशा धोकादायक उत्पादनांचा प्रसार रोखण्यासाठी अधिकारी आता या रॅकेटशी संबंधित सगळी कनेक्शन्स आणि पुरवठा नेटवर्कचा शोध घेत आहेत. बनावट वस्तूंचा व्यवहार करणाऱ्यांसाठी ही कारवाई म्हणजे एक इशारा आहे. तर ग्राहकांच्या विश्वासाचे रक्षण करण्याची ही जीसीपीएलची वचनबद्धता आहे.

या विषयासंबंधात गोदरेज कंज्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचे सीएमओ अश्विन मूर्ती म्हणाले, बनावट उत्पादनांचा प्रसार हा देशभरातील एफएमसीजी उद्योगासाठी चिंतेचा एक प्रमुख विषय आहे. बनावट किंवा एकसारखी दिसणारी उत्पादने केवळ बेकायदेशीरच नाहीत तर मानवी आरोग्यासाठी हानिकारक आणि धोकादायक देखील आहेत. जीसीपीएल त्यांच्या उत्पन्नाचा एक ठरावीक भाग अशा नावीन्यपूर्ण उत्पादनांचा विकास करण्यासाठी देत असते. यामुळे ग्राहकांची सोय होते. आणि गुडनाइट हे त्याचेच एक उदाहरण आहे. आम्ही आमच्या वितरण नेटवर्क, स्थानिक अधिकारी आणि ग्राहकांशी सहकार्य करून नियमितपणे आमच्या उत्पादनांची गुणवत्ता तपासणी करतो. महाराष्ट्र पोलिसांसोबतचा हा उपक्रम राज्यातील डुप्लिकेट गुडनाइट उत्पादनांचे स्थानिक किरकोळ विक्रेते, उत्पादक आणि वितरकांना चाप बसवण्यासोबतच त्याला आळा घालेल.

बाजारात गुडनाइटची बनावट उत्पादने उपलब्ध असल्याने, ग्राहकांनी सावधगिरी बाळगावी आणि आपल्या खरेदीचे योग्य ते बिल घ्यावे. जर ग्राहकांना डुप्लिकेट गुडनाइट उत्पादने असल्याचा संशय आला किंवा कोणताही घाऊक विक्रेता/किरकोळ विक्रेता त्यांच्याशी व्यवहार करत असल्याचे आढळले.




# रस्त्यावरील उघड्या ड्रेनेज लाईनमुळे डासांचे थैमान

■ प्रदीप पौनिकर
नागपूर, दि. १४ :

प्रभाग क्र.५,एचबी नगर रस्त्यावरील उघड्या ड्रेनेज लाईनमुळे डासांचे प्रमाण वाढले असून, नागरिकांना त्रास होत आहे. या समस्येचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे जेणेकरून डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून नागरिकांचे संरक्षण होईल. रस्त्यावरील ड्रेनेज लाईन उघड्या असल्याने पाणी साचून राहते आणि डासांचे प्रमाण वाढते आहे. उघड्या ड्रेनेज लाईनमुळे डासांचे लार्वा वाढीस लागतात आणि डासांचे प्रमाण वाढते आहे.

डासांमुळे मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया सारखे आजार पसरत आहे.त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मनपा प्रशासनाने उघड्या ड्रेनेज लाईनवर झाकण लावावे जेणेकरून पाणी साचणार नाही आणि डासांचे प्रमाण कमी होईल. ड्रेनेज लाईनची नियमित साफसफाई करावी जेणेकरून पाणी साचणार नाही आणि डासांना वाढीस लागणार नाही.डासांवर नियंत्रण मिळवण्यासाठी फॉगिंग करावी.त्वरित मनपाने कारवाई केली नाही तर मनपा प्रशासनाच्या विरोधात आम आदमी पक्षाच्या आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा आम आदमी पक्षाच्या वतीने देण्यात आला. यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनबार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, किशोर मौंदेकर,केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, राजू दुधे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर,स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले,गोविंदा केळवदकर, चेतन निखारे, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.